कृषीवल
रायगड, रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## बापलेकासह चौघांचा जागीच मृत्यू

**धाराशिव :** जिल्ह्याच्या तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे विजेच्या धक्क्याने चौघांचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. मृतांमध्ये वडील, मुलगा आणि दोन मजुरांचा समावेश आहे. गावातील गणपत साखरे यांच्या शेतात विहिरीतील मोटार काढण्याचं काम सुरू होतं. क्रेनच्या सहाय्याने ही मोटार बाहेर काढली जात असताना क्रेनचा वरील भाग महावितरणच्या विद्युत हायव्होल्टेज तारेला स्पर्श झाल्याने क्रेनमध्ये करंट उतरल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत कासीम कोंडिबा आणि त्यांचा १६ वर्षीय मुलगा रतन कासिम या दोघांचा मृत्यू झाला आहे. तर, रामलिंग साखरे यांच्यासह त्यांचे वडील नागनाथ साखरे याही बापलेकाचा दुर्दैवी अंत झाला.

## नववर्षात वाजणार जि.प.चे बिगुल

**मुंबई :** राज्यातील ३२ जिल्हा परिषदांपैकी १२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पैकी १२५ पंचायत समित्यांची निवडणूक २१ दिवसांत संपविली जाणार आहे. ८ जानेवारीपूर्वी या निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते, असे आयोगातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील उमेदवारांचे आरक्षण काढताना २० जिल्हा परिषदांनी व २११ पंचायत समित्यांनी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्यांची निवडणूक थांबविली आहे. आता पहिल्यांदा आरक्षण मर्यादेचे पालन केलेल्या सोलापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर या १२ जिल्हा परिषदांची निवडणूक होणार आहेत.

# पर्यटकांची कोंडी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**नाताळनंतर थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी रायगड जिल्ह्यामध्ये पर्यटक शुक्रवारापासून येण्यास सुरुवात झाली आहे. शनिवारी अलिबाग-वडखळ, अलिबाग-नागाव, अलिबाग- रेवदंडा मार्गावर वाहतूक कोंडीचा फटका प्रवाशांसह पर्यटकांना बसला. ही वाहतूक कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची दमछाक झाली. अपुऱ्या मनुष्यबळामुळे होमगार्डचीदेखील मदत घेण्यात आली. मात्र, ही वाहतूक कोंडी सोडविण्यास फारसे यश आले नाही. पर्यटकांना त्यांच्या निश्चितस्थळी पोहोचण्यास विलंब झाला. त्यामुळे प्रवासी व पर्यटकांमध्ये नाराजीचे सूर उमटले. ऐन पर्यटनाच्या हंगामात रस्त्यांची कामे करण्यासाठी खोदकाम केल्याने त्याचाही फटका प्रवाशांना व व्यावसायिकांना बसल्याचे दिसून आले आहे.**

सरत्या वर्षाला निरोप देण्याबरोबरच नव्या वर्षाच्या स्वागताचा जल्लोष रायगड जिल्ह्यात साजरा करण्याचा निर्णय पर्यटकांनी यंदाही घेतला आहे. मागील महिन्याभरापासून हॉटेल, कॉटेजेस पर्यटकांनी बुकिंग सुरू केली होती. २८ डिसेंबरपासून ते चार डिसेंबरपर्यंत सर्वच हॉटेल्स बुक असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे यावर्षीदेखील पर्यटकांनी रायगड जिल्ह्याला पसंती दर्शविली असल्याची माहिती समोर आली आहे. सागरी मार्गासह रस्त्यानेदेखील पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल झाले. मुंबई-गोवा महामार्गासह रायगड जिल्ह्यातील अलिबाग-वडखळ, पान २ वर

### रायगडातील सर्व महामार्ग, रस्ते जाम

### वाहनांच्या लांबच लांब रांगा



### बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत संताप

अलिबाग-रोहा मार्गावरल ठिकठिकाणी असलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती करण्यास सार्वजनिक बांधकाम विभाग उदासीन ठरले. या खड्ड्यांतून मार्ग काढताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गलथान कारभाराचा फटका प्रवाशांसह पर्यटकांना बसला. तसेच ऐन पर्यटनांच्या हंगामात ठिकठिकाणी रुंदीकरणाच्या नावाखाली रस्ते खोदून ठेवले आहेत. अलिबागमधील सहाण बायपास व इतर भागातील रस्ते खोदून ठेवल्याने धुळीचा त्रास तसेच वाहनांचा वेगही मंदावला आहे. बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत अनेकांनी संताप व्यक्त केला.

> “वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी होमगार्डची मदत घेण्यात आली. अलिबाग-वडखळ, अलिबाग-बेलकडे मार्गावर ठिकठिकाणी वाहतूक पोलीस आणि होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी पर्यटनस्थळं आहेत, त्या भागातही पोलीस तैनात केले आहेत. अलिबाग-बेलकडे मार्गावर ठिकठिकाणी खड्डे असल्याने वाहनांचा वेग मंदावला. त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली. ही कोंडी सोडविण्याचा प्रयत्न यंत्रणेद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक पोलिसांचीदेखील यासाठी मदत घेतली आहे.
> – अभिजीत भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्ह वाहतूक शाखा”

# अवजड वाहतूक तात्काळ बंद करा

### शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांची मागणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सध्या पर्यटनाचा हंगाम सुरु आहे. थर्टीफर्स्टनिमित्त पर्यटक जिल्ह्यात विशेष करून अलिबाग तालुक्यात दाखल झाले आहेत. वाहतूक कोंडीपासून बचाव करण्यासाठी या कालावधीत पुढील दोन दिवस म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत अवजड वाहनांना बंदी करण्यात यावी, अशी मागणी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली आहे.

अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण आहे. अलिबाग, वरसोली, किहीम, आक्षी, नागाव, रेवदंडा अशा अनेक पर्यटनस्थळी पर्यटकांची थर्टीफर्स्टला गर्दी होते. यावर्षीदेखील पर्यटकांची अलिबागमध्ये येण्याची लगबग सुरु झाली आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी लाखो पर्यटक अलिबागमध्ये दाखल होत आहेत. दरमयान, खराब रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न भेडसावत असताना अवजड वाहनांमुळेदेखील वाहतूक कोंडीला सामोरे जाण्याची वेळ पर्यटकांवर येण्याची शक्यता आहे. पर्यटनावर आधारित व्यवसायांवर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पर्यटकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी पुढील दोन दिवस ३१ डिसेंबरपर्यंत अवजड वाहनांना बंदी करण्यात यावी, अशी मागणी सुरेश घरत यांनी केली आहे.

# नादुरुस्त रस्त्याला आश्वासनांचे डांबर

### धायतडकांचा ‘सोमवार’ फसवा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याची डागडुजी सोमवारपासून सुरू केली जाईल, असे आश्वासन डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी दिले होते. मात्र, धायतडक यांचा सोमवार फसवा ठरला असून, या रस्त्याला आश्वासनांचे डांबर लावण्याचे काम केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांसह प्रवाशांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, बांधकाम विभाग सुस्त आणि खड्ड्यांमुळे प्रवासी त्रस्त अशी अवस्था या मार्गावरील प्रवाशांची आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांतून प्रवास करताना चालकांसह प्रवाशांना



प्रचंड त्रास झाला. धुळीचे कण नाकातोंडात जात आहेत. त्यामुळे श्वसनाचे आजार निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खड्डे चुकविताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्यांची दुरुस्ती तात्काळ करा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली. या रस्त्याची दुरुस्ती सोमवारपासून केली जाईल, असे आश्वासन डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी दिले होते. मात्र, पान २ वर

## वेधक

### राज्यात ऑनलाइन भाडेकरार नोंदणी ठप्प

**पुणे :** राज्याच्या सर्वच भागांत गेल्या सहा ते सात दिवसांपासून आधार (यूआयडी) पडताळणी सेवा बंद आहे. त्यामुळे ऑनलाइन भाडेकरार नोंदणी प्रक्रिया ठप्प झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे काम खोळंबले आहे. मुद्रांक शुल्क विभागाच्या ऑनलाइन प्रणालीत तांत्रिक बिघाड झाला आहे. त्यामुळे सेवा ठप्प झाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. महसूल विभागाकडून डीआयटी आधार पडताळणीसाठीची तांत्रिक समन्वयाची जबाबदारी माहिती तंत्रज्ञान संचालनालय (डीआयटी) मुंबई यांच्याकडे असते. या खात्यामार्फत पाठवण्यात येणारी विनंती युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडिया (यूआयडीएआय) प्रणालीकडे जाते.

### संचमान्यतेसाठी नव्याने सूचना

**पुणे :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी राज्यातील शाळांच्या संचमान्यतेबाबत शालेय शिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार २० ऑक्टोबरपर्यंत युडायस प्लस प्रणालीवर नोंद असलेले विद्यार्थी विचारात घेतली जाणार आहे. शिक्षण विभागाने याबाबत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. संचमान्यतेसाठी ३० सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. परंतु, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या संचमान्यतेबाबत युडायस प्लस प्रणालीवर नोंद असलेली विद्यार्थिसंख्या, आधार वैध विद्यार्थिसंख्या विचारात घेतली जाणार आहे.

### सलमान खान हाजीर हो!

**नवी दिल्ली :** राजस्थानमधील एका ग्राहक न्यायालयानं बॉलिवूड अभिनेता सलमान खानला एका पान मसाल्याच्या उत्पादनाच्या कथित दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीशी संबंधित प्रकरणात व्यक्तिशः हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २० जानेवारी रोजी होणार आहे. न्यायालयानं प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिल्यानं आता सलमान खानला न्यायालयात हजेरी लावावी लागणार आहे. दरम्यान, इंदर मोहन सिंग हनी यांनी २७ नोव्हेंबर रोजी दाखल केलेल्या तक्रारीनंतर हे आदेश देण्यात आले आहेत. हनी यांनी आरोप केला आहे की, सलमान खानने एका पान मसाल्याच्या उत्पादनाची जाहिरात केली, ज्यामध्ये केशर असल्याचा दावा करण्यात आला होता, जो तक्रारदाराच्या मते खोटा आहे. या अनुषंगानं तक्रार दाखल करण्यात आली होती.

### शिक्षक आंदोलनाचा परीक्षांवर परिणाम

**मुंबई :** महाराष्ट्रातील सरकारी आणि अनुदानित शिक्षण संस्था व महाविद्यालयांमध्ये शिक्षण मंडळाचे अधिकारी व कर्मचारी अनेक दिवसांपासून रिक्त जागा भरण्यास आणि योग्य भरती प्रक्रिया राबविण्यासाठी आंदोलन करत आहेत. महाराष्ट्रातील ११ विद्यापीठांपैकी काही विद्यापीठांमध्ये ६० टक्क्यांपेक्षा अधिक शिक्षकांची पदं रिक्त आहेत. ही सर्व पदं लवकरात लवकर भरावी तसेच तृतीय श्रेणीतील कनिष्ठ लिपिकांसह विविध रिक्त पदं तातडीनं भरण्यात यावीत, या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येत आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी, निकाल प्रक्रियेसह अन्य कामांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# द्रुतगती मार्गावर पर्यटकांचे हाल

**। पाताळगंगा । प्रतिनिधी।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पुणे, लोणावळा या पर्यटनस्थळी मोठ्या प्रमाणात पर्यटक जात असल्याने महामार्गावर वाहनांची मोठी गर्दी वाढल्याने वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे पर्यटकांना मोठा मनस्ताप सण करावा लागला. तर अनेकांनी जुन्या महामार्गावर वाट काढण्याचा प्रयत्न केला. तर या मार्गावर ही वाहने बंद पडत असल्याने तो ही प्रयत्न पर्यटकांचा फसला असल्याने पुण्याकडे जाणारे दोन्ही मार्गावर सकाळपासून जाम झाले होते.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहनांची गर्दी वाढल्याने खालापूर टोलनाका येथे टोल फाढण्यासाठी रांगा लागल्या. तर, खंडाळा घाट चढताना जवळपास चढणीवर तीन ते चार पान २ वर




एक्स्प्रेस वे पुण्याबाजूकडे जाताना बोरघाट असल्याने चढणीवर अनेक वाहने गरम होऊन गाड्यांमध्ये बिघाड झाल्याने गाडी थंड होईपर्यंत तासन्‌तास एकाच जागेवर गाड्या थांबल्या होत्या. तर, काही गाड्यांना गाडी दुरुस्तीसाठी फिटरचाही आधार घ्यावा लागला. यावेळेस अनेक ठिकाणी वाहने दुरुस्ती करतानाचे चित्र होते, त्यामुळे नाताळची अर्धी सुट्टी प्रवासातच संपल्याची प्रतिक्रिया अनेक पर्यटकांनी दिली आहे.

# माणगाव बसस्थानकात खोळंबा

### माणगाव-म्हसळा-श्रीवर्धन बसफेऱ्यांबाबत प्रशासनाचे दुर्लक्ष

**। दिघी । प्रतिनिधी ।**

माणगाव-म्हसळा-श्रीवर्धन या महत्त्वाच्या मार्गांवरील स्थानिक एसटी बस वेळेवर न लागल्याने माणगाव बसस्थानकात शुक्रवारी सकाळपासून प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली. सकाळी १०.३० वाजल्यापासून तब्बल तीन तास एकही बस न लावण्यात आल्याने शेकडो प्रवासी स्थानकात अडकून पडले. अखेर दुपारनंतर उशिरा एक बस लावण्यात आल्यावर संतप्त प्रवाशांनी प्रशासनाविरोधात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील प्रवासी मोठ्या संख्येने माणगाववर अवलंबून आहेत. शासकीय कामकाज, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच खासगी नोकरीसाठी दररोज पान २ वर



# काळोखे हत्याकांडाचा एसआयटी तपास करावा

### खा. सुनील तटकरेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मंगेश काळोखेच्या हत्येचा प्रकार अत्यंत निंदणीय आहे. या घटनेते सुधाकर घारे आणि भरत भरत यांचा कोणताही संबंध नसताना राजकीय वैमनस्यातून विरोधक आरोप करीत आहेत. या हत्येचा तपास करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी सहकार्य करू, तसेच या हत्येचा तपास एसआयटीच्या माध्यमातून करावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार असून, त्यानंतर हत्येच्या घटनेनंतर काय घडले ते सर्व बाहेर पान २ वर




### आरोपींवर कठोर कारवाई करणार : शिंदे

पूर्णपणे नियोजन करुन मंगेशची हत्या केली. या प्रकरणात जे आरोपी आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. हे प्रकरण फास्टट्रॅकवर घेऊन, सरकारी वकील देऊन, मोक्का अंतर्गत कारवाई करुन सर्व आरोपींना फाशीची शिक्षा झाली झाली पाहिजे, अशी पीडित कुटुंबियांची भावना आहे. अशा प्रकारची समाजविघातक वृत्ती ठेचून काढली पाहिजे, अशी भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी व्यक्त केली. शुक्रवारी झालेल्या काळोखे यांच्या हत्येनंतर त्यांनी शनिवारी खोपोलीत काळोखे कुटुंबियांची निवासस्थानी भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यावेळी ते बोलत होते.

# आठ आरोपींना ठोकल्या बेड्या

- दोघांची नावे निष्पन्न, तर अन्य सहा नावे गुलदस्त्यात
- नागोठण्यातून रवींद्र देवकर, दर्शन देवकरला केली अटक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर अवघ्या काही दिवसांतच दि. २६ डिसेंबर रोजी खोपोली शहरात घडलेली शिवसेना कार्यकर्ते मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येची घटना संपूर्ण रायगड जिल्ह्याला हादरवून गेली आहे. दरम्यान, २७ डिसेंबर रोजी सकाळी नागोठणे येथून हत्येतील आरोपी रवींद्र देवकर आणि त्यांचा मुलगा दर्शन देवकरला पोलिसांनी नागोठणे येथून ताब्यात घेतले आहे.

या घटनेचा पुढील अधिक तपास पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस करत असताना आणखी सहा आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांची नावे गुलदस्त्यात आहे. दरम्यान, दिवसभरात पोलिसांनी एकूण आठ आरोपींना अटक केली आहे.

खोपोली शहरातील रहाटवडे येथील शिवसेनेचे कार्यकर्ते मंगेश सदाशिव काळोखे (४५) यांची २६ डिसेंबर रोजी सकाळी सात वाजता मुलीला शाळेतून सोडून घरी येताना विहारी परिसरात चारचाकी वाहनातून आलेल्या पाच हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांचा वापर करून त्यांचा खून केला. दरम्यान, मयत मंगेश काळोखे यांचे पुतणे राज निलेश काळोखे (२२) यांनी खोपोली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत, निवडणुकीतील पराभव सहन न झाल्याने ही हत्या झाल्याचा आरोप केला आहे.

आरोपींमध्ये रवींद्र देवकर, दर्शन देवकर, धनेश देवकर, सचिन चव्हाण आणि इतर चार आरोपी यांच्यासह राष्ट्रवादी पान २ वर



### महाड राडा प्रकरण
## तीन आरोपींना अटक

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरात खुनाच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यात फरार असलेल्या तीन संशयित आरोपींना अटक करण्यात महाड पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. महाड शहर पोलीस ठाण्यात या आरोपींविरोधात गुन्हा दाखल होता. त्यांना मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि महाडमधील नांगलवाडी परिसरातून शिताफीने ताब्यात घेण्यात आले. महाड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या खुनाच्या प्रयत्नाच्या घटनेनंतर संबंधित आरोपी फरार झाले होते. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात पान २ वर

### जिल्हाभरात ठिकठिकाणी फौजफाटा तैनात | पोलिसांकडून उपाययोजनांवर भर

# सुरक्षेसाठी रायगड पोलीस सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सरत्या २०२५ या वर्षाला निरोप देण्यासाठी तसेच २०२६ या नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्ह्यात पर्यटक दाखल झाले आहेत. स्थानिक व पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलीस सज्ज आहेत. जिल्ह्यात एक हजार ३८८ सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. त्यात १०५ अधिकारी, ६७२ अंमलदार, ८० वाहतूक पोलीस आणि २०० होमगार्डचा समावेश आहे. तसेच तीन आरसीपी पथकांचीदेखील मदत घेतली जाणार आहे. जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांचा पहारा ठेवला जाणार आहे.


• (छायाचित्र : समीर मालोदे)

थर्टीफर्स्टच्या सेलिब्रेशनसाठी शुक्रवारपासून दिवसांपासून पर्यटकांनी रायगड जिल्ह्यात येण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळांवर मुक्काम ठोकला आहे. विविध हॉटेल, रेस्टॉरंट, कॉटेजेस बुक झाले आहेत. याठिकाणी नाईट पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. वेगवेगळ्या खाद्य पदार्थांवर वेगवेगळ्या सवलती ठेवण्यात आल्या आहेत. मद्याचे पेले रिचवत आणि गाण्याच्या ठेक्यावर पर्यटक धमाल करण्यास सज्ज झाले आहेत.

### गैरकृत्यांवर राहणार नजर

रायगड पोलीस दलाच्या अखत्यारीत २८ पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. नवीन वर्षाच्या स्वागताच्या दृष्टीने जिल्ह्यात विशेष पथक तयार करण्यात आले आहेत. हॉटेल, धाबे, कॉटेजेस, फार्महाऊस येथे होणाऱ्या गैरकृत्यांवर लक्ष ठेवण्यासाठी या पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. दारु पिऊन धिंगाणा घालणे, दारु पिऊन वाहन चालविणे, गांजा, व इतर अंमली व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस पथके व पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे.

अलिबाग, वरसोली, आक्षी, नागाव, किहीम, काशीद, मुरुड, दिवेआगर, हरिहरेश्वर, श्रीवर्धन येथील समुद्र किनारे पर्यटकांनी फुलून गेले आहेत. पर्यटक दाखल झाल्याने हॉटेल, पान २ वर

### दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांनो सावधान

थर्टी फर्स्टच्या निमित्ताने जिल्ह्यातील दारुची दुकानांमध्ये खरेदीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला आहे. लाखोंची उलाढाल होण्याची शक्यता आहे. परंतु, अनेकजण दारु पिऊन वाहन चालवण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे अपघात होण्याची भीती आहे. हे रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांमार्फत ब्रेथ अनालायझरद्वारे चालकांची तपासणी केली जाणार आहे. दारु पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर या यंत्राचे लक्ष राहणार आहे.

Ayurvedic KHO-GO
TRUSTED SINCE 1961
६५ वर्षांचा विश्वास, खोकला जाणार हमखास.
खो-गो गोळ्या घ्या आणि खोकल्यावर त्वरित आराम मिळवा




कफयुक्त खोकला
कोरडा खोकला
घशातील खवखव
घसा दुखणे
इत्यादीवर गुणकारी
खोकल्याच्या त्रासातुन मुक्त होण्यासाठी आजच घ्या आयुर्वेदिक खो-गो
सर्व केमिस्ट मध्ये उपलब्ध
अहिल्या आयुर्वेदिक औषधालय, मुंबई-६३
7304285868
www.khogo.in
65 YEARS OF TRUST

# पैठण-गोळेगणी-परसुले धरण भूसंपादन

## • मोबदल्यापासून शेतकरी वंचित

**भाग-१**

| शैलेश पालकर |

| पोलादपूर |

पोलादपूर तालुक्यातील धरण प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याकामी अक्षम्य दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाकडून पैठण गोळेगणी परसुले धरणाच्या भूसंपादनाचा मोबदला देण्यातही हलगर्जीपणा करण्यात आल्याचे दिसून येत आहे. पैठण आणि गोळेगणीतील शेतकऱ्यांना मोबदला दिला गेला असताना परसुलेतील शेतकरी मोबदल्यापासून वंचित ठेवण्यात आले आहेत. परराज्यातील लोकांकडून परसुले गावातील जमीनखरेदी मोठ्या प्रमाणात झाल्याचीमाहिती प्राप्त होत असताना या व्यवहारांपासून स्थानिक शेतकरी अनभिज्ञ ठेवले गेले आहेत. पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर धरणाच्या सभोवती परराज्यातील एका व्यक्तीने ज्याप्रमाणे कमाल जमीन धारणा कायद्याचे उल्लंघन करीत जमिनीखरेदी केल्याची माहिती चर्चेत आली; त्याचप्रमाणे परसुले येथेदेखील परराज्यातील काही लोकांकडून तब्बल ५० एकरांहून अधिक जमिनींची खरेदी करण्यात आल्याची धक्कादायक माहिती प्राप्त झाली आहे.



पोलादपूर तालुक्यात विकासकामांना सामाजिक, राजकीय, संघटना आणि प्रशासनाची जोड मिळाली की त्यानंतर ज्यांच्यासाठी विकास साधला जात आहे, त्यांच्यावरच अन्याय करण्याची सुप्त इच्छाशक्ती हळूहळू उघड-उघडपणे दिसून येऊ लागली आहे. पोलादपूर तालुक्यातील धरण प्रकल्पांमध्ये अशाप्रकारची अन्यायकारी प्रवृत्ती अनेक बाधितांना अनुभवण्यास मिळाली आहे. पैठण धरण हे अशा सुप्त इच्छाशक्तीतून बाधितांवर अन्याय करण्याचे उदाहरण ठरू पाहात आहे.

तालुक्यातील रानबाजिरे हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे एकमेव धरण पूर्णत्वास जाऊन पाणीसाठादेखील होत आहे, तर देवळे आणि कालवली या दोन धरणांचे अपयश पाहता तालुक्यात धरण प्रकल्प व्हावेत अथवा कसे, याबाबत प्रचंड संदिग्धता आणि गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. यापैकी देवळे धरण १९८५ साली झालेल्या शेतकऱ्यांना एकाचवेळी अत्यल्प मोबदला देऊन झालेल्या भूसंपादनानंतर सलग तीन वेळा ठेकेदारांच्या निविदा काढून आतापर्यंत १२० कोटी रूपये खर्च करून चौथ्यांदा उभारणी सुरू झाली आहे.

मात्र, शेतकऱ्यांना तेव्हापासून आतापर्यंत शेतीसाठी या धरणाचा उपयोग न झाल्याने शेतकऱ्यांनी रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर केले आहे. कालवली धरण हे अपूर्ण राहिले असून, हेटवणे प्रकल्पांतर्गत असल्याचे १० वर्षांपूर्वी उघड झाले असले तरी केवळ गवत व झाडे काढण्यासाठी रोजंदारी कामगार नेमून ठेकेदारी निविदा मंजूर केल्या जात असल्याचे दिसून आले आहे.

लोहारे, तुर्भे, किनेश्वरवाडी, चांभारगणी, कोतवाल, कोंढवी, बोरघर, पैठण असे आठ धरणप्रकल्प नव्याने होण्यासाठी नारळफोडी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी होऊन तालुक्याला पुन्हा एकदा सुजलाम् सुफलाम् होण्याची दिवास्वप्ने पडू लागली. याखेरिज, देवपूर-गांजवणे तसेच ढवळे, कामथे, निवे या भागातील नियोजित धरण प्रकल्प पाटबंधारे विकासाचा अनुशेष नसल्याचा चुकीचा अहवाल राज्यसरकारकडे आल्याने प्रस्तावांच्या बासणातच बंद राहिले. या धरणांच्या कामांच्या निविदा अथवा कोणतीही कार्यवाही सुरू नसताना कथित ठेकेदार आणि त्यावर काम करण्यासाठी महसूल विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी अशी यंत्रणा कागदोपत्री हलवाहलव करीत होती. मात्र, कोणत्याही योजनांचे प्रत्यक्षात काम सुरू झाले नसताना २०१८ मध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी जमिनी खरवडून माती काढण्यासोबतच दगडी आणि झाडे तोडून धरणाचे काम सुरू झाल्याचा दावा सुरू झाला होता.

काही धरणांच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मोबदल्याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत बैठका झडल्या. या बैठकांचे फलीत काहीच निष्पन्न नसताना गौणखनिज उत्खनन आणि वनविभागाच्या नियमांची अवहेलना मोठया प्रमाणात होत राहिली.

यासंदर्भातच, कोविड-१९ नंतरच्या अनलॉकमध्ये कोतवाल धरणाबाबत सुधारित प्रशासकीय मान्यतेची चर्चा सुरू झाली. यानंतर पैठण पांगळोली धरणांच्या विरोध व अनुकुलतेच्या चर्चाही तालुक्यात रंगल्या.

## उमेदवारांना शौचालय वापर प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५२६ चा निवडणूक कार्यक्रम घोषित केला असून, नामनिर्देशन पत्रासोबत उमेदवाराने सादर करावयाच्या विविध शपथपत्रे व घोषणापत्रांबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार नामनिर्देशन पत्रासोबत शौचालय वापर प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. नामनिर्देशनपत्राच्या छाननीवेळी सदर प्रमाणपत्र अथवा स्वयंप्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकारी यांना असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत काही वर्षांपूर्वी केंद्र सरकारने शहरे / महानगरे हागणदारी मुक्त करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढवणा-या उमेदवारांसाठी एक विशेष अट घातली आहे. त्यासाठी दिनांक ०७ मे, २०१६ रोजी सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अपात्रतेबाबतच्या कलमामध्ये शौचालयाचा नियमितपणे वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करेल, अशा व्यक्ती निवडून येण्यास व सदस्य होण्यास निरर्ह ठरेल अशी तरतूद समाविष्ट करण्यात आली होती. म्हणजेच, निवडणूक लढवणारा उमेदवार हा शौचालय वापरणारा असावा अशी ही अट होती. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाबतीत सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद करण्यात आली होती. सन २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीपूर्वीच हा निर्णय घेण्यात आला होता. सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजीच्या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली होती. सहायक आयुक्त/प्रभाग अधिकारी यांनी उमेदवारांना शौचालय वापर प्रमाणपत्र नियमाधीन कार्यवाही करावी. तथापि, शौचालयाची / व्यक्तीची छायाचित्रे काढण्याची आवश्यकता नसून याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घेण्याबाबतच्या सूचना प्रशासनाने केल्या आहेत.

## विविध गुन्ह्यांतील जप्त वाहनांचा होणार लिलाव

| पनवेल | प्रतिनिधी |

पोलीस ठाण्याच्या आवारात विविध गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेल्या एकूण दहा वाहनांचा लिलाव नेरुळ पोलीस ठाण्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

सदर लिलाव हा २७ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून, यामध्ये प्रामुख्याने चार चाकी बोलेरो जीप क्र. एमएच-४८-एच-३२७८, मारुती व्हॅगेनर गाडी क्र. एमएच-४३-बीजे-०२७३, तीन चाकी वाहनांमध्ये बजाज ऑटो रिक्षा क्र.एमएच-४३-बीएफ-७२५३, बजाज ऑटो रिक्षा क्र.एमएच-०३-बीए-५६८९, दुचाकीमध्ये होंडा ॲक्टीव्हा एमएच-०५-डीयू-२८५२, बजाज पल्सर एमएच-४३-१७१, बजाज पल्सर १५० क्र.एमएच-४८-झेड-७४४५, बजाज पल्सर एमएच-०३-बीडी-३७५२, बजाज पल्सर एन १६० क्र.बीआर-०७-एवाय-७२८८ व हिरो होंडा पॅशन क्र.एमएच-१२-ईआर-७७६२ या गाड्यांचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी नेरुळ पोलीस ठाणे फोन नं.००००७७०२३२४ किंवा म.पो.हवा.दळवी ९५९४००१४६२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नेरळ पोलीस ठाण्याच्यावतीने करण्यात आले आहे.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## पारा घसरला, मुरुडचे पर्यटन बहरले!

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड जागतिक पर्यटनाच्या नकाशावर ठळकपणे बोलबाला झालेल्या येथील समुद्र किनाऱ्यांवर नाताळाची सुट्टी साजरी करण्यासाठी असंख्य पर्यटक मुंबई, पुणे, ठाणे व इतर शहरांतून आणि जिल्ह्याच्या विविध भागांतून कुटुंबासह मोठ्या संख्येने पर्यटन आले आहेत. समुद्रकिनारी स्वतःची वाहने घेऊन आल्याने मुरुड किनारी व परिसरातील पर्यटन क्षेत्रावर पर्यटकांची प्रचंड गर्दी झाली आहे.

पाऱ्यामध्ये घसरण होत असल्याने गेल्या काही दिवसांपासून बोचरी थंडी वाढत असताना, दुसरीकडे याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने येत असल्याचे सुखद दृश्य दिसू लागले आहे. रात्रीचे तापमान १८ अंशांपर्यंत खाली आले असून, गारठा वाढून कडाक्याची थंडी सुरू झाल्याने पर्यटकांमध्ये उत्साह जाणवत आहे. थंडीचा जोर असाच कायम राहिला तर अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या थर्टी फर्स्टचा आनंद अधिकच द्विगुणित होणार आहे. आता तापमानात झपाट्याने घट होऊन पारा खाली आल्याने पर्यटकांसह स्थानिकही या थंडीचा मनमुराद आनंद घेत आहेत. थंडी वाढल्याने भल्या सकाळपासूनच समुद्रकिनारा बोलू लागला आहे. अशा वातावरणाचा आनंद घेण्यास मुकलेले अनेकजण सध्या मनमुराद आनंद घेण्यात रंगून गेल्याचे चित्र आहे. पर्यटकांची संख्या वाढल्याने पर्यटनपूरक छोट्या-मोठ्या व्यवसायांनाही उभारी आली आहे. हा आठवडा व्यावसायिकांसाठी महत्त्वाचा असल्याने पर्यटकांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे.

## मुंबई अग्निशमन दलाकडून ‘विशेष अग्निसुरक्षा मोहीम’

| मुंबई | प्रतिनिधी |

नववर्ष निमित्ताने आयोजित स्वागत सोहळ्यांच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडून ‘विशेष अग्निसुरक्षा मोहीम’ हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत मुंबईतील हॉटेल्स, रेस्टॉरंट, पब, बार आदी आस्थापनांमध्ये अग्निसुरक्षाविषयक बाबींची पूर्तता असल्याचे सुनिश्चित करण्यासाठी कसून तपासणी केली जात आहे. दिनांक २२ ते २५ डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण ९०७ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी अग्निसुरक्षेशी संबंधित अटी व शर्तींचे पालन न करणाऱ्या ४१ आस्थापनांविरोधात कारवाई करण्यात आली. तर, १६ आस्थापनांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

नववर्ष स्वागताच्या निमित्ताने मुंबईतील विविध हॉटेल्स, पब, बार, गृहसंकुल व इमारती, समुद्रकिनारा आदी ठिकाणी विविध कार्यक्रम व स्वागत सोहळ्यांचे आयोजन केले जाते. यासाठी नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येतात. या पार्श्वभूमीवर अग्निसुरक्षेबाबत अधिक खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या निर्देशांनुसार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २२ डिसेंबर ते दिनांक २८ डिसेंबर दरम्यान ‘विशेष अग्निसुरक्षा मोहीम’ राबविण्यात येत आहे.

### जाहीर सूचना

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही श्री. कृष्णा नाथा पवार - गाव धामणी, तालुका खालापूर व श्री. अमोल दत्तात्रय पाटील-गाव खोपोली, तालुका खालापूर, जिल्हा रायगड -४१०२०३, महाराष्ट्र यांना संबंधित जागा अर्थात आपटी, वानवटे, होराळे, झाडानी वाडी, पारखंडे, शिंदी वाडी, वायल, टेंभरू व कोपरी, गाव होराळे, पारखंडे, आपटी व्हेरिएट, वायल, तालुका खालापूर जिल्हा रायगड महाराष्ट्र या विवरणाच्या जागेसंदर्भात कंपनीच्या वतीने संबंधित मुखत्यारपत्रामध्ये नमूद बाबी, कामे करण्यासाठी विशेष मुखत्यार अधिकार दि. १९.०२.२०२१ अंतर्गत व कंपनी ठराव वा मुखत्यारांच्या अन्य कोणत्याही अधिकारांतर्गत विशेष मुखत्यरपत्र धारक म्हणून नियुक्त केले होते.

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीने आमची सूचना दिनांकित डिसेंबर, २०२५ अन्वये तात्काळ स्वरूपात सदर मुखत्यारपत्र दि. १९.०२.२०२१ वा अन्य मुखत्यारपत्र वा बोर्डठराव रद्द केला आहे.

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, वरीव व्यक्ती अर्थात श्री. कृष्णा एन. पवार व श्री. अमोल दत्तात्रय पाटील यांच्यासमवेत वरील निर्देशित गावांतील कंपनीच्या मालकीच्या जमिनीसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये.

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, त्यांच्याद्वारे केलेले कोणतेही व्यवहार वा बोलणी ही रद्द व खंडित ठरतील व याचा कंपनीवर कोणताही प्रभाव नसेल वा बंधनकारक नसेल व एखाद्याने असा व्यवहार केला असल्यास तो त्यांची जोखीम व मूल्यावर करतील.

जनतेस इसारा देण्यात येत आहे की कंपनीच्या वतीने कोणाही व्यक्तीसमवेत असा व्यवहार करू नये व एखादी व्यक्ती असा व्यवहार करीत असल्यास त्याकरिताची जोखीम व मूल्य यांची जबाबदारी त्यांची असेल.

डेस्टीनेशन प्रॉपर्टीज् (मॉरिशस) लिमिटेड (डेस्टिनेशन मॉरिशस), कंपनी कोड सी०६६६३९, त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : ३ रा मजला, स्टॅन्डर्डचार्टर्ड टॉवर , एबनी, मॉरिशस ऑफ कॅप्रिकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड (कॅप्रीकॉन), कंपन्या कायदा, २०१३ च्या तरतुदींअंतर्गत भारतीय प्रजासत्ताकाच्या कायद्यांतर्गत संस्थापित एक कंपनी, सीआयएनU45209MH2006PTC185619 व त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : १०४, आम्रपाली, आर. एस महाराज मार्ग, तेली गल्ली, अंधेरी (पूर्व), मुंबई शहर - ४०००६९.

पान १ वरून

## पर्यटकांची कोंडी

अलिबाग-मुरूड, अलिबाग-नागाव रस्त्यावर वाहनांच्या रांगाच रांगा होत्या. अलिबाग ते बेलकडे हे दहा मिनिटाचे अंतर पार करण्यासाठी अर्धा ते एक तास लागला. त्यामुळे पर्यटकांना त्यांच्या निश्चितस्थळी वेळेवर पोहोचता आले नाही. जिल्ह्यातील वेगवेगळ्या मार्गांवर वाहतूक कोंडी झाल्याने ही कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची दमछाक उडाली. वाहतूक पोलीस अपुऱ्या मनुष्यबळाला मदत म्हणून दोनशे होमगार्डची मदत घेण्यात आली. तरीदेखील ही वाहतूक कोंडी सोडविण्यास यंत्रणा अपयशी ठरल्याचे बोलण्यात आले आहे

## द्रुतगती मार्गावर पर्यटकांचे हाल

किलोमीटरच्या रांगा लागल्यामुळे चढणीवर अनेकांची वाहने बंद पडल्याचे पाहावयास मिळाले. यामुळे वाहने बाजूला करताना मोठा वेळ लागत असल्याने वाहतूक कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची दमछाक होत असल्याचे पाहावयास मिळाले. जुन्या महामार्गावर घाट चढताना वाहतूक कोंडीमुळे वाहने बंद पडण्याच्या घटना घडल्याने या मार्गावर ही वाहतूक कोंडीचा फटका पर्यटकांना बसला.

## काळोखे हत्याकांडाचा एसआयटी तपास करावा

येईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी संयम पाळवा, प्रतिक्रिया देणे टाळावे, असे आवाहनही खा. तटकरे यांनी केले आहे.

खोपोलीत शिंदे गटाचे नेते मंगेश काळोखे यांचा निर्घृण खून झाला आहे. या खुनाचा कट अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, प्रवक्ता भरत भगत यांनी केलाचा आरोप शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला असून, काळोखे यांचे पुतणे राज काळोखे यांच्या तक्रारीनुसार घारे आणि भगत यांच्यावर गुन्हा दाखल केल्याने खळबळ उडाली आहे. सुधाकर घारे, भरत भगत यांचे नाव राजकीय वैमनस्यातून गोवले असल्याची प्रतिक्रिया उमटत असताना, या घटनेविरोधात कार्यकर्त्यांनी आक्रमकपणाची भूमिका घेऊ नये यासाठी खा. सुनील तटकरे यांनी कर्जत येथील राष्ट्रवादी भवनात महिला कार्यकर्त्यांची भेट घेऊन संयम राखण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी उबाठाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, कुंडलिक (बंधू) पाटील, प्रदेशाध्यक्ष उपाध्यक्ष सुनील पाटील, युवक जिल्हाध्यक्ष अंकीत साखरे, महिला जिल्हाध्यक्षा उमा मुंढे, कर्जत नगरपरिषद नगराध्यक्षा पुष्पा दगडे, खालापूर तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, कर्जत तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे यांच्यासह राष्ट्रवादी पदाधिकारी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सुधाकर घारे यांनी मी अनेक वर्षांपासून ओळखतो. त्यांचा कर्जत, खालापुरातील जनमानसात आदर आहे, त्यामुळे ते असे घाणेरडे कृत्य करणार नाहीत, याची मला शाश्वती आहे. मंगेश काळोखे यांची झालेली हत्या अत्यंत निंदणीय आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल हत्येचा निष्पक्ष तपास करून आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा करण्यासाठी सहकार्य करतील, असा मला विश्वास आहे. परंतु, या हत्येच्या घटनेत माझ्या नावासहीत वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या जातात, तरीही मी संयम पाळतो. कारण, न्याय देवतेवर आणि पोलिसांच्या तपासावर विश्वास आहे. त्यामुळे सुधाकर घारे यांच्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी संयम पाळावा, असे आवाहन खा. तटकरेंनी केले आहे.

## सुरक्षेसाठी रायगड पोलीस सज्ज

रिसॉर्ट, कॉजेट, लॉजिंग, पर्यटनावर आधारित असणाऱ्या छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची चंगळ होत असल्याचे चित्र आहे. त्यामध्ये स्थानिकांना रोजगाराचे साधन खुले झाले आहे. पर्यटक स्थानिकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांकडून वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात आहेत. जिल्ह्यात एक हजार ३८८ पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये दोन होमगार्ड, तीन आरसीपी पथक, १०५ पोलीस अधिकारी व ६७२ पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**कॅटरससह खाणावळी सज्ज**

पर्यटकांना घरगुती पद्धतीच्या भोजनांचा आनंद घेता यावा यासाठी स्थानिक कॅटरस, खाणावळी यादेखील सज्ज झाल्या आहेत. मोदक, डाळ-भात, पुरणपोळी अशा शाकाहारी पदार्थांबरोबरच मटण वडे, कोंबडी वडे, तसेच ताज्या माशांपासून बनविलेले विविध पदार्थ अशा खास कोकणातील रुचकर पदार्थांवर पर्यटकांना चांगलाच ताव मारता येणार आहे.

**महिलांच्या सुरक्षेवर विशेष पथक**

थर्टी फर्स्टच्या निमित्ताने रायगड जिल्ह्यामध्ये पर्यटक दाखल झाले आहेत. लाखो पर्यटक या दिवशी जिल्ह्यात असणार आहेत. वेगवेगळ्या हॉटेल, कॉटेजेसबरोबरच मोकळ्या जागेत व समुद्रकिनारी पर्यटकांची अलोट गर्दी असणार आहे. नववर्षाच्या स्वागतादरम्यान महिलांच्या सुरक्षेसाठी कडक पावले उचलण्यात आली आहेत. गर्दीचा फायदा घेत महिलांना धक्काबुक्की करणे व इतर काही गैरप्रकार घडू नये यासाठी पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांचे पथक साध्या गणवेशात राहणार आहे. अलिबाग, काशीद, नागाव, दिवेआगर, मुरूड, मांडवा, श्रीवर्धन या समुद्रकिनाऱ्यांबरोबरच शहरातील आणि तालुक्यातील मुख्य बाजारपेठांमध्ये साध्या गणवेशातील पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथक काम करणार आहेत.

**सायबर सेलचे राहणार लक्ष**

शाळा, महाविद्यालयांमध्ये वेगवेगळी शिबिरे घेऊन सोशल मीडियाचा वापर करताना काळजीपूर्वक करण्याचे आवाहन कायमच केले जाते. मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात होत असताना सोशल मीडियाचादेखील वापर होत आहे. नववर्षाच्या निमित्ताने जिल्ह्यात स्थानिकांसह पर्यटकांची प्रचंड गर्दी होणार आहे. समाजमाध्यमांवर कोणीही व्हीडीओ, छायाचित्र, ऑडीओ क्लिपद्वारे आक्षेपार्ह मेसेज टाकून दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी सायबर सेलची मदत घेतली जाणार आहे. सोशल मीडियावर काही आक्षेपार्ह मेसेज, व्हीडीओ टाकणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याची माहिती सायबर पोलिसांनी दिली.

## नादुरुस्त रस्त्याला आश्वासनांचे डांबर

त्यांचा तो सोमवार अद्याप उजाडलेला नाही. त्यामुळे धायतडक यांच्याकडून आश्वासनांची डांबर लावण्यात आली असून, प्रत्यक्षात मात्र रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले नाही. मात्र, गेल्या चार दिवसांपासून वावेपासून रस्त्याचे काम सुरु आहे. परंतु, या कामाबाबतही अनेकांकडून प्रश्न उपस्थित केला जात आहे. खडीकरण करण्याऐवजी थेट डांबरी कारपेट लावण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे हा रस्ता फार काळ टिकणार नसल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, बेलकडे ते कुरुळ कॉलनी वसाहत प्रवेशद्वारापर्यंतचा रस्ता एमएसआयडीसाचा असल्याचे सांगून आपल्याकडील जबाबदारी झटक्याचे काम धायतडक यांच्याकडून करण्यात आले. बांधकाम विभागाच्या या निष्काळजीपणामुळे कुरुळ ते बेलकडे मार्गावरून प्रवास करताना चालकांसह प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. फक्त बघ्याची भूमिका घेतली जात आहे. याच रस्त्यावर गेल्या चार दिवसांपूर्वी डांबर टाकून खड्डे बुजविण्याचे काम केले. परंतु, काही तासातच पुन्हा रस्ता उखडला. त्यामुळे खड्डे बुजविण्यासाठी देण्यात आलेल्या रामेश्वर कंपनीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

## आठ आरोपींना ठोकल्या बेड्या

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे व प्रवक्ते भरत भगत यांचा कटात सहभाग असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

दि. २६ डिसेंबर रोजी या हत्येनंतर जुन्या मुंबई-पुणे महामार्गालगत असलेल्या खोपोली पोलीस ठाण्याबाहेर मयत मंगेश काळोखे यांचे समर्थक मोठ्या संख्येने जमा झाले होते. संतप्त महिला व कार्यकर्त्यांनी आक्रोश करत आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या घटनेच्या पार्श्वभूमीवर खोपोली शहरातील व्यापाऱ्यांनी बाजारपेठ बंद ठेवून निषेध व्यक्त केला. दिवसभर पोलीस ठाण्याबाहेर मोठी गर्दी पाहायला मिळाली. संतप्त समर्थकांनी काही काळ मुंबई-पुणे मार्गसुद्धा अडवला होता. दरम्यान, या घटनेनंतर रायगडच्या पोलीस अधीक्षक आचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी घटनास्थळी उपस्थित राहून तपासाला गती देण्याचे आदेश दिले आहेत.

यामधील राजकीय नावे आल्यानंतर सुधाकर घारे यांनीसुद्धा या प्रकरणाशी आमचा संबंध नसल्याचे एका व्हिडिओच्या माध्यमातून सांगितले असता, या हत्येतील मुख्य आरोपींना नागोठणे येथून पोलिसांनी अटक केली आहे. यामध्ये रवींद्र देवकर व दर्शन देवकर यांच्यासह अन्य सहा आरोपींच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहे. मात्र, त्या सहा आरोपींची नावे समजली नसून, अन्य आरोपींचा अधिक तपास पोलीस प्रशासन घेत आहे. या हत्येतील एकूण आठ आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. यासाठी पोलिसांची आठ पथके आरोपींचा वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेत आहेत. या घटनेनंतर जोपर्यंत सर्व आरोपी अटक होत नाहीत, तोपर्यंत शांत राहणार नाही, पोलिसांना दोन दिवसांचा अल्टिमेटम आ. महेंद्र थोरवे दिला असून आक्रमक पवित्रा घेतला आहे.

## महाड राड्याप्रकरणी तीन आरोपींना अटक

घेता आरोपींचा तातडीने शोध घेण्याचे आदेश वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आले होते.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक तसेच महाड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष तपास पथके तयार करण्यात आली. आरोपींच्या हालचालींवर तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गुप्त माहितीच्या आधारे लक्ष ठेवण्यात येत होते.

पहिले पथक, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे, पोलीस उपनिरीक्षक गर्जे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे मुंबई गाठली. संशयित आरोपी प्रतिक प्रताप शिंदे (वय ३३, रा. प्रभात कॉलनी, महाड) आणि प्रतिक नरेश पवार (रा. नांगलवाडी, महाड) हे मुंबईहून विमानाने गोव्याला पळून जाण्याच्या तयारीत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, सहारा पोलीस ठाण्याच्या मदतीने मुंबई विमानतळावर सापळा रचण्यात आला आणि ऐनवेळी दोन्ही आरोपींना शिताफीने ताब्यात घेण्यात आले. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असल्याने ही कारवाई विशेष महत्त्वाची ठरली.

दुसऱ्या पथकाचे नेतृत्व पोलीस निरीक्षक रमेश तडवी करत होते. त्यांना मिळालेल्या माहितीनुसार, तिसरा संशयित आरोपी अमित अशोक कदम (रा. नांगलवाडी, महाड) हा आपल्या घरी लपून बसल्याचे समजले. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून त्याला त्याच्या राहत्या घरातून अटक केली.

अटक करण्यात आलेल्या तिन्ही आरोपींना २७ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृतपणे अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने तिन्ही आरोपींना २९ डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या यशस्वी कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे, पोलीस निरीक्षक रमेश तडवी, पोलीस उपनिरीक्षक गर्जे तसेच पोलीस कर्मचारी भोईर, सुरडकर, कदम, मोरे, डवले, होळकर, कदि आणि केंदळे यांनी मोलाची भूमिका बजावली.

महाड पोलीस सध्या या गुन्ह्याचा सखोल तपास करत असून, गुन्ह्यामागील नेमका हेतू, इतर संभाव्य साथीदार तसेच वापरण्यात आलेली शस्त्रे याबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी आरोपींची कसून चौकशी सुरू आहे.

## माणगाव बसस्थानकात खोळंबा

प्रवाशांची वर्दळ असते. मात्र, दर तासाला लोकल एसटी फेरी उपलब्ध नसल्याने प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. वेळेवर बस न मिळाल्यामुळे अनेक कर्मचारी कामावर उशिरा पोहोचले, तर विद्यार्थ्यांच्या परीक्षा व कॉलेजच्या वर्गांना मुकावे लागले.

मुंबईकडून येणाऱ्या एसटी बसेस आधीच प्रवाशांनी फुल्ल भरलेल्या असतात. त्यामुळे काही वेळा चालक व वाहक स्थानिक प्रवाशांना बसमध्ये घेण्यास नकार देत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या. स्लीपर कोच बसेसमध्ये उभ्या प्रवाशांना प्रवेश दिला जात नसल्याने अनेक जण तासन्तास प्रतीक्षेत उभे राहिले. त्यातच माणगाव एसटी स्थानकाचे बांधकाम सुरू असल्याने बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था नाही. उन्हाच्या तीव्रतेत प्रवाशांना उभे राहावे लागत असून, महिला, वृद्ध, लहान मुले आणि आजारी प्रवाशांचे विशेष हाल होत आहेत. पिण्याचे पाणी, सावली आणि स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांचा अभावही जाणवतो.

प्रवाशांच्या मते, ही समस्या नवीन नसून एसटी प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. गर्दी लक्षात घेऊन वेळापत्रकात बदल, अतिरिक्त बसेस किंवा तात्पुरत्या फेऱ्या लावण्याबाबत ठोस निर्णय घेतला जात नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर प्रवाशांनी माणगाव, श्रीवर्धन, म्हसळा मार्गावर दर तासाला लोकल एसटी फेरी सुरू करावी, गर्दीच्या वेळेत अतिरिक्त बसेस लावाव्यात, तसेच स्थानकातील सुविधा तातडीने सुधाराव्यात, अशी जोरदार मागणी केली आहे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास प्रवासी संघटनांच्या माध्यमातून आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# निवडक

## मद्यतस्करीवर पनवेल शहर उत्पादन शुल्काची कारवाई

पनवेल : उत्पादन शुल्क पनवेल शहर विभाग यांनी गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य तस्करीवर धडक कारवाई केली आहे. या कारावाईत त्यांनी ६६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी मद्याची विक्री करणारा आरोपी निखिल तामधाडे याच्यासह त्याच्याकडून माल घेणारा पंकज नेमोडे अशा दोघांना अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निखिल तामधाडे हा गोवा राज्य निर्मित दारू विक्रीच्या उद्देशाने मडगाव-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल तेजस एक्सप्रेसमधून दारूने भरलेली बॅग घेऊन उतरणार असल्याची माहिती पनवेलच्या राज्य उत्पादन शुल्क यांना मिळाली होती. या माहितीनुसार पथकाने सापळा रचला. परंतु, तेजसला सापळ्याची चाहूल लागल्याने त्याने ती बॅग प्लॅटफॉर्मवर टाकली आणि तो त्याच रेल्वेमध्ये पुन्हा चढून रेल्वे बरोबर पुढे निघून गेला. त्यानंतर या राज्य उत्पादन शुल्काच्या पथकाने ठाणे रेल्वे स्टेशन येथे माल घेण्यासाठी आलेला पंकज नेमोडे याला अटक केली. त्यानंतर निखिल याला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथे अटक करण्यात आली. या कारवाईतून ६६ हजार ३२५ रुपये किंमतीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई निरीक्षक भानुदास फणसेकर, दुय्यम निरीक्षक योगेंद्र लोळे, कृष्णा देवरे, योगेश पाडाळे, अजित बडदे, सुरज बुधवाले, ऋषिकेश भोगे यांच्या पथकाने केली.



## नामदेव खैरे यांचा स्मृतीदिन संपन्न

**पाली** : भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. नामदेव येसु खैरे यांचा ३२ वा स्मृतिदिन व शाळेचे वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि.२७) पार पडला. हा सोहळा संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदगाव येथील संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात संपन्न झाला. महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त चित्रकला, हस्तकला, रांगोळी प्रदर्शन व वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला रांगोळी स्पर्धेचे उदघाटन नांदगाव प्रभारी सरपंच रुपाली भणगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आत्माराम बेलोसे, जे.बी. गोळे, भारती शेळके, किसन उमटे, दिनकर काटकर, संविता हंबीर, समृद्धी यादव, एकनाथ पडवळ, बळीराम निंबाळकर, वसंत शेळके, सुमेध खैरे, बबन पालवे, शिक्षक वृंद तसेच तालुक्यातील सरपंच, उपसरपंच व पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान, प्राचार्य पालवे यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख आपल्या प्रास्ताविक मध्ये मांडला. माजी प्राचार्य निंबाळकर यांनी, ही शाळा उभी करत असताना आलेल्या समस्या आणि परिसरातील लोकांचे लाभलेले सहकार्य यांचा उल्लेख त्यानी आपल्या मनोगतातून केला.

## जोडीदाराचा महिलेसह मुलीवर हल्ला

**पनवेल :** लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने चारित्र्याच्या संशयातून जोडीदार महिलेसह तिच्या मुलीवर चाकूने सपासप वार करून दोघींना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना पनवेलच्या आदई गावात घडली. या घटनेनंतर खांदेश्वर पोलिसांनी आरोपी रितेश सिंग विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.रितेश सिंग हा गेल्या चार वर्षांपासून सोनम जांगीड (४२) या महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये पनवेलमधील आदई गाव येथील गायत्री इंद्रप्रस्थ इमारत राहत होता. रितेश सिंग याला सोनमच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यातून त्याने दोघी झोपल्या असताना त्यांच्यावर चाकून वार करुन त्यांना जखमी करुन स्वतःला जखमी केले.




## पिल्लई कॉलेजचा स्तुत्य उपक्रम

**पाताळगंगा** : पिल्लई एच.ओ.सी कॉलेज ऑफ आर्ट्स,कॉमर्स व सायन्स शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी एन.एस.एस.च्या माध्यमातून गेले सात दिवस ग्रुप ग्राम पंचायत माजगाव या परिसरात वास्तव्ये करून समाज प्रबोधनाचे काम करून ग्रामस्थांमध्ये जनजागृती निर्माण केली.यावेळी प्लास्टिकविरोधी जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. या रॅलीचा मुख्य उद्देश लोकांमध्ये प्लास्टिकच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम समजावून सांगण्यात आले.तसेच प्रत्येक दिवशी वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात आले. यावेळी प्लास्टिक किती घातक आणि त्यांचे दुष्परिणाम याबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आदिवासी वाडी येथे ब्लँकेट वाटप, स्वच्छ भारत अभियानावर पथनाट्य सादर करण्यात आले. राजिप शाळेच्या शाळेच्या भिंतीवर चित्रकलेनी, या भिंती रंगविण्यात आल्या. रक्तदान हे सर्वात मोठे दान असून रक्तदान शिबिर व भव्य वैद्यकीय तपासणी विठ्ठल मंदिर माजगाव येथे आयोजित करण्यात आली. यावेळी वृक्ष लागवड, दारूचे दुष्परिणाम, जलप्रदूषण, मृदासंवर्धन आणि मृदाप्रदूषण, प्राण्यांना होणारी हानी व मानवी आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम गेले सात दिवस या परिसरातील ग्रामस्थांना हे विद्यार्थी सातत्याने मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन, कार्यक्रम अधिकारी कलावती उपाध्ये यांनी पाहिले. एनएसएस लीडर अवधूत कडू, भूमिक गोलप, स्मृती वेदांती, साहिल, सुजल तसेच विद्यार्थी, सरपंच, उपसरपंच, सदस्य आजी माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आगरदांडा येथे आरोग्य शिबीर

**कोर्लई** : मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आयुष हॉस्पिटलतर्फे आगरदांडा ग्रामपंचायतीत सरपंच आशिष हेदुलकर यांच्या सहकाऱ्यातून मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. यावेळी आयुष हॉस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर बालरोग तज्ज्ञ डॉ.अनिल गोस्वामी, दंततज्ञ डॉ.डायना, डॉ. सिद्धांत पाटील, डॉ. गीतांजली गरिमा आणि त्यांच्या टीमने आगरदांडा व आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली. त्यामध्ये स्त्री रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, दंत रोग तज्ज्ञ आणि जनरल फिजिशियन यांनी तपासणी करून रूग्णांना मोफत औषधे देण्यात आली.

# सिडकोच्या हॉटेल भूखंडाबाबत भ्रष्टाचार?

## सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याची मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सीबीडी बेलापूर येथील सिडकोच्या मालकीचे भुखंड फक्त तारांकीत हॉटेल उभारण्यासाठी भाडेकराराने देण्यात आले होते. मात्र, या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पडसाद आता सिडकोच्या भूखंड विक्रीवर होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. या निर्णयामुळे पीव्हीपी स्टार हॉटेल विकासकाला प्रचंड फायदा होणार असून सिडकोचे मात्र शेकडो कोटींचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे सिडकोने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याची मागणी जोर धरु लागली आहे.




२००८ साली सिडकोने पामबीच मार्गावर एनआरआय कॉम्प्लेक्स समोर प्रभाग ४६ मध्ये तब्बल ४७ हजार चौ.मीटर क्षेत्रफळाचा भूखंड अविनाश भोसले यांच्या मेट्रो पोलिस हॉटेलला १८० कोटी रुपयास निविदेद्वारे दिला होता. मात्र, अविनाश भोसले यांनी त्या भूखंडावर हॉटेल न उभारता भूखंडाचे दोन तुकड्यांमध्ये भाग करून भिन्न विकासकांना ९०० कोटीहून अधिक रक्कमेला विकला आहे. तसेच, त्या विकासकांना निवासी व वाणिज्य वापराकरिता भूखंड वापर बदलाची परवानगी देखील सिडकोने दिली असल्याचे बोलले जात आहे. त्याचपद्धतीने पीव्हीपी व्हेंचर्स या हाँगकाँग बेस कंपनीला देखील सिडकोने बेलापूर किल्ला परिसरात पंचतारांकित हॉटेल उभारणीसाठी भूखंडाची विक्री केली होती. मात्र, त्या कंपनीने देखील स्टार हॉटेलची उभारणी न करता हा भूखंड सिडकोची कोणतीही पुर्व परवानगी न घेता, नवी मुंबईतील एका बांधकाम व्यावसायिकाला विकला आहे. त्यानंतर या बांधकाम व्यावसायिकाने या भूखंडाच्या वापरात बदल करण्याकरिता राज्यकर्त्यांद्वारे सिडकोवर दबाव सुरू ठेवला होता. अखेर त्या बांधकाम व्यावसायिकाला भूखंडाचा वापर बदल करून घेण्यात नुकतेच यश आले आहे. त्याशिवाय नोव्हेंबर २०२२मध्ये सिडकोने अपोलो हॉस्पिटल नजीकचा भूखंड तारांकित हॉटेलकरिता विक्रीस काढताना तारांकित हॉटेलचा अनुभव नसलेल्या कंपन्यांना व बांधकाम व्यावसायिकांना निविदेत सहभागी करून घेतले होते. या भूखंड विक्री योजनेतून भ्रष्टाचाराचे नवीन कुरण उघडल्याची ओरड झाली होती.

दरम्यान, याप्रकरणी न्यायमूर्ती ए.एस. गडकरी व न्यायमूर्ती श्याम सी. चांडक यांच्या खंडपीठाने दिलेला आदेश सध्या चर्चेचा विषय झाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यकर्ते व अधिकाऱ्यांशी संगनमत करुन विकासकांचा सिडको संचालक मंडळाने मंजूर केलेल्या भूखंड वापर बदल ठरावाचा फायदा घेत तारांकित हॉटेल उभारणीसाठी विक्री केलेले भूखंड वाणिज्य अथवा निवासी वापराखाली आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तर, राज्यकर्त्यांच्या दबावाखाली तारांकित हॉटेलच्या नावाखाली भूखंड विक्रीस काढून ते ठराविक बिल्डर्सच्या घशात घालण्यासाठी सिडको अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराची नवी दुकाने सुरु केली आहेत, असा आरोप आता होऊ लागले आहेत. त्यामुळे तारांकीत हॉटेलसाठी भूखंड विक्री करायची आणि अल्प प्रिमियम आकारून तेथे निवासी व व्यावसायिक वापरासाठी परवानगी देऊन भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे धंदे आता सिडकोत जोराने सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सिडकोने उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याची मागणी जोर धरु लागली आहे. त्यांनी असे न केल्याच संशय अधिकच बळावेल, असे देखील बोलले जात आहे.



# न्हावे येथे मोफत नेत्रतपासणी

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

मनोज भायतांडेल यांच्या वाढदिवसानिमित्त राज्य शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या सौजन्याने लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटपाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होत.तसेच श्रीमती शांतीबाई ओ. जैन आयुर्वेदिक रुग्णालय नागोठणे यांच्या मार्फत मोफत बाह्य रुग्ण निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर न्हावे येथील गावदेवी मरुआई मंदिर परिसरात पार पडले. या आरोग्य शिबिराचा एकूण ११५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आलिबाग विधानसभा सह संपर्क प्रमुख प्रमोद कासकर, तालुका प्रमुख नितीन वारंगे, उपतालुका प्रमुख अनिल माळी, दुर्गेश नाडकर्णी, सचिन फुलारे, चणेरा उप विभाग प्रमुख अरुण कोंडे, विकास भायतांडेल, सरपंच नितीन डबीर, उपसरपंच पांडूरंग कासकर, अमित कांबळे, यशवंत झुरे, मोहन न्हावकर, जयेश पाटील, गोविंद भायतांडेल, सुशांत पोसतोडेल, राम पाटील, सुजाता झुरे, सुनिल पाटील, विजय पाटील, सुधिर पाटील यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामस्थ व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# चोरीच्या आरोपामुळे मुलीची आत्महत्या

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

घरातील नातेवाईकांनीच दागिने चोरीचा संशय घेत १७ वर्षीय मुलीचा प्रचंड मानसिक छळ केला जात होता. या छळाला कंटाळून या अल्पवयीन मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना कळंबोली भागात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनेश यादव (४०) हे कळंबोली प्रभाग १४ मध्ये एकत्र कुटुंबासह वास्तव्यास आहेत. २ सप्टेंबर रोजी यादव कुटुंबीयांच्या गणपतीचे विसर्जन सुरू असताना, काकू सुशीला यादव यांच्या घरातील पाच तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीस गेले होते. या चोरीचा संशय दिनेश यादव यांची १७ वर्षीय मुलगी मानसीवर घेण्यात आला होता. त्यामुळे काका रमेश यादव यांनी मानसीला आपल्या घरी बोलावून दागिने चोरीच्या संशयावरून तिला जाब विचारला होता. तसेच, काकू व चुलत बहिणीने तिच्या चारित्र्यावर संशय घेत अत्यंत अपमानास्पद आरोप तिच्यावर केले होते. त्यानंतर रमेश यादव यांनी आपल्या पुतणीविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर मानसीला जबरदस्तीने कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले होते. तसेच, मानसी व तिच्या मित्राविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. हा अपमान सहन न झाल्याने मानसीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. या प्रकरणाचा कळंबोली पोलिसांनी तपास करत रमेश यादव (६३), त्यांची पत्नी सुशीला यादव व मुलगी करिश्मा यादव या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आता रमेश यादव यांना अटक करण्यात आली आहे.




सध्या रब्बी हंगाम सुरु असल्याने शेतकऱ्यांनी भातशेती नंतर पांढरा कांदा, वाल, हरभरा पिकाची लागवड केली आहे. या पिकाचे पक्षी, प्राण्यांकडून नुकसान होऊ नये म्हणून शेकऱ्यांनी रखवालदार म्हणून बुजगावणे उभे केले आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

# कायदा, सुव्यवस्था मार्गदर्शन कार्यक्रम

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

कौटुंबिक व शाळा, महाविद्यालय व सार्वजनिक ठिकाणी वावरत असताना मुलींना गुड टच-बॅड टचची जाणीव होणे गरजेचे आहे. एखादी अनोळखी व्यक्ती अथवा टवाळखोर मुलगा आपल्याकडे वाईट हेतुने बघतो आहे, डोळ्याने किंवा हाताने इशारे करतो आहे किंवा आपल्या एकटेपनाचा अथवा गर्दीची संधी साधुन आपल्या शरीराला स्पर्श करतो आहे. अशावेळी समजायचे की तो आपल्याला बॅड टच करीत आहे. असा स्पर्श मुलींना टाळायचा असतो. आपल्यासोबत असे काही घडले तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. याबाबत जागृत राहून आपल्या पालकांना, नातेवाईकांना किंवा पोलिसांना माहिती द्यावी, असे आव्हान सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी केले. म्हसळा शहरातील पीएमश्री शाळा क्रमांक १च्या विद्यार्थ्यांना मुलींचा कायदा व सुव्यवस्था मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रप्रमुख मारुती धामणकर, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष शशिकांत शिर्के, दीपाली सोनवणे, उपाध्यक्ष निजामपूरकर, सदस्य संपदा पोतदार, निधी दुर्गे, मुख्याध्यापक सुमित्रा खेडेकर, श्रीधर उमदी आदी उपस्थीत होते.



## महिला शिक्षिकांची विद्यार्थ्याला मारहाण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे येथील एका नामांकित शाळेतील दोन महिला शिक्षिकांनी पहिलीत शिकणाऱ्या ६ वर्षीय विद्यार्थ्याला बेदम मारहाण करुन त्याला शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी दोन्ही महिला शिक्षिकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलाच्या वर्ग शिक्षिकेने दुसऱ्या वर्गातील मुलीला बोलावून त्याच्या ५ ते ६ वेळा जोरात गालात मारायला लावले. विशेष म्हणजे मारण्याचा प्रकार घडत असताना ही शिक्षिका हसत ते पाहत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. याबाबत पालकांनी मुख्याध्यापिकेकडे लेखी तक्रार करुन सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली होती. मात्र, मुख्याध्यापिकेने फुटेज देण्यास नकार देत हे प्रकरण मिटवले. तसेच, पुन्हा असे होणार नाही, असे आश्वासन दिले होते. मुख्याध्यापिकेच्या आश्वासनानंतरही इंग्रजी विषयाच्या शिक्षिकेने पीडित मुलाला कंपास बॉक्सने तोंडावर मारले. या मारहाणीमुळे चिमुरड्याचा ओठ सुजला. पालकांनी पुन्हा शाळेत धाव घेतली असता, मुख्याध्यापिकेने सीसीटीव्ही फुटेज देण्याऐवजी पालकांसोबत उद्धट वर्तन केले. शाळेच्या या आडमुठ्या धोरणामुळे संतप्त झालेल्या पालकांनी अखेर कामोठे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## फसवणूक करणाऱ्या दुकलीला अटक

**पनवेल :** कॉलगर्लपुरवण्याच्या नावाखाली फेक वेबसाईटच्या माध्यमातून तामिळनाडू परिसरातील १८ नागरिकांची हजारो रुपयांची फसवणूक करणाऱ्या १३ जणांना पनवेल तालुका पोलिसांनी तिरुपुर सायबर पोलिसांच्या साहाय्याने अटक केली आहे. तामिळनाडू मधील तिरुपुर सायबर पोलीस विभागाकडे काही जणांनी फेक वेबसाईटच्या माध्यमातून आपली फसवणूक झाल्याची तक्रार केली होती. यामध्ये एकूण १८ तक्रारदारांनी ५३ हजार रुपये लुबाडल्याची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे तिरुपुर सायबर पोलीस ठाण्याने शोध घेत असताना अशाप्रकारच्या गुन्ह्यासंदर्भात पाँडिचेरी व कोईम्बतूर येथे दोघा जणांना अटक झाली. ते पुन्हा ॲक्टिव्ह झाले असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार त्यांचा शोध घेतला असताना पनवेलमधील इंडियाबुल्स या सोसायटीमध्ये ते वास्तव्यास असल्याचे माहिती मिळाली.

# वडगाव येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

वडगांव येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम रहावे. तसेच, त्यांनी नियमित शाळेत यावे. या उदात्त विचारांतून रायगड जिल्हा शासकीय रुग्णालय परिचर्या प्रशिक्षण केंद्र अलिबागच्यावतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी प्रथम वर्ष शिक्षण घेत असलेल्या ए.एन.एम. च्या विद्यार्थ्यांनी दात, डोळे, कान,



त्वचा व इतर संसर्गजन्य रोग तपासणी करून योग्य ती औषधे देण्यात आली.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. त्याच बरोबर ग्रामीण रुग्णालय लोहप यांचा ही मोठ्या प्रमाणात सहभाग लाभला. मुलांनी उत्तम सवयी, लावणे स्वतःची काळजी घेणे, व्यसनापासून दूर राहणे, तसेच किशोरवयीन मुलींना स्वच्छता व शारीरिक बदल तसेच घ्यावयाची दक्षता व आदि विषयी मार्गदर्शन करण्यात आले. या आरोग्य तपासणी कार्यक्रमाला जिल्हा रुग्णालयाच्या अधिसेविका गायत्री म्हात्रे, परिचर्या अधिकारी सारिका पाटील, पाठ्यनिर्देशिका स्वाती मोरे, नाजेमोद्दीन काझी, मुख्याध्यापक सुभाष राठोड, संचालन शिक्षक वैजनाथ जाधव आदी उपस्थित होते.

**आश्रमशाळेतील विद्यार्थ्याची मोठी भरारी** | **साकारले बिबट्या रक्षक चिलखत**

# आदिवासी गटातून राज्य पातळीवर निवड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील माणगाव वाडी येथील आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनात मोठी भरारी घेतली आहे. या शाळेच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रदर्शनात मांडलेले बिबट्या रक्षक चिलखत या प्रतिकृतीला जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळाला आहे. दरम्यान, बिबट्याचा हैदोस घातला असल्याने बिबट्या रक्षक चिलखत ही प्रतिकृती सर्वांचे लक्ष वेधत आहे.**





गेल्या काही महिन्यांत बिबट्या आपला आदिवास सोडून मानव वस्तीत प्रवेश करू लागले आहेत. त्यात अनेकांचे जीव गेले असून मोठ्या प्रमाणावर लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर बिबट्याच्या हल्ल्यापासून वाचण्यासाठी शासनाकडून अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र, तरीदेखील हल्ले वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळेतील मुलांनी एक नवी शक्कल लढवत ती प्रतिकृतीतून जिल्हा विज्ञान प्रदर्शनात मांडली. त्यात माणगाव वाडी येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी विकास हिंदोळे या सातवीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने यावेळी बिबट्या रक्षक चिलखत ही प्रतिकृती सादर केली. त्याची ही प्रतिकृती रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर राहिली.

दरम्यान, कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शनामध्ये बिबट्या रक्षक चिलखत ही प्रतिकृती प्राथमिक विभागात आदिवासी गटामध्ये प्रथम आली होती. त्यानंतर जिल्हा विज्ञान प्रदर्शनामध्ये आदिवासी विभागात देखील प्रथम आली असून ती प्रतिकृती आता राज्य पातळीवर पोहचली आहे.

बिबट्याच्या हैदोसाने सर्व हैराण आहेत. त्यावर राज्य सरकार देखील हतबल आहे. त्यात आदिवासी आश्रमशाळेचा विद्यार्थी विकास हिंदोळे याने आपले मार्गदर्शक शिक्षकांचे सहकार्य घेऊन बिबट्या रक्षक चिलखत ही उदयोन्मुख तंत्रज्ञान विकसित केले आहे. हे चिलखत टाकावू पासून टिकावू अशा स्वरूपात बनवले गेले आहे. त्यात शेतकरी, मेंढपाळ आणि वन कर्मचारी यांच्यासाठी ही तंत्रज्ञान मदतगार ठरेल असा विश्वास आहे. तसेच, जंगलात चारा खाण्यासाठी गेलेले जनावरे, कुत्रे, शेळ्या यांचे रक्षण हे चिलखत करू शकते, असा दावा देखील त्याने केला आहे.

> **“या चिलखतात लोखंडी खिळे बसवले असून आपल्या अंगावर बिबट्याने झडप घातली तर त्यावेळी बिबट्याच्या अंगात खिळे टोचून तो जखमी होऊ शकतो. तर, कोणताही प्राणी मानेवर हल्ला करतो हे लक्षात घेऊन त्या बिबट्या रक्षक चिलखतमध्ये मानेचा खास पट्टा बनवून घेतला आहे. त्या पट्ट्यात लोखंडी लहान खिळे लावले असून त्या आधारे आपले रक्षण होऊ शकते. हा बिबट्या रक्षक चिलखत बनविण्यासाठी काहीही मोठा खर्च येत नाही. या प्रकल्पामध्ये मुख्याध्यापक नंदकुमार इकारे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मोलाचे योगदान लाभले आहे.”**
>
> **– विकास हिंदोळे, विद्यार्थी**

## निवडक

### कृषी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा



**रोहा** : हा देश शेतीप्रधान आहे. शेतकरी समृद्ध झाला तर आधी गाव मग देश समृद्ध होईल. त्यातून आम्हालाही मार्गदर्शन मिळत जाईल. शेती व निसर्गाशी एकरूप होण्याचे हे कार्य आहे. शेतीची आवड निर्माण करत तरुणांना दिशा देणारी बळीराजा फाऊंडेशन ही संस्था आहे. कृषी दिनदर्शिका प्रकाशन करताना मनस्वी आनंद होत आहे, असे मत रोहा अष्टमी नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी व्यक्त केले. बळीराजा फाऊंडेशनच्या कृषी दिनदर्शिका २०२६ प्रकाशन सोहळा शुक्रवारी (दि.२६) पार पडला. त्यावेळी त्या बोलत होत्या. रोहा येथील शासकीय विश्रामगृहात नगराध्यक्षा वनश्री शेडगे, तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांच्या हस्ते दिनदर्शीकेचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी कृषी अधिकारी महादेव करे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरिवले, सिटी ऑफ फ्लॉवर्सचे सुरेंद्र निंबाळकर, नगरसेवक रोशन चाफेकर, बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, सचिव ॲड दीपक भगत, रविंद्र कान्हेकर व मान्यवर उपस्थित होते.

### ई-आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न


**नवीन पनवेल** : पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि आयक्युएसी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२४) ट्रान्सफॉर्मिंग इंडियन एग्रीकल्चर टू वर्ड्स आत्मनिर्भर भारत टेक्नॉलॉजी इनोव्हेशन अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर आधारित एकदिवशीय आंतराष्ट्रीय ई-चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. बद्री नारायणन यांनी, आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतामध्ये कृषी क्षेत्रामध्ये एआय तसेच तंत्रज्ञानाच्या वापरासह अमुलाग्र बदलाची गरज असल्याचे सांगितले. तर, प्रमुख मार्गदर्शक सुनील मदन यांनी जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये कृषी क्षेत्रामध्ये नाविन्यासह बदल होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. दरम्यान, या चर्चासत्राची सुरुवात प्रास्ताविक करून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केली. तसेच, आंतरराष्ट्रीय ई- चर्चासत्राचे महत्त्व सांगताना त्यांनी आत्मनिर्भर भारतासाठी कृषी क्षेत्रामध्ये एआय तंत्रज्ञान यांचे किती महत्त्व आहे हे देखील थोडक्यात समजावून सांगितले.

### जांभिवली शाळेचा कायापालट



**नवीन पनवेल** : इनर वॉईस सोशल वेल्फेअर फाऊंडेशनकडून जांभिवली शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. जांभिवली शाळेचा शैक्षणिक व भौतिक दर्जा वाढविण्याच्या उद्देशाने इनर वाईस सोशल वेल्फेअर फाऊंडेशन यांच्याकडून शाळेला रंगरंगोटी, शौचालय दुरुस्ती, ग्रील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व खेळाचे साहित्य, अंगणवाडीतील मुलांना स्कूल बॅग व वॉटर बॉटल व इतर साहित्य तसेच डिजिटल क्लासरूम, ग्रीन बोर्ड, घंटा, घड्याळ, फॅन, ट्यूब अशाप्रकारे भरघोस सहाय्य करून जांभिवली शाळेचा कायापालट करण्यात आला. या शाळा नूतणीकरण कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा बुधवारी (दि.२४) पार पडला. या कार्यक्रमासाठी फाऊंडेशनचे अध्यक्ष सुयोग कारंडे, सचीव श्रीगणेश खंदारे, खजिनदार निलेश शिंदे, एलएएचएसचे डायरेक्टर गुलाबराव जाधव, उपाध्यक्ष व्ही. एन. घनवट, सहसचिव प्रकाश रोकडे, मुकुल साळुंखे, दिक्षा मोरे, सरस्वती हेब्बर, वावेघर केंद्राचे केंद्रप्रमुख काशिनाथ जाधव, सु.म. जोशी, वावेघर केंद्रातील शाळांचे मुख्याध्यापक, जांभिवली शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, ग्रामपंचायतीचे ग्राम अधिकारी तसेच सरपंच, उपसरपंच, सर्व कर्मचारी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जनजागृतीसाठी खास मतदान यंत्र




**पनवेल** : अगामी महानगरपालिका निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर पालिका प्रशासनाकडून मतदान जनजागृतीसाठी वेगवेगळी उपाययोजना केली जाते. त्यातच पनवेल महानगरपालिकेने पालिकेच्या प्रवेशद्वाराजवळी जनजागृतीसाठी खास मतदान यंत्र उभारले आहे. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा हा उपक्रम आहे. मतदान प्रक्रिया कशी असते, त्याची प्रत्यक्ष माहिती नागरिकांना मिळावी यासाठी हे यंत्र ठेवण्यात आले आहे.जास्तीत जास्त नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी प्रशासनाचा प्रयत्न सुरू आहे.

### तुराडे शाळेला टीव्ही संच भेट



**श्रीवर्धन** : रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा यांच्यामार्फत रसायनीतील तुराडे येथील जिल्हा परिषद शाळेला ४३ इंच टीव्ही संच भेट स्वरूपात देण्यात आला. या शाळेतील विद्यार्थ्यांचा घसरता पट लक्षात घेता शिक्षकांच्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी, यासाठीव रोटेरियन गणेश वर्तक यांच्या ही भेट देण्यात आली आहे. यावेळी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष विजय पाटील, माजी अध्यक्ष गणेश काळे, देवेंद्र महिंद्रकर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# स्थानकातील सरकता जिना धूळखात

## • लवकर कार्यान्वित करण्याची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मध्य रेल्वेच्या नेरळ जंक्शन स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी सरकता जिना उभारण्यात आला आहे.स्थानकातील मध्यवर्ती ठिकाणी हा सरकता जिना उभारण्यात आला असून अद्याप कार्यान्वित करण्यात आला नाही. सध्या या जिन्यावर प्लास्टिकचे आवरण टाकण्यात आले असून तो धूळखात पडला आहे. त्यामुळे नेरळ प्रवासी संघटनेने हा सरकता जिना सुरू करण्याची मागणी केली आहे.



मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील कर्जत दिशेकडे असलेल्या नेरळ जंक्शन स्थानकाचा कायापालट केला जात आहे. या स्थानकात प्रवासी वर्गाच्या सोयीसाठी नव्याने विकासकामे केली जात आहेत. ही विकासकामे करताना प्रवाशांच्या सोयीला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच, या नेरळ जंक्शन स्थानकातून माथेरानसाठी मिनीट्रेन सोडली जात असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी असते. त्यात मुंबईकडून येणाऱ्या उपनगरीय लोकलमधून देखील प्रवासी नेरळ स्थानकात अधिक संख्येने येत असतात.ही बाब लक्षात घेऊन नेरळ स्थानकात फलाट क्रमांक एकवर एकाच वेळी तीन पादचारी पूल तसेच सरकता जिना कार्यान्वित केला आहे. मात्र, या स्थानकात उभारण्यात आलेला दुसरा सरकता जिना अद्याप कार्यान्वित झालेला नाही. हा सरकता जिना फलाटाच्या मध्यभागी असल्याने वृद्ध प्रवासी वर्गासाठी मदतगार ठरणार आहे. मात्र, नेरळ स्थानकातील प्रशासनाकडून हा सरकता जिना कार्यान्वित करण्यात आलेला नाही. सध्या त्यावर प्लास्टिकचे आवरण टाकले असून तो धूळ खात पडला आहे. त्यामुळे हा सरकता जिना उद्घाटना अभावी बंद आहे की, कामाच्या निकृष्ट दर्जेमुळे त्यात काही तांत्रीक अडचणी आहेत, असा प्रश्न सध्या प्रवासी वर्गातून उभा होत आहे. तसेच, याबाबत प्रवासी वर्गाकडून नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेकडे सातत्याने मागणी होत आहे. त्यामुळे मध्य रेल्वे प्रशासनाने तत्काळ हा सरकता जिना कार्यान्वित करावा, अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेकडून अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी नेरळ स्थानक प्रबंधक पाटील यांच्याकडे केली आहे.

## हिवाळी निवासी श्रमदान शिबीर

**तळा** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने हिवाळी निवासी श्रमदान शिबीर दत्तक ग्राम वाशी हवेली येथे सोमवार दि.५ ते रविवार दि.११ जानेवारी या कालावधीत संपन्न होणार आहे. या वर्षीच्या शिबिराची मध्यवर्ती संकल्पना 'शाश्वत विकासासाठी युवक' अशी असुन या संकल्पनेला अनुसरून भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन असल्याचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी सांगितले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रीय सेवा योजना राज्य समन्वयक प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे उपस्थित राहणार आहेत.

## हाशिवरे विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

हाशिवरे हितवर्धक मंडळ संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वैजाळी इंग्रजी माध्यम व वैजाळी प्राथमिक शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा गुरूवारी (दि.२५) पार पडला. या कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा साहित्यिक डॉ. संजीव म्हात्रे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. तसेच, दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम शुक्रवारी (दि.२६) अश्विनी मयेकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. तसेच, चित्रकला रांगोळी प्रदर्शन, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ अशा विविध कलागुणांनी परिपूर्ण सोहळा देखील पार पडला.



वरील दोन्ही दिवसांचे सूत्रसंचालन अर्चना पुरो व वर्षा नाईक यांनी केले. तसेच, बी.जी. शिकारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात पार पडला. हा विविध कार्यक्रम सोहळा मुख्याध्यापक बी.डी. गायकवाड, प्राथमिक विभाग ऋतुजा पाटील, प्रज्ञा धसाडे, प्रतिभा म्हात्रे, पर्यवेक्षक एन.डी. प्रबळकर, संकुलातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून संपन्न झाला. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून मंत्रालयाचे सहाय्यक नगर रचनाकार पियुष घरत हे होते. यावेळी हाशिवरे संस्थेचे उपाध्यक्ष सरोज डाकी, सचिव अनिल मोकल, सल्लागार सुबोध मोकल, खजिनदार ॲड. शैलेश मोकल, सदस्य निशिकांत मोकल, मालती मोकल, मिलिंद मोकल, द.र. मोकल गुरुजी व कृष्णा पाटील उपस्थित होते.

## गहाळ झालेले मोबाईल केले परत

**पनवेल** : शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मागील काही दिवसांपासुन नागरीकांचे गहाळ झालेल्या मोबाईलचा तांत्रिकदृष्ट्या सीईआयआर प्रणालीच्या माध्यमातुन शोध घेण्यात आला. या गहाळ मोबाईल पैकी १५ लाख ४५ हजार रु. किंमतीचे १०३ मोबाईल शोधण्यात पनवेल शहर पोलीस ठाणे सीईआयर प्रणाली पथक यांना यश आले. हे मोबाईल सहाय्यक पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले यांच्या हस्ते परत देण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, उप आयुक्त प्रशांत मोहीत, सहा. पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



## राजकीय पक्षांकडून आचारसंहितेची पायमल्ली

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेवकपदासाठी निवडणुकीचा बिगुल वाजला असून आचारसंहिता लागू झाली आहे. असे असतानाही सायन-पनवेल महामार्गावरील खांदा वसाहती समोरच्या पुलावर राजकीय पक्षांचे फोटो, बॅनर व जाहिराती अद्याप तशाच असल्याचे चित्र दिसत आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर तात्काळ अशा प्रकारची प्रचार सामग्री काढणे बंधनकारक असते. परंतु, प्रत्यक्षात मात्र या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे पालिकेचे आचारसंहिता अंमलबजावणीसाठी नेमलेले अधिकारी नेमके कुठे आहेत, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नियम सर्वांसाठी समान असावेत की काहींसाठी वेगळे, अशी चर्चा देखील परिसरात सुरू आहे. त्यामुळे पालिका अधिकाऱ्यांनी संबंधितांवर तात्काळ कारवाई करून राजकीय फलक हटवावेत व आचारसंहिता काटेकोरपणे राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महागणपती मंदिराच्या प्रांगणाचे डांबरीकरण

**चिरनेर** : ग्रामपंचायत चिरनेर व पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनीच्या माध्यमातून महागणपतीच्या मंदिराच्या प्रांगणाचे डांबरीकरण व मजबुतीकरणाच्या कामाचा शुभारंभ शनिवारी (दि.२७) करण्यात आला.कामाचे आश्वासन उद्योगपती पी.पी. खारपाटील यांनी दिले होते. त्या अनुषंगाने या नियोजित कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या कामाचा शुभारंभ उद्योगपती राजेंद्र खारपाटील, सरपंच भास्कर मोकल, उपसरपंच अरुण पाटील, माजी उपसरपंच सचिन घबाडी यांच्या हस्ते करण्यात आला.

## वीर बाल दिन साजरा

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

मुरुड येथील वीर कोंडाजी फर्जंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे नुकताच वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक विजेते मल्हार गुंजाळ, शिवम गुंजाळ, प्रियेश मसाळ, स्नेहा मसाळ व शिवतेज भगत यांनी लाठी प्रदर्शन दाखवून सर्व उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमात गुणवंत वीर बालकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच ? या कार्यक्रमानिमित्ताने संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांसाठी निबंध, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून प्रथम विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात प्रमुख वक्ते संजय ठाकूर यांनी, २६ डिसेंबर हा दिवस गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र जोरवर सिंग व फतेह सिंग यांच्या हौतात्माचा सन्मान करण्यासाठी साजरा करण्यात येतो, असे सांगुन या दिवसाचे महात्म्य अधोरेखित केले.

यावेळी श्रीराम पतसंस्थेचे व्यवस्थापक संजय ठाकूर, आयटीआयचे वरिष्ठ लिपिक हरिश्चंद्र नाक्ती तसेच लाठी असोसिएशन रायगड संघटनेचे अध्यक्ष प्रमोद मसाळ, प्रशिक्षक प्रियांका गुंजाळ, राकेश भगत, तसेच संस्थेचे कर्मचारी गणेश पालकर, संकेत पालवणकर, पूजा माळी, स्वप्निल गुंजाळ, कृष्णा भुरे व संतोष मेहेतर आदी उपस्थित होते.

## आदिवासी तरुणाची तांत्रिक भरारी

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुक्यातील चिचोंडे आदिवासी वाडी येथील नरेश जाधव याने तरुणांसाठी एक मोठी प्रेरणा निर्माण केली आहे. केवळ कष्ट करण्याची तयारी असून चालत नाही, तर त्याला जेव्हा योग्य कौशल्याची जोड मिळते, तेव्हा प्रगतीची दारे कशी उघडतात, हे नरेशने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. त्याने तांत्रिक कौशल्याचा प्रवास २०२१-२२ मध्ये सुरू केला आणि स्वदेस फाऊंडेशन मार्फत आयोजित हेल्पर मेसन (बांधकाम सहाय्यक) या ट्रेडचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यावर त्याची शिकण्याची ओढ न थांबता त्याने बांधकामातील बारकावे



आणि प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी २०२३-२४ मध्ये आरसीसी बांधकामाचे प्रशिक्षणही पूर्ण केले. स्वदेस फाऊंडेशनमार्फत मिळालेल्या या दर्जेदार प्रशिक्षणामुळे नरेशला बांधकामातील तांत्रिक गोष्टींचे सखोल ज्ञान मिळाले. यापूर्वी मजुरी करणाऱ्या नरेशकडे आता तांत्रिक ज्ञानाची शिदोरी होती, त्यामुळे त्यांच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम झाला. त्याची ही भरारी, जिद्द आणि कामाप्रती असलेली निष्ठा पाहून संस्थेने त्याला लर्नेट प्रशिक्षक म्हणून काम पाहण्याची जबाबदारी सोपवली आहे. सध्या तो कुडतुडी आदिवासी वाडी येथील हेल्पर मेसन बॅचमधील तरुणांना मार्गदर्शन करत आहे.

## शिक्षक संघटनेचा वार्षिक मेळावा

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

रोहा तालुका प्राथमिक शिक्षक सेवा भावी संघाचा वार्षिक मेळावा बुधवारी (दि.२४) जाखमाता मंदिर वेलशेतच्या भव्य प्रांगणात पार पडला. मेळाव्यादरम्यान पिगोंडेचे माजी सरपंच संतोष कोळी, वेलशेत गावाचे प्रमुख अनिल पाटील, बळीराम बडे, अंकुश ताडकर, रोशन पारंगे, उपसरपंच सखाराम घासे, कांचन माळी, रंजना माळी व गावातील प्रतिष्ठित मंडळी यांनाही गौरवण्यात आले. तालुका अध्यक्ष गजानन गुरव यांनी, सेवानिवृत्ताची कामे आपलीच संघटना जातीने करीत आहे. यापुढे प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे सांगितले.



यावेळी दामोदर कडू यांनी मार्गदर्शन करताना संगितले की, निवृत्तीवेतन धारक शासनावर नाराज असून विवंचनेत आहेत. सेवानिवृत्त शिक्षक हे गंभीर आजाराने त्रस्थ आहेत. तसेच, इतर प्रलंबित कामे पूर्ण होत नसल्याने याच ठिकाणी तसा ठराव घेऊन उपोषण करण्याची तयारी करावी. जिल्हाअध्यक्ष तुकाराम खांडेकर यांनी सांगितले की, संघटनेचे काम करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे ते पार पाडण्याचे मी पुर्णपणे आभिवचन देतो. यावेळी जिल्हा चिटणीस रमेश लखीमले, उपाध्यक्ष विनायक सोनकर, सहचिटणीस मुरलीधर ठमके, संघटक मुकुंद गंभे, खजिनदार दीनानाथ जाधव, सल्लागार वसंत शिंदे, सहचिटणीस सुदाम मेणे, उरण तालुकाध्यक्ष अंकुश पाटील व सर्व कार्यकारणी सदस्य, माणगाव तालुकाध्यक्ष मारुती कासार व सर्व कार्यकारणी सदस्य, रोहा तालुकाध्यक्ष गजानन गुरव व त्यांचे कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

## भल्यामोठ्या अजगराला जीवनदान

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल-उरण मार्गावरील कोळीकोपर भांब्याजवळ शनिवारी (दि.२७) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास आठ फूट लांबीचा अजगर आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. रस्त्यालगत अजगर दिसताच नागरिकांनी तत्काळ सर्पमित्रांना माहिती दिली. सर्पमित्र साजन वास्कर आणि रुद्रा पाटील यांनी घटनास्थळी धाव घेऊन अतिशय काळजीपूर्वक त्या अजगराला पकडले. या दरम्यान नागरिकांची गर्दी झाली होती; मात्र, सर्पमित्रांनी सर्वांना सुरक्षित अंतर ठेवण्याचे आवाहन केले. अजगराला कोणतीही इजा न होता सुरक्षितरीत्या ताब्यात



घेण्यात आले. वनविभागाच्या मार्गदर्शनानुसार अजगराला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असून नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

### वर्तन व्यवस्थापन प्रणाली भित्तीचित्राचे अनावरण | सुजाण नागरिकांचा विद्यार्थ्यांना बोध

# जेएसडब्ल्यू ॲस्पायर प्रोजेक्ट डोलवी उपक्रम

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

जेएसडब्ल्यू ॲस्पायर आणि मॅजिक बस इंडिया फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने पेण व अलिबाग तालुक्यांमधील २६ शाळांमध्ये जेएसडब्ल्यू ॲस्पायर प्रोजेक्ट डोलवी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून कोलघर येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा व सांबरी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत 'वर्तन व्यवस्थापन प्रणाली' या भित्तिचित्राचे अनावरण करण्यात आले. हे भित्तिचित्र पाहिल्यानंतर आदर्श व गुणी विद्यार्थी तसेच सुजाण




नागरिक कसा असावा, याचा बोध विद्यार्थ्यांना होतो.

या भित्तिचित्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आदर्श व शिस्तबद्ध वर्तन, चांगल्या सवयी, जबाबदारीची जाणीव तसेच सुजाण नागरिक म्हणून घडण्यासाठी आवश्यक मूल्यांची ओळख करून देण्यात येते. भित्तिचित्र पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांना योग्य वर्तनाचे महत्त्व सहज समजण्यास मदत होते. या दोन्हीही वॉल पेंटिंगच्या उद्घाटन कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व सूत्रसंचालन बालपंचायत सदस्यांनी अत्यंत शिस्तबद्ध व आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने पार पाडले. त्यामुळे ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली. या उपक्रमाचे शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद, स्थानिक लोकप्रतिनिधी व पालक वर्गाकडून मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात येत आहे.

या भित्तिचित्राच्या उपद्घाटनप्रसंगी कोलघर येथे मुख्याध्यापक सतीश शेरमकर, सुनिता दांडेकर, तेसीराम वाक, प्रकाश तिवरे, स्वाती पाटील, जगदीश मेंगाल, सुषमा म्हात्रे, अर्चना रामटेक, वर्षाराणी कानवटे, सुनिता गडखळ, वैशाली पाटील, सखाराम निरगुडे, दिनेश डोळकर, स्नेहल पाटील हे उपस्थित होते. तर, सांबरी येथे मुख्याध्यापिका संगीता पाटील, सरिता पाटील, माधवी करव, कपाली शेलके, प्रशांत पाटील, शमा बोरकर, पद्मा सोटे, जेएस डब्ल्यूच्या ग्राम समन्व्यक संगीता टेमकर, ललिता लांगी व निलम बोरकर आदी उपस्थित होते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ डिसेंबर

१) श्रीम.विजया वसंत आठवले ब्राम्हणआळी, अलिबाग, २८-१२-१९४०

२) श्री.भागवत दुलीचंद पाटील पिंपळभाट,अलिबाग २८-१२-१९४९

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**सावी प्रसाद जाधव, वाढदिवस, पनवेल**

## चेरवली ते शिर्डी पदयात्रेचे आयोजन

**माणगाव :** साई सेवक पालखी चेरवली आयोजित श्री बापूजी मंदिर चेरवली ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पालखी पदयात्रा सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दि.२ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान करण्यात आली असल्याची माहिती सोहळ्याचे अध्यक्ष संतोष खडतर यांनी दिली आहे.

# श्रीवर्धनशमध्ये गुटख्याची विक्री सुरू

- **अन्न व औषध प्रशासनासह पोलिसांचे दुर्लक्ष**
- **विद्यार्थी व्यसनाधीन होण्याची शक्यता**

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये गुटख्याची अवैध विक्री जोरदार पुन्हा एकदा सुरू झाली आहे. गुटखा या पदार्थावर महाराष्ट्र राज्यात बंदी असताना सुद्धा त्याची खुलेआम विक्री होत असून देखील अन्न व औषध प्रशासन व पोलीस प्रशासन या गोष्टीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचे पाहायला मिळत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी अवैध धंदे करणाऱ्यांचे चांगलेच कंबरडे मोडले होते. परंतु आता काही दिवस उलटून गेल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा गुटख्याची जोरदार विक्री सुरू झाली आहे.



काही दिवसापूर्वी श्रीवर्धन पोलिसांनी एका गुटखा विक्रेत्यावरती धाड टाकून अंदाजे ९८ हजार रुपयाचा गुटखा जप्त केला होता. त्यानंतर श्रीवर्धन शहरात व तालुक्यामध्ये गुटखा विक्री अनेक दिवस बंद होती.

परंतु पुन्हा एकदा गुटखा विक्री जोरात सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अवैध गुटखा विक्री करणारे सध्या ट्रॅव्हल्स बसेस किंवा ट्रान्सपोर्ट घेऊन येणाऱ्या मालट्रक मधुन गुटखा मागवत असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. सदरचा गुटखा शहराच्या बाहेर जाऊन ताब्यात घेतल्यानंतर रात्रीच्या वेळी व पहाटे लवकर सर्व विक्रेत्यांना पुरविला जातो. अशी नागरिकांमधून बोलले जात आहे.

गुटखा सर्रासपणे सर्वत्र मिळू लागल्यामुळे अनेक महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी देखील या गुटख्याच्या व्यसनाधीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी सदर गुटखा विक्री करणाऱ्यांवरती कडक कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

## सांस्कृतिक महोत्सव बैठकीचे आयोजन



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा- आराधना दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक महोत्सव बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान मार्फत ३१ डिसेंबर २०२५ व १ जानेवारी २०२६ या दोन दिवशी मुरूड समुद्रकिनारी सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन माजी आ. अनिकेत तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर, मंगेश दांडेकर, मनोज भगत, प्रमोद भायदे, हसमुख जैन, योगेंद्र गोयजी, विश्वास चव्हाण, मृणाल खोत, अशोक विरुकुड, वासंती उमरोटकर, विश्वास चव्हाण, रुपेश पाटील, आदेश दांडेकर, प्रकाश चव्हाण,अजित कासार ,ऋषि पोतदार आदिंसह नवनिर्वाचित नगरसेवक व अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे व उबाठा पक्षांचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## पथनाट्याद्वारे जनजागृती




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

ग्राहकांचे सुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळविण्याचा हक्क, निवडीचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क, बाजू ऐकून घेतली जाण्याचा हक्क तसेच ग्राहक शिक्षणाचा हक्क आदी हक्कांचे संरक्षण व संवर्धन व्हावे, यासाठी ग्राहकांनी जागरूक राहून शासनाला सहकार्य करावे, आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांची जाणीव ठेवावी, खरेदी करताना किंमत व गुणवत्तेची तपासणी करावी तसेच फसवणूक टाळण्यासाठी योग्य ठिकाणी तक्रार निवारणासाठी दाद मागावी, याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. जिल्हा पुरवठा कार्यालय, रायगड-अलिबाग, अन्न व औषध प्रशासन, पेण, वैध मापन विभाग, अलिबाग तसेच प्रिझम सामाजिक विकास संस्था, चेंढरे-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि.२४) डिसेंबर रोजी अलिबाग समुद्रकिनारा व अलिबाग बस स्थानक येथे जागो ग्राहक जागो पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यातून ग्राहकांच्या अधिकारांविषयी प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबागचे विजय जाधव, दिपाली ब्राम्हणकर, हर्षल देशमुख, तपस्वी गोंधळी व सहकारी, पुरवठा शाखेचे कर्मचारी, तसेच बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## सोलो तबला वादनात रुचिताचा प्रथम क्रमांक

**नवीन पनवेल :** मुंबई येथे आयोजित केलेल्या आंतरशालेय सोलो तबला वादन स्पर्धेत पनवेल तालुक्यातील नेरेपाडा येथील रुचिता खुटलेने प्रथम क्रमांक पटकावला. ती दहावीत असून रामकृष्ण अकॅडमी हरिग्राम, केवाळे येथे शिक्षण घेत आहे. तिचे गुरु मधुकर धोंगडे आहेत. तिचा प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल तिचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न

**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरुन मुंबई, ठाणे, तसेच पुणे येथून असंख्य पर्यटक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कोकणात निघाले आहेत.परंतु खांब,कोलाड, इंदापूर,माणगांव, येथील चौपदरी करणाच्या अपूर्ण कामामुळे येथे प्रवाशी वर्गाला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.यामुळे हा वाहतूक कोंडीचा तिढा केव्हा सुटणार असा सवाल प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत असून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रायगड पोलिसांकडून शर्थिचे प्रयत्न सुरु आहेत.



आल्हादायक थंडी असल्यामुळे याचा आनंद घेण्यासाठी मुंबई, ठाणे पुणे, तसेच देशाच्या कानाकोपऱ्यात असंख्य पर्यटक मुंबई-गोवा हायवे वरुन एसटीबस, फोर व्हिलर, रिक्षा, टू व्हीलर, तसेच इतर वाहनांनी कोकणात निघाले आहेत. परंतु मुंबई-गोवा हायवे वरील खांब, कोलाड, इंदापूर, माणगाव,येथील अपूर्ण कामामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असुन वाहतूक कोंडी निर्माण झाली.

मुंबई-गोवा हायवे वरील कोलाड येथे उड्डाण पुलाचे काम सुरु आहे. त्यामुळे येथे अपूर्ण रस्त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. परंतु कोलाड सपोनि नितीन मोहिते तसेच पोलिस कर्मचारी,वाहतूक पोलिस, जागोजागी उभे राहून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शर्थिचे प्रयत्न करीत आहेत.

## रेवदंडा बीच पर्यटकांनी फुलले

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा हिरवीगार नारळी पोफळींच्या झाडांनी पांघरलेल्या शालेवरून डोळ्यांना सुखावणारा अथांग समुद्र, त्याच्या मध्यभागी डोलणारा कोलई किल्ला आणि बाजूला भव्य रेवदंडा-आगरकोट किल्ले-कोकण म्हटलं की असंच निसर्गसौंदर्याचं अनमोल खजिनाच आहे. रेवदंडा समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची मोठी गर्दी उसळली आहे. यामुळे व्यावसायिकांमध्ये समाधानाची लहर उसळली आहे. तसेच, पापलेट, सुरमई, बांगडा, कोलंबी, शिंपल्या, खेकडे, पोपटीसारख्या कोकणातील खास मासे आणि सीफूड खवय्यांना खूप आवडत असल्याने कोळीबांधवांचा धंदाही जोरात आहे.

रेवदंडा बीचवर मासे विकणाऱ्या कोळी महिलांच्या टपऱ्यांवर पर्यटकांची रांगा लागल्या आहेत. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे जिल्हा प्रशासन आणि पोलिस यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. रेवदंडा, नागावसह इतर किनारपट्ट्यांवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केलं आहे.



# साप्ताहिक राशिभविष्य दि. २८ ते ०३ जानेवारी २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### कामांना गती मिळेल

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या, विशेषतः कार्यालयीन व कौटुंबिक प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. उद्योग-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती विकासाचे ध्येय बाळगावे. सरकारी नियमांचे पालन करा. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विरोधकांना संधी देऊ नका. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची शक्यता राहील. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल तरीही या आठवड्यात महत्त्वाचे निर्णय घेऊ शकतात ती वेळ येईल आपणास कार्यालयातील व कौटुंबिक गोष्टींबाबतचे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागणार आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना उत्तम प्रतिसाद मिळेल. कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. **महिलांना:** हितशत्रूंच्या कारवायांवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. जमीन-जुमल्याच्या कामांना गती मिळेल. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक** :२८,२९

### प्रलोभनांपासून दूर राहा

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कामाचे नियोजन करा सर्व कामांचे नियोजन केल्यास आपण सर्व बाबतीत यशस्वी होण्याची शक्यता राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. प्रलोभनांपासून दूर राहा. अचानक प्रवासाचे योग संभवतात. राजकीय व्यक्तींना हा काळ चांगला आहे. सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. मुलांकडून सुवार्ता समजू शकतात. जुने दोस्तांची गाठीभेटीचे योग संभवतात. तब्बेतीची काळजी घेणे गरजेचे आहे सर्दी होणार नाही यासाठी सर्तक राहा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची साथ मिळेल. हा कालावधी अनुकूलता लाभणारा आहे. बऱ्यापैकी अनुकूलता लाभल्याने पुष्कळशा बाबतीत आपण सफलता मिळवू शकाल व आनंद घ्याल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. प्रवासात सावधानता बाळगा. जागेसंबंधीचे प्रश्न सोडविता येतील. घरगुती वातावरण चांगले ठेवा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक**:३०,३१

### वादाचे प्रसंग टाळा

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आत्मविश्वासाने वागा, आपण सर्व बाबतीत जिद्द व आत्मविश्वासाने वागल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. स्थावरसंबंधीच्या प्रश्नांची उकल करता येईल. राजकीय क्षेत्रातील मंडळींना हा काळ छान राहील. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे योग संभवतात. आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा संभवते. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपल्या परिश्रमाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. हा सप्ताह सर्वसाधारण स्वरूपाचा राहण्याची शक्यता राहील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. हितशत्रूंना संधी देऊ नका. व्यवसाय क्षेत्रात प्रगती साधता येईल. अनावश्यक खर्च मात्र टाळा. **महिलांना:** महत्त्वाच्या योजना अथवा गोष्टी यांची गुप्तता बाळगावी. भावी काळासाठी गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक** :०१, ०२

### परिश्रमाचे चीज होईल

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपल्या परिश्रमाचे चीज होईल मेहनतीला न्याय मिळेल आपण घेत असलेल्या परिश्रमांना चांगला प्रतिसाद मिळून चीज झाल्याचे समाधान मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. संगणक, तांत्रिक क्षेत्र व्यवसायातील व्यक्तींना चांगला काळ राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपल्या कामाची, प्रगतीची नोंद ठेवणे हितकारक राहील. अडचणींतून मार्ग काढण्याचे तंत्र स्वीकारा व ध्येयाचा पाठपुरावा करा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रलोभनांपासून दूर राहा. कामाचा ताण आपल्या प्रकृतीवर होणार नाही याची दक्षता घ्या. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपल्या कामाला न्याय मिळू शकेल आपण आपल्या कामाला योग्य प्रकारे न्याय देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. शनी पर्वातून आपण प्रवास करत आहात हे विसरू नका. **महिलांना:** सत्याचा मार्ग स्वीकारून आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्या, चुकीचा निर्णय घेण्याचे टाळा. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक** :०२,०३

### मनाप्रमाणे गोष्टी साध्य होतील

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा होईल. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. या कालावधीत मनाप्रमाणे गोष्टी होतील आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणार असल्याने काही अपूर्ण इच्छा पूर्ण करून घेण्यास हरकत नाही. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. उद्योग-व्यवसायात नवे काही करण्यापेक्षा आहे तेच सांभाळणे महत्त्वाचे राहील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च टाळावा. मित्रमंडळी व आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. प्रलोभनांपासून दूर राहावे. सरकारी नियम व कायदा यांचे पालन करावे. प्रकृतीकडे अधिक लक्ष द्यावे. हाती घेतलेली कामे पार पाडता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची साथ मिळेल. आपण योजलेली कामे मनाप्रमाणे पार पाडता येतील. **महिलांना:** आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सरकारी कामकाजात सफलता मिळू शकेल. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू सावरता येईल. घरगुती वातावरण चांगले राहील. महत्त्वाच्या कागदपत्रांवर वाचूनच स्वाक्षऱ्या करा. **शुभ दिनांक:** २८,०१

### आर्थिक बाजू ठीक राहील

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात, विशेषतः पूर्वार्धात विविध प्रकारचे प्रश्न आपल्यापुढे उभे ठाकतील, पण त्यांची आत्मविश्वासाने उकल केल्यास उत्तम राहील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. प्रकृतीस्वास्थ्य जपा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. जोडीदाराची साथ मिळेल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. व्यापारात मात्र सावधानता बाळगावी. आपली मानसिकता स्थिर ठेवल्यास उत्तम. अध्ययनातील अडथळे दूर करता येतील. **महिलांना:** आपण घेत असलेल्या परिश्रमांचे योग्य चीज झाल्याचे समाधान मिळू शकेल. आर्थिक बाबतीत मात्र खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरू शकते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी चातुर्य व बळाचा वापर करून यशाची वाटचाल करू शकाल. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. स्थावर-जंगमविषयक कामांना गती मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. **शुभ दिनांक** : २९,३०

### भावनांवर नियंत्रण ठेवा

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपणास बऱ्यापैकी अनुकूलता मिळू शकते व आपले ध्येय साध्य करू शकाल. महत्त्वाच्या कामात आपणास सफलता मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विवाहइच्छुकांच्या अपेक्षा पुऱ्या होण्याची शक्यता राहील. आपल्या भावनांवर योग्य नियंत्रण ठेवा. विरोधकांची धास्ती बाळगू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहाल. सरकारी नियमांचे पालन करा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. तरीही कामाचे नियोजन करा कारण एकूण ग्रहमान ठीक असले तरी कामाचे योग्य नियोजन केल्यास आपणास सर्व गोष्टी साध्य करता येतील. कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल. आपली बलस्थाने कोणती आहेत याचा आढावा घ्या व भविष्याच्या योजना आखा. नोकरदारांना दिलासा मिळेल. स्थावर-जंगमबाबतचे प्रश्न सोडविता येतील. **महिलांना:** महिलांच्या कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. **शुभ दिनांक:** ३१,०१

### नोकरीची संधी प्राप्त होईल

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कला, क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना मानसन्मानाचे योग संभवतात. आर्थिक बाजू ठीक राहील. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बेकारांना नोकरीची संधी प्राप्त होईल. बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवा म्हणजे गैरसमज होणार नाही. येणाऱ्या लहान-सहान अडचणींतून मार्ग काढा व ध्येयाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. शेतीविषयक कामांना गती मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घ्या. आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. **महिलांना:** हा आठवडा कौटुंबिक व कार्याच्या कर्तव्यांचा पाठपुरावा करणारा असणार आहे. आतापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेऊन आपण कुठे कमी पडलो याचा विचार करून वागणे सर्व दृष्टीने योग्य राहणार आहे. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. **शुभ दिनांक** :०२,०३

### कर्तृत्वाला वाव मिळेल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात ग्रहमान ठीक असल्याने आपण बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल व आपली घोडदौड चालू राहील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. जीवनात योग्य व्यवस्थापनांची जरूरी असते, त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. हितशत्रूंची काळजी करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घ्या. अनावश्यक खर्च टाळा. कुटुंबाकडे अधिक लक्ष द्या. जोडीदाराची साथ मिळेल. आपल्या कामकाजाचा व्याप वाढल्याने व कौटुंबिक गोष्टींकडेही लक्ष द्यावे लागणार असल्याने आपण व्यस्त राहाल. क्रीडा व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. **महिलांना:** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या व त्यांच्या अपेक्षांना न्याय द्या. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याकडील अतिरिक्त पैसा नीट सांभाळून ठेवा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. **शुभ दिनांक** : २८,२९

### घरगुती वादाचे प्रसंग टाळा

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात सरकारी नियमांचे पालन करा. आपण परिस्थितीनुसार विचार बदलल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. कोणत्याही कारणांनी भावनेच्या आहारी जाऊ नका. विरोधकांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. प्रलोभने टाळा. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. आप्तेष्ट व मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. सरकारी नियमांचे पालन करा. **महिलांना:** जोडीदाराची साथ मिळेल. आपण सर्व बाबतीत सामंजस्याने वागल्यास बऱ्याच अपेक्षा पूर्ण होतील व समाधान मिळेल. विरोधकांना संधी देऊ नका. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक:** ३०,३१

### मान सन्मान वाढेल

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण सर्व बाबतीत नियोजनाची साथ घेतल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. उद्योग-व्यवसायात प्रगती करता येईल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. काही मंडळींना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. आर्थिक बाजू ठीक राहील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामांचा विस्तार करता येईल. जोडीदाराची साथ मिळेल अनावश्यक खर्च टाळा. तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल तसेच तुमचा समाजात ही मान सन्मान ही वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. **महिलांना:** लहान-सहान गोष्टींवरून वादविवादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाईल. वादाचे प्रसंग सामंजस्याने व शांततेने सोडविण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. मुलांकडे अधिक लक्ष द्या. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. जोडीदाराशी सहकार्याने वागा. नातेसंबंध जपा. **शुभ दिनांक** :३०,०१

### उद्योगधंद्याला चालना मिळेल

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. या सप्ताहात विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे व त्यातून मार्ग काढा. आठवड्याच्या पूर्वार्धात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे, पण त्यानंतर मात्र कामे मनासारखी होऊ लागतील. त्या स्थितीचा फायदा घ्या यश लवकरच दरवाजा ठोठावेल. कौटुंबिक वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. घरातील व्यक्तींकडे जास्त लक्ष द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. त्याचप्रमाणे आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरेल. प्रवासात सावध राहा. स्थावर-जंगम बाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल व उद्योगधंद्याला चालना मिळेल. आप्तेष्ट मंडळींच्या संपर्कात राहाल. सामाजिक कार्यात अग्रेसर राहाल. **महिलांना:** धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, प्रत्येक बाबतीत जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. **शुभ दिनांक** :२९,०३

# रिस कांबा सदनिका बांधकामात फसवणूक

## चौघांवर गुन्हा दाखल

। रसायनी । प्रतिनिधी ।

गृहप्रकल्पासाठी मंजूर केलेले बांधकाम न करता फसवणूक केल्याप्रकरणी चौघांवर रसायनी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी संजय शेखर घाडी (रा. नवीन पनवेल) यांनी रसायनीतील रिसकांबे येथील हेरंब गुरुकृपा कॉम्प्लेक्समध्ये सदनिकेची नोंदणी केली होती. हेरंब गुरूकृपा कॉम्प्लेक्स या प्रकल्पास नगररचनाकार अलिबाग यांच्याकडून मंजूर करून घेतले होते. मात्र, त्याप्रमाणे काम न करता नकाशामध्ये परस्पर बदल केले. गजानन एंन्टरप्रायजेस या नावाने जाहिरात ब्राउशरमध्ये हेरंब गुरूकृपा कॉम्प्लेक्स १:२ अशी जाहिरात करून तशी बिल्डींग नकाशा प्रसिद्ध करून हेरंब गुरूकृपा काम्प्लेक्स १०१ हा फ्लॅट १ (वन रूम किचन) असा मंजूर केला असताना यामध्ये बेकायदेशीररित्या १ (हॉल बेडरूम किचन) असे बांधकाम केले.

फ्लॅट नंबर-१०१ या फ्लॅटचे खरेदीखतामध्ये मंजूर नकाशा न जोडता बदल केलेला नकाशा जोडून प्रत्यक्षात कारपेट एरिया ३७४.३७ स्केअर फूट असताना खरेदीखतामध्ये ४१४ स्केअर फूट कारपेट एरिया असे नमूद करून फिर्यादी संजय घाडी (रा. रूम नंबर २०१, दुसरा मजला, भुमिका पॅलेस, सेक्टर १०, नवीन पनवेल) यांची फसवणूक केली असून आरोपी दिपक रामचंद्र जोशी (वय ५५, रा. पळस्पे), अतुल अनिल दिघे (वय ५३, रा. लोधिवली), सतबिदरसिंग सोहनसिंग पाबला (वय ६०, रा. ठाणानाका, पनवेल), प्रशांत बाजीराव गायकवाड (वय ५१, रा. लोधिवली) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक अनुसया ढोणे हे करीत आहेत.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ३४९/२०२५

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री. कलीमुद्दीन इब्राहीम पालोजी
रा. खालचा मोहल्ला, पो.नांदगाव — अर्जदार
ता. मुरुड जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ११/०७/१९६३ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ११/०७/१९६३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ०६/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. तुकाराम वारकु घुडे, रा.रजपे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| २३ | १/अ | ०.५६.०० | ०.०० |
| | | पो.ख. ०.१९.२० | |

पैकी विक्री केलेले क्षेत्र २० गुंठे

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व वोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २८/१२/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

### जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे नांगुर्ले, ता-कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीने मालक नितीन पोपटलाल ठक्कर रा-प्लॉट नं ३१ बेनवेल बंगलो आदर्श सी. एच. एस. ५२, बंगलो एरीया, बाजुला गौरव बंगलो, पनवेल जि-रायगड पिन ४१०२०६, यांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८ | १० | एकुण क्षेत्रफळ - ०.४७.०० हे.आर.पॉ. | ०.३१ |
| ८ | २३ | एकुण क्षेत्रफळ - ०.०८.०० हे.आर.पॉ. | ०.०३ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक नितीन पोपटलाल ठक्कर यांनी सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने आमने आशिलास विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यायरपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील तसेच मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक २८/१२/२०२५

**ॲड भारत अंकुश सावंत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल सौ. सुलभा गजानन खडे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक सौ. भारती भानुदास पालकर, श्रीम. मालती मधुकर भोईर व श्री. विजय शांताराम तवळे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ३ | ३ | ०.३९.०० | ७.४४ |
| | | पो.ख.०.०३.०० | |
| | | एकुण ०.४२.०० | |

यापैकी खरेदी देणार यांचे मालकीचे अविभक्त सामाईक हिश्श्याचे ०.२१.०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्र.

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २८/१२/२०२५.

सही / -
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं.४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी,
नेरळ (पू) ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८०८७४३०४४७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे- अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक श्री. हृषिकेश विष्णू आठवले रा. ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या खुद मालकीची खालील वर्णनाचा वाणिज्य गाळा खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीमधील सिटी सर्व्हे क्रमांक १११२ अ. १११२ ब व १११२ या मिळकतीवरील ''शिवम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.''ब्राम्हण आळी अलिबाग या इमारतीमधील तळ मजल्यावरील 'ए' विंग मधील वाणिज्य गाळा क्रमांक २, क्षेत्र २४.९४ चौ.मी. अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ALB 000001946 (जुना मालमत्ता क्रमांक Z1BHA001961) हा वाणिज्य गाळा खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

तरी वर वर्णन केलेली मालमत्ता विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या आशिलास दिली आहे. तरी वरील मालमत्तेसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल या संदर्भित मालमत्तेचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक: २८/१२/२०२५

सही /-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी आई बंगला,
'शिवसागर', वसाहत, कुरूळ
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०९
मो. नं. ९८८१६३७९२४

### जाहीर नोटीस

श्री.नागू हरी पाटील यांनी त्यांचे मृत्यूपत्र गाव बोरघर, पो.बापळे, ता.अलिबाग जि.रायगड येथील त्यांचे रहाते घरी दि.०९.१०.२०२५ रोजी लिहून ठेवले आहे. सदर मृत्यूपत्रामध्ये लाभार्थी म्हणून त्यांचे भाऊ बाळू हरिश्चंद्र उर्फ हरी पाटील रा.बोरघर, पो.बापळे, ता.अलिबाग जि.रायगड यांना घोषित केले आहे.

तसेच सदरचे मृत्यूपत्र हे अशोक नागू पाटील, रा.शांतीनगर, जयवंत सावंत रोड, भगवती हॉस्पिटलजवळ, दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८ व श्री.अनिल हशा पाटील, रा.बोरघर, पो.बापळे, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी साक्षीदार म्हणून सही केलेली आहे. श्री.नागू हरी पाटील हे दि.१२.१०.२०२५ रोजी मयत झाले असून नोंदणी कायदा १९०८ चे कलम ४० व ४१ नुसार सदरील मृत्यूपत्र नोंदणी करण्याकरीता सह दुय्यम निबंधक, अलिबाग पोलीस स्टेशनजवळ, ता.अलिबाग जि.रायगड ४०२२०१ यांचे कार्यालयात श्री.बाळू हरिश्चंद्र उर्फ हरी पाटील यांनी दि.१८.११.२०२५ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे.

उक्त लाभार्थी व दोन साक्षीदार व टंकलिखित करणार या चौघांना मृत्यपूत्र यथोचितरित्या निष्पादित झाले असल्याबाबत जाबजबाब नोंदणी कायदा १९०८ चे कलम ६३ नुसार अलाहिदा या कार्यालयाने नोंदविण्यात आलेला आहे.

या कार्यालयास उक्त कलम ४१(२)(क) नुसार कार्यालयास प्राप्त अधिकारांतर्गत सदरचे मृत्यूपत्र हे यथोचितरित्या निष्पादित व साक्षांकित झाल्याची ''अधिक खातरजमा'' करणेकरीता हे कार्यालय सर्व संबंधितांकडून याद्वारे हरकत नोंद करणेसाठी लक्ष वेधीत आहे. सदरचे मृत्यूपत्रामध्ये खालील परिशिष्टात नमूद स्थावर मालमत्ता आहे.

**परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| बोरघर, ता.अलिबाग जि.रायगड | ६९ | ०-४५-५०<br>पो.ख.०-००-५०<br>एकूण ०-४६-०० | १०-८२ |
| बोरघर, ता.अलिबाग जि.रायगड | ३६८/१ | ०-२३-५०<br>पो.ख.०-००-५०<br>एकूण ०-२४-०० | ५-६३ |

मृत्यूपत्र यथोचितरित्या निषादित झाले संदर्भात आणि उक्त परिशिष्टात नमूद स्थावर मालमत्तेसंदर्भात कुणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी साक्षीपुरावा अधिनियम १८७२ नुसार आवश्यक त्या सर्व प्रमाणित केलेल्या कागदपत्र/अभिलेखासह १५ दिवसांत आत मे. दुय्यम निबंधक अलिबाग यांच्या कार्यालयात कार्यालयीन कार्यरत दिवशी समक्ष येवून नोंदवावी. किंवा खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत, तसेच उक्त दिनांकापर्यंत कुणाचीही हरकत न आल्यास तदनंतर उक्त मृत्यूपत्राचा दस्त नोंदणी करणेत येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२७.१२.२०२५

सही/-
**ॲड.नंदकुमार पांडुरंग तांबडकर**
मु.पो.सुडकोली, ता.अलिबाग
मोबाईल नं. ९०११७७९०८१/९२७२२७४०५५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - भावशेत, ता.- सुधागड, जि.- रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १) आरव शैलेश मालपाणी | १/ब/प्लॉट नं./४ | १-८०-०० | १८.०० |
| २) आरव शैलेश मालपाणी | १/ब/प्लॉट नं./१६४ | २-०१-३० | २०.१३ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे @शहासने**
'सीता-सदन' वाकण, पो.- पाटणसई, ता.- रोहा, जि. रायगड, ४०२१०६
मो. क्र. ७७७५८९०४५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे.त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**

मौजे बीडखुर्द, ता. खालापुर जि. रायगड येथील शेत जमीन मिळकती:-

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) प्रतिमा प्रमोद घरत,<br>२) सिमा दिलीप घरत,<br>३) लिलाबाई दशरथ घरत उर्फ लिला भालचंद्र म्हात्रे | ६३ | २ | ०-२९-६० | ० | ३० |
| | ६५ | २ | ०-१०-३० | ० | १० |
| | ६६ | - | ०-८९-०० | ५ | ८० |
| | ६७ | १/अ | ०-६-०० | ० | ०५ |
| | ६७ | १/ब | ०-९५-२० | २ | ३० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक २७.१२.२०२५

**सही/-**
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
**कार्यालयीन पत्ता:-ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड.४१०२०१**
**मो.नं. ९०२८९८२२७७**
**ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com**

दिनांक :- २७/१२/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे कुंभारशेत ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - कुंभारशेत ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं./हि. नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. प्रथमेश दिलीप वाघपंजे वगैरे १ | १९/४ | ०-२९-४० | ६-५५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्रीबाबत तसेच हक्क हितसबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली - सुधागड
दिनांक - २७/१२/२०२५

सही/-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड, जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

अर्जदाराचे वकील
ॲड. इकरा नासीर शेखानी

### जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

ज.म.र. अर्ज. २७५/२०२५

गुलझार अहमद इब्राहीम दखनी, ... अर्जदार

विरुद्ध

मा. तहसिलदार सो..
तहसिल कार्यालय मुरुड. ...सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांची आई आमीना अब्दुल्ला उलडे यांचा जन्म दि. ०१/०१/१९३५ रोजी गांव- बिहूर. ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची जन्म नोंद तहसिलदार मुरुड-जंजिरा यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची आई आमीना अब्दुल्ला उलडे यांचा जन्म दि. ०१/०१/१९३५ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. ११/११/२०२५ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांच्या आईची जन्म नोंद जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०३/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांने खाली नमुद केलेली मौजे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून खुषखरेदीने घेण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. | विद्यमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | २०४/५/अ | ०-०४-९० | ०.४८ | |
| २) | २०४/७ | ०-००-८० | ०.२५ | |
| ३) | २०४/८ | ०-०२-३० | ०.७७ | सादीक अली राऊत |
| ४) | २०४/१०/अ | ०-०२-८० | १.४१ | |
| ५) | २०४/११ | ०-०५-३० | १.८१ | |
| ६) | २०४/१२ | ०-०५-८० | २.०० | सादीक अली राऊत, दाऊद अली राऊत |

वर उल्लेखीत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सादीक अली राऊत व दाऊद अली राऊत, मु. पो. ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२११० ह्या दोन्ही विद्यमान मालक यांचेकडून जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची बोलणी केली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबे कब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. सदर जमिन खरेदीसाठी आमचे अशिलांनी आवश्यक त्या संबंधीत सरकारी कार्यालयाकडून योग्य ती परवानगी मिळवून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

वरील मिळकतींच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसाचे संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने) खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यानी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दि. २७/१२/२०२५
कार्यालयीन पत्ता,
रा. कसबा पेठ, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सही/-
**ॲड. गोदावरी सुरेश करडे**
B.Sc. LL.M
खरेदीदाराचे वकील
९०५९०५१९१३/९३७०२६८५५८

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ३४८/२०२५

जाहिर नोटीस

प्रति,
श्री. इनायतुल्ला इब्राहीम पालोजी
रा. निचेका मोहल्ला, पो. नांदगाव — अर्जदार
ता. मुरुड जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०७/१९६१ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०१/०७/१९६१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ०६/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ३४५/२०२५

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री. अहमेर हरुन पालोजी
रा. पालोजी मोहल्ला, ओल्ड इलेक्ट्रीसीटी बोर्ड — अर्जदार
ता. मुरुड जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
मुख्याधिकारी नगरपरिषद, मुरुड, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. १८/०५/१९७० रोजी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद मुख्याधिकारी नगरपरिषद, मुरुड, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. १८/०५/१९७० रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दिनांक ०६/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म- मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- बोअरवेल, विहीरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- शुभमूर्हूत विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवंराची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- SALE OF BAGAYATI WADI. 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353
- सर्वप्रकारचे आजार/विवाह (१८-८०) घरबसल्या पिढ्यांपिढ्या उत्पन्नासाठी गुंतवणुकीनुसार वेळ ठरवूनच डॉ.नथुराम शिहु (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/ ७५०७१६६०१५
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २६ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- अलिबागमधील ऑफिस करीता खालील जागा भरणे आहे. ऑफिस क्लार्क व ऑटोकैड ड्राफ्ट्समन मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- पाहिजेत -अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्पुटर ऑपरेटर/ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क - श्री.मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मूले व मुली पाहिजेत संपर्क - ७८७५९९००९२
- अलिबागमधील सुपर मार्केटमध्ये कामासाठी मुली/स्त्रिया पाहिजेत. मो. ९३२२८२३४०४
- अलिबागमध्ये एका ऑफिसमध्ये कार्यालयीन सहाय्यक पाहिजे. पगार ८०००/- ते १२,०००/- कार ड्राइव्हींग येत असल्यास उत्तम वयोमर्यादा. २५ ते ४५ संपर्क : ८००७८९७८६६
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) +-

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक वादामुळे ताण राहील. विचारपूर्वक बोलणं हिताचं ठरेल. महत्त्वाचे निर्णय तुर्तास घेऊ नयेत.
- **वृषभ** : रखडलेली कामं मार्गी लागतील. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवा.
- **मिथुन** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. मनाप्रमाणे साऱ्या गोष्टी घडून येतील. आर्थिक उत्कर्ष होईल.
- **कर्क** : नव्या योजनांना गती मिळेल. अर्धवट राहिलेली कामं मार्गी लागतील. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभेल.
- **सिंह** : खर्चाचं प्रमाण वाढलं तरी प्राप्ती तशीच राहील. विवाहाच्या प्रयत्नात अनुकूलता लाभेल. चिंता नको.
- **कन्या** : महत्त्वाचे करार विचारपूर्वक करावेत. फसवणुकीबाबत जागरूक रहावं. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **तूळ** : आर्थिक बाबतीत चिंता राहील. शिक्षण क्षेत्रात नव्या प्रयोगांना चालना मिळेल. विचारानं रहायला हवं.
- **वृश्चिक** : पुरेशा माहितीअभावी निर्णय घेऊ नका. गुंतवणूक विचारानं करावी. सहजीवनात समाधान लाभेल.
- **धनु** : सरकारी कामं मार्गी लागतील. महत्त्वाच्या भेटीतून अपेक्षित लाभ मिळेल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **मकर** : कठोर परिश्रमाचं सार्थक होईल. जुनी येणी पुन्हा रखडतील. वैवाहिक जीवनात सौख्य लाभेल.
- **कुंभ** : साऱ्या गोष्टी मनाप्रमाणे घडतील. दैनंदिन कामाचा उत्साह वाढेल. विवाहाची बोलणी सफल होतील.
- **मीन** : कारकिर्दीत नव्या वाटा दृष्टीपथात येतील. अनावश्यक ताण टाळावा. अपेक्षित साध्य करता येईल.

## दिनविशेष

### २८ डिसेंबर

**१९०३** : इंग्लंडमध्ये मोटारचालकांसाठी परवाना देण्याची पद्धत सुरू. त्यानंतर हळूहळू जगभर ही पद्धत सुरु झाली.
**२०१३** : आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी रामलीला मैदानावर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.
**२०१५** : दिल्ली क्रिकेट मंडळ भ्रष्टाचार प्रकरणी अरुण जेटली यांना क्लीन चिट.
**२०१७** : तोंडी तलाकला गुन्हेगारी कृत्य ठरवणारं मुस्लिम महिला विवाह अधिकार संरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर.

## आरोग्यमंत्र

### आहार नव्हे, औषध!

आवडतात म्हणून बरेचदा आपल्या जेवणात ठराविक भाज्याच असतात. पण आहारात सगळ्या भाज्यांचा समावेश असावा. त्यामुळे अनेक प्रकारचे लाभ मिळू शकतात. उदाहरणार्थ आदिवासी लोक ज्वर आलेल्या व्यक्तीला दोडक्याची चटणी खायला घालतात. दोडक्याच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. कावीळ झालेल्या व्यक्तीच्या नाकामध्ये दोडक्याचा दोन-तीन थेंब रस टाकल्यास पिवळा द्रव पदार्थ बाहेर पडतो. या उपायाने कावीळ लवकर बरी होते, असे आदिवासी लोक मानतात. दोडक्यामध्ये इन्सुलिनप्रमाणे पेप्टाईड्स आढळतात, यामुळे मधुमेहावर नियंत्रण ठेवण्याचा हा उत्तम उपाय आहे.



आदिवासी लोकांच्या आहारात हिरव्या पालेभाज्या भरपूर प्रमाणात असतात. ते शरीरात ताकद आणि चपळता निर्माण होण्यासाठी तसंच टिकवून ठेवण्यासाठी पालक भरपूर प्रमाणात खातात. पालकाच्या भाजीत जीवनसत्त्व ए, बी, सी आणि इ तसेच प्रोटीन, सोडियम, कॅल्शियम, फॉस्फरस, क्लोरिन आणि लोह असते. पालकाच्या सेवनामुळे रक्तातील रक्तकणांमध्ये वाढ होते. पालकमध्ये जास्तीत जास्त प्रोटीन निर्माण करणारे ॲमिनो ॲसिड असते. कच्चा पालक फारच गुणकारी आहे. याच्या सेवनामुळे पचनक्रिया सुरळीत काम करते. खोकला आणि फुफ्फुसावर आलेली सूज कमी करण्यासाठी पालकच्या रसाने गुळण्या कराव्या. पालकच्या रसाने दृष्टीदोष कमी होतो तसेच स्मरणशक्ती वाढते.

## हेल्थ वेल्थ

### फिजिओथेरपीविषयी...

हाड मोडलं किंवा शारीरिक व्यंग असेल तर हालचालींवर मर्यादा येते. अशा वेळी फिजिओथेरपीचे उपचार घेऊन अवयवांच्या हालचालींशी संबंधित समस्या सोडवता येतात. काहींना थेरपीचं एखादं सत्र पुरतं. जास्त त्रास होत असेल तर मात्र काही महिने किंवा वर्षंही लागू शकतात. दुखापत किंवा विकाराच्या तीव्रतेवर फिजिओथेरपीची प्रक्रिया ठरते. हे तज्ज्ञ रुग्णांना विशिष्ट प्रकारचे व्यायाम करायला सांगतात. अवयवांना मसाज केला जातो. यामुळे कमकुवत झालेल्या स्नायूंना बळकटी मिळते.

खेळताना पडल्यामुळे पायांचं हाड मोडलं तर तुम्हा मुलांना फिजिओथेरपिस्टकडे जावं लागतं. बरं होईपर्यंत कुबड्यांच्या किंवा वॉकरच्या मदतीने कसं चालायचं, जिने चढताना-उतरताना कोणती काळजी घ्यायची हे सगळं शिकवलं जातं. लहानग्यांना शिकवण्याची वेगळी पद्धत असते. तुम्ही मुलं पटकन शिकता. म्हणून या डॉक्टरांकडे विविध प्रकारची खेळणी असतात. त्यांच्या दवाखान्यात बॉल, झोपाळे, घसरगुंड्या असतात. व्हिडिओ गेम्सच्या माध्यमातूनही ते मुलांना शिकवतात. त्यामुळे तुम्हाला अजिबात दवाखान्यात आल्यासारखं वाटणार नाही.

## सौंदर्यसाधना

### कॉस्मेटिक्स वापरताना...

आपण एक्सपायरी डेट संपलेली औषधं आणि खाद्यपदार्थ फेकून देतो. पण कॉस्मेटिक्सच्या बाबतीत असं होत नाही. अगदी शेवटपर्यंत ती वापरतो. साधं नेलपॉलिश असो किंवा महागडं फाउंडेशन एक्सपायरी डेटनंतर वापरणं योग्य नसतं.

* तुमच्या कॉस्मेटिक्समध्ये ठराविक काळानंतर बॅक्टेरिया, फंगसची वाढ होऊ लागते. ही कॉस्मेटिक्स वापरली तर त्वचेच्या समस्या निर्माण होतात. जंतूसंसर्गापासून ॲलर्जीपर्यंत प्रकरण जाऊ शकतं. त्वचेसोबतच डोळ्यांनाही याचा त्रास होतो.

* कॉस्मेटिक्स लावल्यानंतर त्वचेवर पुरळ उठणं, खाज येणं, त्वचा खरखरीत होण्यासारखी लक्षणं दिसली तर उत्पादनाची एक्सपायरी डेट उलटून गेल्याचं किंवा ते आता वापरायच्या योग्यतेचं नसल्याचं समजावं.

* विचित्र वास येणारी मेक अप उत्पादनं फेकून द्यावी.

* ६ ते १२ महिने पडून राहिलेलं उत्पादन वापरू नये.

(क्रमश:)

## पंचांग

**रविवार, २८ डिसेंबर २०२२**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, पौष शु. ६, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : उ. भाद्रपदा, योग : वरियान, सूर्योदय ७.१२, सूर्यास्त १८.०८

## फॉरवर्डस

**झटसे बदल दूं इतनी न हैसीयत न आदत हैं हमारीं...**

**रिश्तें हों या लिबास हम बरसों चलातें हैं साहब...!**

## वेगळ्या वाटा

* किंडल डायरेक्ट पब्लिशिंगसारखे अनेक ऑनलाईन पर्याय आहेत. त्यांचा वापर करून ई बुक प्रकाशित करता येईल. इतकंच नाही तर मार्केटिंगसोबतच लेखकांना ७० टक्के रॉयल्टीही दिली जाते.

* लूलू, नोशन प्रेस, ब्लू रोज प्रिंट यासारखे पर्याय तुमच्याकडे आहेत. पुस्तकांचं मार्केटिंग करण्याचं तंत्रही तुम्ही इथे शिकू शकता.

## करिअर

### चाहूल नव्या संधींची

एका अहवालानुसार २०२३ पर्यंत जगातील १५ विकसित आणि विकसनशील देशांमधील पाच दशलक्ष नोकऱ्या कमी होतील. पण गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी लागणारी कौशल्यं, क्रिएटिव्ह थिंकिंग आणि कल्पकतेशी संबंधित नव्या नोकऱ्याही उपलब्ध होणार आहेत. त्या दृष्टीने काही नव्या संधींविषयी जाणून घेऊ...

या इंटरनेटच्या युगात प्रत्येक दिवशी २.५ क्विंटिलियन डेटा तयार होतो. २०२२ पर्यंत प्रत्येक व्यक्ती एका सेकंदाला किमान १.७ एमबी डेटा तयार करू लागेल. अशा परिस्थितीत डेटा डिटेक्टिव्हची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. हे तज्ज्ञ ग्राहकांच्या गरजांचं विश्लेषण करतील. सेवा देणाऱ्या अनेक कंपन्यांना आणि ग्राहकांना त्याचा लाभ होऊ शकतो. नजिकच्या भविष्यात डाटा ब्रोकर्सची मागणीही वाढणार आहे

२०२५ पर्यंत पाच टक्के भारतीयांना लठ्ठपणा आणि संबंधित व्याधींनी ग्रासलेलं असेल. अशा वेळी फिटनेस काउंसिलरची गरज लागेल. हे काउंसिलर लोकांना फिटनेसचं महत्त्व पटवून देतील. स्थूलपणा कमी करण्यासाठीचा मार्गही सुचवतील.

सध्या क्लाउडवर आधारित घटकांचा आणि डिजिटल प्रणालीचा वापर वाढला आहे. यामुळे हॅकिंगसारख्या समस्या वाढल्या आहेत. भविष्यात हा प्रश्न अधिक गंभीर होई. त्यामुळे सायबर तज्ज्ञांची गरज भासेल.

## खेचाखेची

### आपले म्हणून...

तुम्ही आपले म्हणून सांगतो...

दिवसभर फोन हातात

असल्याचा एक फायदा आहे

.

.

.

.

.

फोन हरवत नाही

## जीके टेस्ट

विविध आखाड्यांमधले साधू भगवी वस्त्र परिणाम करणारे म्हणून कमी शिकलेले, जगाचं भान नसलेले असतात असं आपल्याला वाटतं. पण निरंजनी आखाड्याचे साधू उच्चशिक्षित आहेत. संस्कृत, हिंदीसह ते फाडफाड इंग्रजीही बोलतात. गुजरातमधल्या मांडवी या ठिकाणी निरंजनी आखाड्याची स्थापना झाली. इथले जवळपास ७० टक्के साधू उच्चशिक्षित असल्याचा अंदाज आहे. डॉक्टर, प्राध्यापक, कायदेतज्ज्ञ, इंजिनिअर्सपासून संस्कृत पंडितांपर्यंत अनेक जण या आखाड्याचे सदस्य आहेत. हा आखाडा हरिद्वार आणि बनारसमध्ये शाळा आणि कॉलेजांचं व्यवस्थापन करतो. इथली सगळी जबाबदारी या आखाड्यानेच स्वीकारली असून मुलांना शिकवण्याचं कामही इथले साधूच करतात.

## बचत मंत्रा

### अशी करा बचत

घरच्या व्यवस्थापनात पैशांची बचत किंवा मनी मॅनेजमेंट हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा असतो. पैशाचा योग्य विनियोग आणि बचत हे कौशल्याचं काम असतं. हे काम प्रत्येकाला जमतंच असं नाही. पैशांचं गणित जमवण्यासाठी गरज असते ती योग्य नियोजनाची. हे नियोजन करताना चुका टाळण्यासाठी काही टिप्स उपयुक्त ठरू शकतील. * पैसे नेमके कुठे खर्च होतात हे जाणून घ्या. खर्चिक वृत्तीला थोडी शिस्त लावण्याचा प्रयत्न करा. यासाठी काही मनी मॅनेजिंग ॲप्स डाउनलोड करता येतील. अनावश्यक खर्चाविषयी जाणून घेतल्यानंतर अंगी शिस्त बाणवणं सोपं जाऊ शकेल. * आधी महिन्याचं किंवा आठवड्याचं बजेट तयार करा. या काळातल्या खर्चाचा विचार करा. तुमच्या बजेटमध्ये हे सगळे खर्च बसतील असं बघा. आखलेल्या बजेटचं पालन करा. खर्च आवाक्याबाहेर जाणार नाहीत याची काळजी घ्या. * अविचाराने बराच खर्च होतो. त्यात बरेच पैसे वाया जातात. हे टाळण्यासाठी एखादी वस्तू खरेदी करताना ती गरजेची आहे का, याचा विचार करा. मग पैसे खर्च करा. * मासिक बचतीसोबतच भविष्यातल्या आर्थिक अडचणींसाठी थोडी रक्कम बाजूला काढून ठेवण्याचा प्रघात ठेवा.




## सुडोकू ४७


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | | | |
| | १ | २ | ९ | | ४ | | ३ | |
| | | ६ | १ | ३ | ७ | | ९ | |
| १ | | | ३ | | | ९ | | |
| | | | ५ | ७ | ८ | | | |
| | | ७ | | | ९ | | | ४ |
| | ३ | | ६ | ८ | ५ | ४ | | |
| | ७ | | ४ | | ३ | २ | १ | |
| | | | | | | | | ६ |

**टीप -**
✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ८ | ६ | २ | ९ | १ | ७ | ३ | ४ |
| २ | १ | ७ | ८ | ४ | ३ | ९ | ५ | ६ |
| ३ | ४ | ९ | ७ | ५ | ६ | १ | ८ | २ |
| १ | ९ | ३ | ५ | ६ | ८ | ४ | २ | ७ |
| ४ | ७ | २ | ३ | १ | ९ | ५ | ६ | ८ |
| ६ | ५ | ८ | ४ | ७ | २ | ३ | ९ | १ |
| ९ | २ | ४ | १ | ८ | ५ | ६ | ७ | ३ |
| ८ | ६ | १ | ९ | ३ | ७ | २ | ४ | ५ |
| ७ | ३ | ५ | ६ | २ | ४ | ८ | १ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ४७



**आडवे शब्द :-**
१) प्रभात समय,पहाटेची वेळ
४) जपजाप्य
७) गरोदर
९) मुलखावेगळा
११) एक रंगीत कंदमूळ
१३)भीती
१५) अंगातील माज
१६) उथळ आकार
१७) दया, कीव
१९) कुबेराचा सेवक
२०) बडबड्या
२२) रम्य
२३)जननी
२४) मनुष्य
२५) पावा
२६) बरोबर आलेला फौजफाटा
२८) पृष्ठभागावरील निघालेला तुकडा
३०) नाविक दल
३३) पदार्थ शिजतानाचा आवाज
३६) चांदणी
३७) पंचवीसाव्या वर्धापन दिनाचा उत्सव
३९) दहावी रास
४१) तपास, शोध
४३) कट्टा, ओटा
४४) उलट, विरुद्ध
४६) द्रव्य, पैसा
४७) डोळे
४९) भयंकर
५०) संताप
५१) कापड मोजण्याची लोखंडी पट्टी, हत्ती
५३) पंख
५४) शाईची बाटली
५५) लक्ष्मीनारायण
५७) मीठ
५९) पुष्पदल
६०) स्वत:बद्दल उल्लेख करण्याचा स्वभाव
६१) धाक, दरारा
६३) मोठा वृक्ष
६४) निलाजरा, निर्लज्ज
६५) पूर्वज

**उभे शब्द :-**
१) गर्दी, दाटी, झिंबड
२) उपनयन
३) सट्टा
४) विश्व
५) अनेकांची भिऊन पळण्याची क्रिया
६) वेतनदार
७) मगज
८) स्तुती
१०) गतिमान
१२) गुंतून जाड झालेली केसांची लट
१४) प्रजा, कुळावरील सरकारी कर
१७) उणीव, न्यूनता
१८) वयाने जास्त
२१) वात्रट
२३) श्रीमंत
२४) ममता, प्रेम
२५) गुमान
२७) अटीच्या भाषेतील जोडीने येणारे शब्द
२९) वरपांगी
३१) हाणामारी
३२) श्रीयुत
३४) भटक्यामाणूस
३५) एकाग्र नजर
३८) उगवत्या सूर्याचा देश
४०) सूर्याचे एक नाव
४२) विधवा
४५) नजर चुकवून पळून गेलेला
४६) पैसा अडका, संपत्ती
४७) नगरात राहणारा
४८) गाव, शहर
५२) एक प्रकारची मोठी तलवार
५३) दुर्दशा
५६) बागवान
५८) सरळ नसलेली
५९) एक चतुर्थांश
६२) स्वाद.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



**आरोग्ययंत्रणा सक्षम असणे ही कोणत्याही देशासाठी आत्यंतिक गरजेची बाब असली तरी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले असता कोणती अनास्था उद्‌भवते हे दाखवणारी अनेक उदाहरणे भारतासारख्या देशात बघायला मिळतात. २०२५ मध्ये आपण ती जवळून पाहिली. मात्र सार्वजनिक आरोग्यासाठी जीडीपीच्या किमान पाच टक्के तरतूद केल्यास, एआयची योग्य मदत घेतल्यास येत्या काळात अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात.**

# आरोग्यव्यवस्थेला उपचाराची गरज

**डॉ. अभिजित वैद्य**



मावळत्या वर्षाला निरोप देत नव्या वर्षाची सुरूवात करताना वर्षभरातील घडामोडींचा धांडोळा घेण्याचा प्रघात आहे. यायोगे अवलोकन होतेच, खेरीज नव्या वर्षातील प्राधान्यक्रमही प्रकर्षाने समोर येतात. या अर्थाने आरोग्यविश्वातील घडामोडींकडे पाहता काही मुद्दे गांभीर्याने बघण्याजोगे वाटतात. सर्वप्रथम एक बाब स्पष्ट करावीशी वाटते, ती म्हणजे केवळ सरत्या वर्षातच नव्हे तर मोदी सरकारच्या मागील बारा वर्षांच्या म्हणजे एक तपाच्या काळात सरकारकडून आवश्यक असणारी सार्वजनिक आरोग्यासाठीची तरतूद सातत्याने कमी केली जात आहे. आम्ही गेली तीस वर्षे सार्वजनिक आरोग्यासाठी जीडीपीच्या किमान पाच टक्के खर्चाची तरतूद असावी, असे मत मांडत आहोत. मात्र अजूनही हा आकडा एक ते सव्वा टक्क्याच्या वर गेलेला दिसत नाही. भरीस भर म्हणून आता यातच कुटुंब कल्याण खातेही ढकलून दिले आहे. त्यामुळे दिसणारी तरतूदही फसवी आहे. एकत्रित करुन सांगितला जाणारा हा आकडा प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या भारताच्या आजच्या आरोग्यविषयक सुविधा पूर्ण करु शकणारा नाही. त्यामुळे फसवी तरतूद हा मुद्दा २०२५ मध्येही दिसला हे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

दुसरे म्हणजे देशामध्ये वैद्यकीय महाविद्यालये उभे केल्याचे पंतप्रधान सांगत असले तरी अजूनही ती कागदावरच आहेत. ती प्रत्यक्ष जमिनीवर उभी राहिलेली नाहीत. त्यामुळेच केवळ घोषणांच्या आधारे विकास होत नसतो, हे वास्तवही सरत्या वर्षाने दाखवून दिले आहे. घोषणा देऊन तसेच नावे बदलून लोकांचे कोणतेही प्रश्न सुटत नाहीत, हे या निमित्ताने मांडावेसे वाटते. सरकारी धोरणाला आलेले इव्हेंटबाजीचे, जुमलेबाजीचे, जाहिरातबाजीचे स्वरुप सरत्या वर्षात वैद्यकीय क्षेत्रातही पहायला मिळाले. त्यामुळे देशात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची दाणादाण होत राहिली. खरे तर कोव्हिड महासाथीच्या काळात हे सत्य उघड झाले होतेच, पण यातून धडा न घेता, सुधारणा न करता त्याच ढिसाळ पद्धतीने काम सुरू राहिले. त्याचे परिणाम आपण भोगत आहोत. मूलभूत प्रश्न वेगळीकडे वळवण्याचा प्रयोग सातत्याने होत राहिल्यास यापेक्षा वेगळे काहीही घडणार नाही.

सध्या देशात सक्षम सरकारी रुग्णालये कमी होत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या घटत आहे. चालू असणाऱ्या केंद्रांची अवस्थाही दारुण आहे. अनेक मोठ्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांच्या जागा रिक्त असल्याचे सरकारच कबुल करते. दुसरीकडे, वैद्यकीयच नव्हे तर एकूणच महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या जागा कमी आहेत. असे असताना सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारण्याची शक्यताच मावळून जाते. दुसरीकडे, सामान्य माणूस याविषयीचे प्रश्नही विचारत नाही, कारण या सरकारने त्यांना धर्म आणि जमातवादामध्ये सातत्याने अडकवून ठेवले आहे. 'आयुष्यमान भारत' योजनेविषयी बराच गवगवा केला गेला. पण ती कुठे चालते, या प्रश्नाचे उत्तर कदाचित सरकारकडेही नसेल, कारण याअंतर्गत मिळणारी पाच लाखांच्या आरोग्यखर्चाची योजना कोणत्याही रुग्णालयामध्ये चालत नाही. रुग्ण आम्हाला हे कार्ड दाखवतात तेव्हा ते कोठे चालते, हे सरकारी यंत्रणेलाच विचारण्याचा सल्ला आम्ही देतो. कारण आम्ही उपचार करतो त्या मोठ्या रुग्णालयांपैकी एकातही ते चालत नाही. म्हणजेच प्रत्येकाच्या खात्यावर १५ लाख जमा होतील, स्विस बँकांमधील काळा पैसा आम्ही परत आणू यासारख्या घोषणांचा एक भाग म्हणजे ही घोषणा आहे का, असा प्रश्न पडतो. सरकारला हे खरचच करायचे आहे का, या प्रश्नाचे उत्तर अजून तरी मिळालेले नाही. म्हणूनच जनतेचे हित साधण्याचा प्रामाणिकपणा नसल्याचे चित्र आपल्याला सरत्या वर्षातही दिसून आले.

येत्या काळात ही स्थिती सुधारायची असेल तर सरकारने वैद्यक्षेत्रासाठी जीडीपीच्या किमान पाच टक्के रक्कम खर्च करायला हवी. यासाठी त्यांनी रेवड्या वाटणे थांबवले तरी पुरेसे होईल. निरनिराळे इव्हेंट, जाहिरातबाजी, परदेश दौरे यावरुन खर्च नियंत्रित केल्यासही या सोयींसाठी पुरेसा पैसा उपलब्ध होऊ शकतो. आरोग्य क्षेत्रामधील खर्चापोटी दरवर्षीच्या अर्थसंकल्पात अर्धा टक्क्याची वाढ केली तरी अनेक प्रश्न सुटतील असे वाटते. ही वाढ करताना स्वाभाविकपणे दुसरीकडचा निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. पण ते फारसे अवघड नाही. आधी उल्लेख केल्याप्रमाणे आज संपूर्ण देशामध्ये डॉक्टरांचा तुटवडा आहे. ही संख्या जवळपास सात ते साडेसात लाखांच्या घरात जाते. तो भरुन काढण्याचा प्रयत्न व्हायला हवा. केवळ पर्यायी वैद्यकीय शाखा म्हणजेच आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी महाविद्यालये काढून हा प्रश्न सुटणार तर आपल्याला आधुनिक वैद्यकीय तज्ज्ञांची संख्या वाढवूनच हा प्रश्न सोडवावा लागेल. परिचारिकांची संख्याही खूप कमी आहे. आहेत ती प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालयेही अडचणीत आहेत. येत्या वर्षात ती सक्षम कशी होतील, हे बघावे लागेल. तेथे अनेक आजारांचे निदान करणाऱ्या यंत्रणा कशा उपलब्ध करुन दिल्या जाव्यात, याचा विचार करावा लागेल.

आज देशात जेनेरिक औषधांची यंत्रणा उभी केली गेली. पण यामध्ये कोणत्या तरी एका कंपनीने तयार केलेली जेनेरिक औषधेच आणली जातात. खरे तर जगातील अनेक मोठ्या कंपन्या या औषधांची निर्मिती करतात. पण या यंत्रणेद्वारे ती उपलब्ध करुन दिली जात नाहीत. आपल्याकडे मिळणाऱ्या जेनेरिक औषधांचा दर्जाही तपासला जात नाही. हे सगळे बघता यामध्ये पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आगामी काळात व्हायला हवा. देशामध्ये सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये आणि शहरातील मोठी रुग्णालये यांच्याकडे प्रचंड जमिनी आहेत. हळूहळू अशा जमिनी हस्तांतरित करण्यासाठी रुग्णालयांना पीपीपी (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप) मॉडेल देण्यात येणार आहे. आताही मोठमोठी रुग्णालये अदानी, अंबानी यांच्याकडे दिली जात आहेत. हे असेच सुरू राहिले तर पुण्यातील ससून वा मुंबईचे जेजे रुग्णालय जमिनीच्या एका कोपऱ्यात टाकून उर्वरित भागात वेगवेगळी व्यापारी संकुले उभी राहण्यास वेळ लागणार नाही. हा फॉर्म्युला आरोग्याविश्वासाठी अत्यंत घातक आहे. म्हणूनच या बदलाकडेही बारकाईने लक्ष ठेवणे गरजेचे ठरणार आहे.

आता चर्चेचा रोख एआयच्या वाढत्या वापराकडे वळवू या, कारण वैद्यकीय क्षेत्रातही कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढतो आहे. येत्या काळात याचे प्रमाण लक्षणीय राहणार आहे. थोडक्यात, जगातील सर्व क्षेत्रांप्रमाणे एआय आरोग्यविश्वही व्यापणार आहे. मी व्यक्तिश: कोणत्याही आधुनिक वैद्यकीय क्रांतीचे स्वागत करतो. तिचा मानवी कल्याणासाठी कसा उपयोग करुन घेता येईल हे सगळ्यांनीच बघायला हवे. आरोग्य क्षेत्रात आलेले एआय बऱ्याच अंशी निरनिराळ्या अभ्यासासाठी सूसुत्र स्वरुपात माहिती देण्याचे काम करत आहे. उदाहरणार्थ, आत्तापर्यंत मला एखादा संशोधन लेख हवा असेल तर वैद्यकीय नियतकालिकाची काही हजारांची वर्गणी भरावी लागत असे. पण आता चॅट जीपीटीवर प्रॉम्प्ट दिल्यावर एका क्षणामध्ये अशा लेखांचा पाऊस पडतो. दुसरे म्हणजे कृत्रीम बुद्धिमत्तेने व्याख्यानांसाठी पीपीटी तयार करण्याचे कामही खूप सोपे केले आहे. तिसरी बाब अशी की, वैद्यकीय व्यावसायिक आपले संपूर्ण प्रोफाइल याच्या साहाय्याने सोशल मीडियावर आणू शकतात. याचबरोबर लोकशिक्षण आणि लोकप्रबोधन यासाठी डॉक्टरांना वेगवेगळी व्याख्याने, व्हिडिओ तयार करण्याच्या कामीही एआयची फार चांगल्या पद्धतीने मदत होते. या बरोबरीने आज क्लिनिकचे कामकाज चालवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठा उपयोग होऊ लागला आहे. जसे की, रुग्णाला भेटीच्या वेळेची पूर्वसूचना पाठवणे, सर्व रुग्णांची माहिती सूत्र रुपात देणे ही कामे आता एआय मोठ्या प्रमाणात करत आहे. याचे सर्वात मोठे योगदान रोगनिदान आणि उपचारांमध्येही सुरू झाले आहे. त्यामुळेच येत्या काळात इसीजी मशीन वा यासारखी अन्य वैद्यकीय उपकरणे, मशीन्स उच्च दर्जाच्या एआय तंत्रज्ञानाच्या आधारे चालणारी असतील. त्यांच्या साह्याने पूर्वी निदान करण्यासाठी लागणारा तज्ज्ञांचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचेल आणि काही सेकंदांमध्ये अचूक रोगनिदान होईल. इतकेच नाही, तर एखाद्या व्यक्तीला एखादा आजार होण्याची शक्यता किती आहे, हे जाणून घेण्यातही एआय महत्त्वाची भूमिका बजावेल. थोडक्यात, एखाद्या तज्ज्ञ डॉक्टरसाठीही कठीण असणारे काम कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने सोपे आणि अचूक होईल. ते वैद्यकीय शास्त्राला अनेकांगाने समृद्ध करेल. वैद्यकीय संशोधनाला चालना मिळेल. उपचार आणि वैद्यकीय माहितीचे प्रबोधन याला हातभार लावेल. माहितीचे संकलन तसेच रुग्णांपर्यंत पोहोचणे सोपे होईल. इथे लक्षात घेण्याजोगी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे एआय ही मदत सगळ्यांनाच करणार आहे. त्याला मदत मागणारा डॉक्टर बोगस आहे की खरा, तो कोणत्या शाखेचा आहे, त्याचे शिक्षण काय याच्याशी काहीही घेणेदेणे असणार नाही आणि याच मर्यादा भविष्यात काही त्रास उत्पन्न करु शकतात. नजिकच्या भविष्यात याचा विचार करावा लागणार आहे. त्यामुळेच एआयमध्ये 'एथिकल कोड' तयार करावी लागतील आणि त्याचा अनएथिकल वापर होणार नाही याची काळजी एआयशी संबंधितांना घ्यावी लागेल. **

# भटकी श्वानं की फिरता मृत्यू?

**धनंजय शेटये**

एका पाच वर्षांच्या कोवळ्या कळीचा खुडलेला श्वास ही केवळ बातमी नाही, तर आपल्या व्यवस्थेच्या चितेवर रचलेली एक जळजळीत शोकांतिका आहे. काल-परवापर्यंत ज्या घराच्या अंगणात एका चिमुकलीच्या पैंजणांचा आवाज घुमत होता, तिथे आज स्मशानशांतता पसरली आहे. त्या निष्पाप जीवाने विधात्याचा कोणता गुन्हा केला होता? की केवळ रस्ता चालणे हाच तिचा गुन्हा ठरला? रक्तामांसाचा गोळा असलेल्या त्या लेकीला जेव्हा

डोंबिवलीच्या मच्छीमार्केटमधील ती घटना म्हणजे भविष्यातील मोठ्या धोक्याची नांदी आहे. मटणाच्या पिशवीसाठी माणसावर तुटून पडणारी आणि संधी मिळताच लहान मुलांच्या नरडीचा घोट घेऊ पाहणारी ही श्वानं आता 'मुकी जनावरं' राहिलेली नाहीत, तर ते 'फिरते मृत्यू' बनले आहेत. जर वेळीच कुणी धावून आले नसते, तर आणखी एका बापाचा आधार कोसळला असता. ही भीती प्रत्येक पालकाच्या मनात घर करून बसली आहे.



पिसाळलेल्या श्वानांनी ओरबाडले, तेव्हा तिने दिलेली आर्त हाक कुणाच्याच काळजाला कशी भिडली नाही? रेबीजचा तो विळखा इतका भयानक होता की, स्वतःच्या आई-वडिलांना ओळखणारी ती बाहुली स्वतःलाच तोडू लागली, ओरबाडू लागली. विज्ञानाने हात टेकले आणि अखेर मृत्यूने त्या फुलाला झाडावरून कायमचे तोडून नेले. एका बापाचा टाहो आज आभाळाला भिडतोय, पण आमची व्यवस्था अजूनही निद्रावस्थेतच आहे.

आज तथाकथित श्वानप्रेमाचा बुरखा फाडून वास्तव पाहण्याची वेळ आली आहे. श्वान पाळणे ही स्टेटस सिम्बॉल किंवा फॅशन बनली आहे; पण जेव्हा तीच मुकी जनावरं जबाबदारी वाटू लागतात, तेव्हा त्यांना रात्रीच्या अंधारात रस्त्यावर सोडून देणारे हात 'माणुसकी'चे असूच शकत नाहीत. हा केवळ निर्दयीपणा नाही, तर समाजाविरुद्ध केलेला एक अदृश्य गुन्हा आहे. घराच्या उबदार कोपऱ्यातून रस्त्याच्या धूळधाणीत फेकलेली ही जनावरं जेव्हा अन्नासाठी वणवण फिरतात, तेव्हा ती हिंस्र बनतात. ज्यांना आपण प्रेमाने बिस्किटे घालतो, तीच श्वानं उद्या कुणाच्या तरी काळजाचा तुकडा ओरबाडतील, याचा विचार श्वानप्रेमींनी कधी केला आहे का? बिस्किटांच्या तुकड्यांनी तुम्ही तुमची पुण्याई साचवत असाल, पण त्याच अन्नाच्या सवयीमुळे ही श्वानं सामान्य माणसाच्या जिवावर उठत आहेत, हे भीषण वास्तव आहे.

प्रश्न असा पडतो की, माणसाच्या जिवापेक्षा या भटक्या श्वानांचे अधिकार मोठे आहेत का? प्राण्यांवर दया नक्कीच असावी, पण ती माणसाच्या रक्ताने माखलेली नसावी.

आता शासनाने आणि प्रशासनाने 'एबीसी' सारखे कागदी वाघ नाचवणे थांबवून प्रत्यक्ष मैदानात उतरायला हवे. निर्बीजीकरण, लसीकरण आणि आक्रमक श्वानांसाठी स्वतंत्र निवारा केंद्रे ही काळाची गरज आहे. केवळ कायदे करून आणि समित्या नेमून हा प्रश्न सुटणार नाही, त्यासाठी युद्धपातळी-वर अंमलबजावणी हवी. उघड्यावरचा कचरा आणि बेजबाबदार नागरिकांचे वर्तन यावरही कठोर अंकुश हवा. आज एका निष्पाप बालिकेचा बळी गेला, उद्या हीच वेळ आपल्यापैकी कुणावरही येऊ शकते. जर आज आपण जागे झालो नाही, तर उद्याचा सुर्योदय पश्चातापाच्या अंधारातच होईल. ही वेळ आता मेणबत्त्या पेटवण्याची नाही, तर ही भीषण परिस्थिती बदलण्यासाठी पेटून उठण्याची आहे! **

# बांगलादेशच्या बाबतीत भारताने इस्त्रायलप्रमाणे धोरण राबवावे!

**जगन घाणेकर**



मागील वर्षी ५ ऑगस्टला बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. दंगली झाल्या, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली. शेख हसीना यांनाही देश सोडून भारतात पलायन करावे लागले. या दंगलीमध्ये स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष केले जाऊ लागले, हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली, त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली, त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या, त्यांना त्यांच्याच घरातून त्यांना हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले, देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली, हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदुविरोधी लोण आजही कायम आहे. बांगलादेशमध्ये आजमितीला जवळपास अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे ज्याचा सर्वात मोठा फटका तेथील स्थानिक हिंदूंना बसत आहे. दिपू चंद्रदास नावाच्या हिंदू युवकाची बांगलादेशातील धर्मांधांनी केलेल्या निर्घृण हत्येचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाल्यानंतर प्रतिदिन नवनवीन व्हिडीओ सामाजिक माध्यमांवर प्रसारित होत आहेत ज्यामध्ये हिंदूंना त्यांच्या घरांतून, दुकानांतून, नोकरीच्या ठिकाणाहून वेचून बाहेर काढले जात आहे आणि शेकडोंच्या संख्येने धर्मांध त्यांवर तुटून पडत आहेत. ज्यांचे व्हिडीओ काढण्यात आलेत त्या घटना उजेडात येत आहेत प्रत्यक्षात हा नरसंहार किती मोठ्या प्रमाणात चालू आहे याची कल्पनाही करता येत नाही. हिंदूंना मॉब लीचिंग करून ठार केले जात आहे. हिंदू मुलींवर आणि महिलांवर बलात्कार केले जात आहेत. हिंदूंची मंदिरे फोडली जात आहेत. मागील दीड वर्षे चालू असलेल्या या अराजकावर तेथील सरकारचे जराही नियंत्रण नाही. किंबहुना सरकारकडून गुन्हेगारांना पाठीशी घातले जात आहे.

१९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली होती. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली.

फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या दीड वर्षात तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांतच बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटीहून अधिक झाली आहे भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचे उघड होत आहे. घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही. एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत.

भारतात अवैधपणे राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना हाकलून देण्यासाठी देशभरात विशेष मोहीम राबवण्यात यावी तसेच भारताच्या शेजारील राष्ट्रांत अल्पसंख्य हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात भारताने आंतराष्ट्रीय पातळीवर आवाज उठवावा अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे; मात्र दर वेळेस अशा काही घटना घडतात तेव्हा त्या घटनेचा तीव्र निषेध करण्याव्यतिरिक्त सरकारकडून अन्य काही पावले उचलली जात नसल्याचे लक्षात येते. आज जसे बांगलादेशात हिंदूंना लक्ष केले जात आहे तसे ज्यू लोकांना लक्ष करण्याची हिम्मत कोणत्याही देशाची नाही. ज्यू लोकांवर जगभरात कोठेही हल्ले झाले तर इस्त्रायल पेटून उठतो, ज्यू लोकांना संरक्षण देण्यासाठी आक्रमक होतो. भारत अशा प्रकारची भूमिका केव्हा घेणार आहे ? **

# फालतू चर्चा

**निलेश साठे**

चार पाच जण कशाच्याही निमित्ताने एकत्र आले तर चर्चा होईलच याची खात्री नाही. कारण जो तो मोबाईलमध्ये मुंडी घालून बसलेला असतो. मानमोडीचा रोग पुन्हा येतो की काय इतकी भयानक परिस्थिती मोबाईलने करून ठेवलेली आहे. हल्ली चर्चा करण्यासाठी कोणाकडे वेळ नाही. आपापसातील संवाद फार दुरापास्त झाला आहे. पण तरीही काही कारणाने चार-पाच जण एकत्र आलेच तर चर्चा कोणत्या विषयावर करावी किंवा काय करावे हे सुचत नसेल तर मग उगाचच वायफळ चर्चांना उधाण येते. मग कुणीतरी एखादा विषय काढून देतो आणि त्यावर तासन्‌तास चर्चा केली जाते. एक जण बोलणार अमिताभ बच्चन एका पिक्चरचे तीन कोटी रुपये घेतो. दुसरा त्यावर लगेच प्रतिक्रिया देणार, अमिताभ आता म्हातारा झालाय त्याला कोणी विचारत नाही. मग तिसरा एखादा मध्येचं बोलणार भाई अमिताभचा काय घेऊन बसलाय शाहरुखचं बघ शाहरुखचं शाहरुख ५० कोटी घेतो एका फिल्मचे. मग चौथा मध्येच तोंड खुपसणार, काय बोलतोस एवढे पैसे मिळतात. अरे मग. पहिला थोडी मिरवणार. जणू याला सर्वकाही माहित आहे. यांना कोण देतो रे एवढे पैसे. समोरचा शंका उपलब्ध करतो. मग याने तोंडातला ऐवज थुंकला आणि म्हणाला. बघ तुला समजेल अशा भाषेत सांगतो. आपल्या महाराष्ट्राची लोकसंख्या किती आहे. बारा कोटी. बरोबर. फक्त सहा कोटी लोकांनी शाहरुखचा पिक्चर पाहिला. आणि समज फक्त शंभर रुपये तिकीट आहे. आता सहा कोटी गुणिले शंभर रुपये कर हिशोब.



# 'स्वतंत्र कोकण राज्य व्हावे' ही श्रींची इच्छा!

शैलेश पालकर



ऑक्टोबर २००३ मध्ये रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील प्रा.श्रीप्रकाश अधिकारी आणि हमीदभाई टोळ तसेच अन्य कोकणप्रेमींनी पोलादपूर येथे छ.शिवाजी म हाराजांच्या पुतळयाजवळ उभा रहा सकाळी आपल्याला रत्नागिरी येथे जायचे आहे, असा निरोप लॅण्डलाईनवर दिला. कशासाठी विचारताच, तुझ्या विचारांचा विषय आहे तिकडे, असे सांगून माझी उत्कंठा वाढविली. सकाळी मी छ.शिवाजी महाराजांच्या पुतळयाजवळ सकाळी सात वाजताच उभा राहिलो. हमीदभाई टोळ यांच्या वाहनातून अधिकारी सर उतरले आणि त्यांनी म इझ्यासाठी गाडीमध्ये जागा केली आणि ते पुढच्या सीटवर अवघडल्यासारखे बसले. गाडी सुरू होताच अधिकारी सरांनी, शैलेश, आपण स्वतंत्र कोकण राज्य मागणी परिषदेसाठी चाललो आहोत.असे बोलून सुरूवात केली. प्रा.महेंद्र नाटेकर यांनी पुढाकार घेऊन स्वतंत्र कोकण राज्याची मागणी लावून धरण्यासाठी हाक दिली आहे. आपण सुरूवातीला बोटावर मोजण्याइतकेच असू पण पुढे तुझ्यासारख्या तरूण पत्रकारांनी जनजागृती केली तर कोकणराज्य निर्मिती दूर नाही, असे आश्वस्त केले. त्या स्वतंत्र कोकण राज्य मागणी परिषदेसाठी उपस्थित राहून परतताना भारावल्यासारखे मी आणि अधिकारी सर गाडीमध्ये आपआपली मते मांडत होतो.

स्वतंत्र राज्य निर्मितीचे तीन निकष राज्य घटनेत सांगितले आहेत. सलग भूप्रदेश, त्या भागातील बहुसंख्य लोकांची स्वतंत्र राज्याची मागणी व ते राज्य चालविण्याची त्या राज्याची आर्थिक क्षमता हे निकष निर्धारित करण्यात आले. यात गोवा बॉर्डरपासून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, नवी मुंबई व मुंबई येथे आयोजित सभांमधूनही ही मागणी करण्यात आली होती. कोकणातले सर्वात महत्त्वाचे किंबहुना एकमेव पीक म्हणजे तांदूळ आहे. १९७८ साली महाराष्ट्रातील तांदळाच्या लागवडीखालील एकूण २३ लाख ६९ हजार हेक्टर जमिनीपैकी ४ लाख ६० हजार हेक्टर म्हणजे सुमारे ३४ जमीन आणि एकूण उत्पादनाच्या सुमारे ५० उत्पादन एकटया कोकणात होते. भरपूर पाऊस पडत असूनही पाण्याचे नियोजन नसल्यामुळे सर्व पाणी जवळ जवळ फुकट जाते.

परिणामत: भाताचे पीकही वर्षातून फक्त एकदाच पावसाळयात घेतले जाते. त्यानंतर अल्प प्रमाणात नाचणी आणि त्याहीपेक्षा कमी प्रमाणात वरई ही पिके तुरळक ठिकाणी घेतली जातात. हापूस आंबा, काजू, ज्याच्यापासून कोकम तयार करतात ते रातांबे, नारळ आणि सुपारी हीच तेवढी कोकणात होणारी व्यापारी पिके असून या व्यापारी पिकांची थोडीशी शास्त्रशुध्द आणि आधुनिक पध्दतीने लागवड अलीकडेच व्हायला लागली आहे. महाराष्ट्राला सुमारे ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. पण त्यात प्रतिवर्षी जेमतेम सुमारे तीन-साडेतीन टन इतकेच मत्स्योत्पादन होते. इतर किरकोळ गोष्टी सोडल्या तर कोकणच्या अर्थव्यवस्थेच्या जमेच्या बाजू इथेच संपतात.कोकण विभागाचे सुमारे ५० लाख कोटी रुपये आर्थिक उत्पन्न आहे. यातील केवळ एकतृतीयांश पैसा कोकणवर खर्च करून बाकीचा उर्वरित महाराष्ट्र व केंद्राकडे पाठविला जातो. म्हणूनच या सर्वांवर स्वतंत्र कोकण राज्य निर्मिती हा पर्याय असून तसा ग्रामपंचायतींनी ठराव घेऊन एक प्रत आपल्याकडे, तर एक प्रत पंतप्रधानांना पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन सुमारे साडेसहा दशकांचा काळ लोटला तरी महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांच्या आर्थिक विकासातील असमतोल दूर होऊ शकला नाही, किंबहुना तो दूर करण्याचा कसलाही जाणीवपूर्वक प्रयत्न महाराष्ट्र शासनाकडून झाला नाही, याची प्रत्यक्ष आणि स्पष्ट कबुलीच विकास मंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेऊन महाराष्ट्र शासनाने दिली आहे.

या बाबतीत कोकणवासीयांच्या दृष्टीने सर्वात खेदाची गोष्ट म्हणजे कोकणसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याचा महाराष्ट्र शासनाचा अजिबात विचार दिसून येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे १९५३ साली झालेला 'नागपूर करार' असो, १९५६ साली करण्यात आलेली सातवी घटना दुरुस्ती असो, कोकणचा अंतर्भाव 'उर्वरित महाराष्ट्र' मध्ये करण्यात आला, हे होय. दुसरे म्हणजे राज्य पुनर्रचना होऊन १ मे १९६० रोजी म हाराष्ट्र राज्य अस्तित्वात येईपर्वंत कोकण हा मुंबई इलाख्याचा भाग होता. परंतु कोकणात अंतर्भूत असलेले जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे यांच्यामध्ये आर्थिक विकासाच्या बाबतीत आज अतिशय तफावत आढळते. त्यामुळे कोकणचा अंतर्भाव उर्वरित महाराष्ट्रात करणे म्हणजे कोकणच्या विकासाला वाटाण्याच्या अक्षता लावण्यासारखेच आहे. अर्थात गेल्या ६०-६५ वर्षात महाराष्ट्राने जी आर्थिक प्रगती केली, तिथे कौतुकच करायला हवे. परंतु प्रश्न पश्चिम महाराष्ट्राची प्रगती झाली हा नसून कोकणची प्रगती झाली नाही हा आहे. कोकणची एकूण अर्थव्यवस्था ही पश्चिम महाराष्ट्राध्या अर्थव्यवस्थेपेक्षा इतकी भिन्न आहे, की आर्थिक विकासाच्या संदर्भात कोकणचा वेगळा आणि स्वतंत्र विचार करण्याची नितांत गरज आहे. १९९३ साली भाजपप्रणित चिपळूण येथील कोकणसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाच्या मागणी परिषदेसाठीही उपस्थित राहण्याची संधी तेथील दैनिक सागरचा संपादकीय मंडळातील उपसंपादक म्हणून मिळाली. यावेळी बॅ.ए.आर. अंतुले यांनी ॲड.दत्ताजीराव खानविलकर यांना परिषदेतील मुद्दे समजून घेण्यासाठी पाठविले होते. मात्र, राजकीय मतभिन्नतेच्या पक्षाचे आयोजन असल्याने दत्ताजीरावांनी मला इंदिरा गांधी सभागृहाबाहेर कोणत्याही घराबाहेर बसून ऐकण्याची सोय कर आणि कॅसेट रेकॉर्डींग करून अंतुले साहेबांना पाठविता येईल, अशी इच्छा व्यक्त केली. हे सर्व करताना त्या मागणी परिषदेतील मुद्दे लक्षात आले होते. विकासाचा कोणताही निकष वापरला तरी कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र यांत प्रचंड विषमता आहे. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भ यांच्यासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करत असताना कोणत्याही परिस्थितीमध्ये कोकण हे पश्चिम महाराष्ट्राच्या दावणीला बांधले जाणे म्हणजे कोकणवासीयांवर घोर अन्याय केल्यासारखे होईल. थोडक्यात, कोकणचा समावेश पश्चिम महाराष्ट्रात न करता कोकणसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे हीच गोष्ट कोकणवासीयांसाठी न्याय्य ठरेल, असा सूर या कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळाच्या मागणी परिषदेवेळी व्यक्त झाला होता. कोकणसाठी वेगळे आणि स्वतंत्र विकास मंडळ स्थापन न करण्याच्या विचारामागे घटनात्मक अडचणींचा सातत्याने बाऊ केला जातो. १९५६ साली सातवी घटना दुरुस्ती करून वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला तेव्हा महाराष्ट्राचे मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र अशाच प्रकारे विचार करण्यात आला. त्यामुळे खरे पाहता सदर घटना दुरुस्ती करत असतानाच कोकणवर अन्याय करण्यात आला होता. पण आता पुन्हा आवश्यक ती दुरुस्ती करून कोकणावरील हा अन्याय दूर करता येऊ शकतो. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळाच्या मागणी परिषदेच्या वृतांकनामुळेच मला स्वतंत्र कोकण राज्य मागणी परिषदेचे मुद्देही सुस्पष्टपणे समजले आणि मनाला भिडलेही. यावेळी प्रा. महेंद्र नाटेकर यांचे अभ्यासपूर्ण भाषण अगदी मुद्देसूदपणे प्रसिध्द करून मी नेहमीच या चळवळीला माझ्या लेखणीने हातभार लावला.

कोकणात पूर्वी शासकीय व निमशासकीय नोकरीमध्ये ८० टक्के नोकऱ्या स्थानिकांना दिल्या जात होत्या आता मात्र कोकणातील शेती, बागायती, औद्योगिक आणि शैक्षणिक क्षेत्रातसुध्दा घाटावरील ९० टक्के नोकरशाही तयार झाली आहे. स्वतंत्र कोकण राज्याच्या निर्मितीनंतर या प्रमाणात निश्चितच बदल करण्यात येऊन मराठा समाजाला जे नोकरीत १६ टक्के आरक्षण अपेक्षित आहे; ती परिस्थिती निर्माण होईल. त्यासोबतच कोकणातील अन्य जातींनाही आरक्षणाचा लाभ मिळू शकेल, असा विश्वास यावेळी प्रा.महेंद्र नाटेकर यांनी व्यक्त केला.

**(लेखक- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे कोकण विभागीय अध्यक्ष आहेत.)**

**

## विविधांगी अनुभव दर्शन

# नादखुळा

पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर

मो. ९२७३३४३१७७

नादखुळा, हा रमेश धनावडे यांचा कवितासंग्रह, पेणच्या साहित्यसंपदा प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक प्रा.अशोक बागवे यांची प्रस्तावना लाभली आहे. 'पाठराखण' मध्ये, प्रा.अशोक बागवे लिहितात, साधेपणाने व्यक्त झालेल्या एकूणच या कविता रसिकांना प्रसन्न करतील असा विश्वास वाटतो...!! नाद, नादावलेपणा आणि नादखुळा! या शीर्षकाखाली रमेश यांनी आपले मनोगत मांडले आहे. या काव्यसंग्रहातील बऱ्याच कवितांची निर्मिती चालींवर झाली आहे. त्यातही एक नाद आहे. गेयता आहे. काही कवितांची नक्कीच गीते तयार होतील एवढी लयबद्धता त्यात आहे. तसा प्रयत्न नजिकच्या काळात नक्कीच करणार आहे, असे रमेश आवर्जून लिहितात. या काव्यसंग्रहात एकूण ७६ कविता समाविष्ट आहेत. या पुस्तकाला निलेश जाधव यांचे सुंदर, वेधक आणि रंगीत मुखपृष्ठ लाभले आहे.




'इश्काचा खेळ' आणि 'नातं तुझं माझं' या कवितांतून रमेश यांनी प्रेमाचे महत्त्व आणि प्रेमाची ताकद स्पष्ट केली आहे. 'छान छान!' या कवितेत स्वमग्न कुटुंबप्रमुखाचे चित्र स्पष्ट केले आहे. आपल्या बायका मुलात रमलेल्या माणसाला शेवटी कवी इशारा देतो.

**एकटाच पुढे धावतोस तू**
**नाही कुणी पाठी**
**चार खांदेकरी शोध तू**
**तुला नेण्यासाठी...**

तू माझिया श्वासात गं, मन जडले तुझ्यावरी, नादखुळा, तू असा या विविध कवितांतून प्रेमाची ताकद आणि प्रेमाचे आविष्कार कवीने प्रभावीपणे दर्शविले आहेत. 'जागा' ही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. जगह, स्पेस हे अन्य भाषांतील अर्थही कवीने लक्षात घेतले आहेत. शेवटी कवी म्हणतो,

**जागा असते शरीर कधी**
**श्वासामध्येही जागा**
**जळणाऱ्याला छळते**
**कधी सरणावरही जागा...**

''कावळा शिवला नाही'' या कवितेत कवीने मोबाईल वेड मृत्यूनंतरही कसे सुटत नाही, हे दर्शविले आहे. परिणामी अपघाती मृत्यू पावलेल्याच्या, 'पिंडाला त्याच्या कावळा शिवला नाही' असे कवी शेवटी म्हणतो. अमृतधारा आयुष्याचे सूर, तू या नितांत सुंदर कविता आहेत. आयुष्याचे सूर मध्ये शेवटी कवी म्हणतो,

लाख संकटे आली तरीही फिकीर कैसी
छाताडावर
आव्हानांना
घेईन म्हणतो
तरीही मेरा
भारत महान
आहे, जैसा दृष्टिकोन,

एकदा कधीतरी मला या विविध कवितांतून कवीने प्रचलित वास्तव उत्तम प्रकारे मांडले आहे. त्या वाचून वाचक अंतर्मुख होतो. आधुनिक काळात स्त्रीच्या जबाबदाऱ्या सतत वाढतच आहेत, हे कवीने 'बायको म्हणजे' या कवितेत उत्तम प्रकारे मांडले आहे. विश्वाची माता तू, बंध रेशमी, पालवी, ही हुरहूर का मनाला, कशी आवरू मनाला, बाय माझी लाराची या विविध कवितांतून स्त्रीची विविध रंगी रूपे वाचकांसमोर साकारतात.

आशा, बळ पंखात घे, जीवना गाणे गात रहा, भारतमाते, आपली मैत्री या विविध कविता वाचकाला सुयोग्य संदेश देतात. कॉपी पेस्ट, मधाचा पोळा या कवितेत काय करू नये हे कवीने स्पष्ट केले आहे. अलिबाग माझा, या कवितेत कवीने अलिबाग या आपल्या आवडत्या शहराचे केलेले वर्णन, सर्वांनाच भावणारे आहे. मंजुळा, माणसे, ब्रेक फेल या कवितांतून सध्याच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीवर परखड भाष्य केलेले जाणवते. ब्रेकफेल या कवितेत घातकी पुरुषी वृत्तीचे दर्शन होते. एका झाडाची कैफियत या कवितेत सध्याच्या आपल्या समाजातील, सतत झाडे तोडण्याच्या वृत्तीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. कवी दटावतो आणि म्हणतो,

**ग्लोबल वॉर्मिंग होतेय**
**म्हणून टाहो फोडता**
**मग सांगा मूर्खासारखी**
**झाडे का हो तोडता..**

आमची लेक सासरला जाते, या कवितेत कवीने अपूर्वाला, तिच्या जन्मापासून, तिला वाढवताना आलेले विविध अनुभव, भावपूर्ण पद्धतीने मांडले आहेत. शब्द, तिरंगा हृदयात रुजायला हवा, तू तेवणारी वात, कितीदा पहावी मूर्ती विठ्ठलाची, या नितांत सुंदर, अर्थपूर्ण कविता आहेत. रमेश यांनी आपली काही कोळीगीतेही या संग्रहात समाविष्ट केली आहेत. या विविध कवितांतून कवीने आपला 'नाद' पासून 'नादखुळा' पर्यंतचा प्रवास नेमकेपणाने, उत्तम प्रकारे स्पष्ट केला आहे. या काव्यसंग्रहातील विविध विषय रसिक वाचकाला भावतात. मात्र काही मुद्रणदोष राहून गेले आहेत. रमेश धनावडे यांचा सविस्तर परिचय, त्यांच्या रंगीत छायाचित्रासह दिला आहे. **

**पुस्तकाचे नाव : नादखुळा**
**कवी : रमेश प्रभाकर धनावडे**
**प्रकाशक : साहित्यसंपदा प्रकाशन पेण-रायगड ९७६६३२३४५७**
**आवृत्ती पहिली : ३१ मे २०२५**
**पृष्ठे : ७९, मूल्य : रु.४००/-**

# उत्सवकाळाचे आरोग्यदायी सेलिब्रेशन!

अश्विनी पारकर

**यावेळी नववर्षाचे स्वागत आरोग्यपूर्ण होणार आहे, कारण न्यू इयर सेलिब्रेशनसाठी खानपान आणि मद्य क्षेत्रातील ट्रेंड्स बदलत आहेत. आरोग्याला प्राधान्य देत, पार्टी मेनूमध्ये फायबरयुक्त, प्रोबायोटिक पदार्थांचा समावेश वाढत आहे. त्याचप्रमाणे, नॉन-अल्कोहोलिक पेये आणि मसालेदार फ्यूजन कॉकटेल मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होताना दिसणार आहे. यामुळे सध्याच्या उत्सवी वातावरणाला आरोग्यदायी आयाम मिळणार आहे.**



नववर्षाची पूर्वसंध्या अर्थात 'थर्टी फर्स्ट' ही जगभरात, विशेषत: भारतात मोठ्या उत्साहाने आणि आनंदात साजरी केली जाते. हा सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचे स्वागत करण्याचा क्षण असतो. २०२६ च्या स्वागतासाठी बाजारात आणि घरगुती पार्ट्यांमध्ये खानपान आणि मद्य क्षेत्रातील अनेक नवीन ट्रेंड्स लोकप्रिय होत आहेत, जे केवळ चवीवरच नाही, तर आरोग्यावरही भर देणारे आहेत. नव्या वर्षाच्या पार्टीची तयारी करताना पारंपरिक पदार्थांची जागा 'फ्यूजन', 'फंक्शनल' आणि 'इंक्लुसिव्ह' पदार्थांनी घेतली आहे. २०२६ मध्ये खाद्यसंस्कृतीत फायबर (तंतुमय पदार्थ), जागतिक चव (ग्लोबल फ्लेवर्स) आणि मनाचे आरोग्य या संकल्पना महत्वाच्या असणार आहेत. खानपान आणि मेजवान्यांमध्ये आता आरोग्यदायी पदार्थ उपलब्ध होत आहेत. आजघडीला खाद्यपदार्थांमध्ये 'आरोग्य' ही संकल्पना केवळ कॅलरी मोजण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर आतड्याचे आरोग्य आणि मानसिक संतुलनावर केंद्रित झाली आहे. २०२५ मध्ये 'प्रोटीन' ट्रेंडमध्ये होते, पण २०२६ मध्ये फायबर हा घटक सर्वाधिक महत्त्वाचा ठरत आहे. आतड्याचे आरोग्य सुधारण्यासाठी लोक उच्च फायबरयुक्त पेये आणि खाद्यपदार्थ निवडत आहेत. ओट्स, शेंगा, डाळी आणि विशेषत: विविध प्रकारचे दाणे यांचा वापर वाढला आहे. पार्टी स्नॅक्समध्येही भाजलेले चणे, फायबरयुक्त क्रॅकर्स आणि फ्रूट नट्सचे मिश्रण असलेले प्लॅटर्स लोकप्रिय होतील, असा आडाखा मांडला जात आहे. पारंपरिक इडली, डोसा, ढोकळा यांसारखे फर्मेंटेड पदार्थ तसेच पश्चिमी खाद्यसंस्कृतीतील कॅम्पुचा आणि किमचीसारखे पदार्थ आरोग्यदायी स्नॅक्स म्हणून पार्टी मेनूमध्ये समाविष्ट होत आहेत. दही आणि छास आधारित डिझर्ट्स आणि पेयांची मागणी वाढत आहे.

२०२६ मध्ये भारतीय स्वयंपाकघरात जागतिक खाद्यसंस्कृतीचा अधिक प्रभावी प्रवेश होणार असून त्यात स्थानिक चवीला महत्त्व दिले जाणार आहे. अनेक रेस्टॉरंटमधील पार्टी मेन्युमध्येही गोड आणि तिखट चवींचा संगम (स्वीट अँड स्पायसी) करणारा ट्रेंड मोठ्या प्रमाणात पसंत केला जाणार आहे. उदा. आईस्क्रीम वर चिली क्रिस्प, हॉट हनी पिझ्झा किंवा तिखट मसाल्याचे मिश्रण असलेली चॉकलेट्स. भारतीय पदार्थांमध्येही गोड-आंबट चटणीसोबत तिखट मसाल्याचा वापर करून नवीन स्नॅक्स जिभेचे चोचले पुरवण्याकामी अग्रस्थानी असतील. या वेळेच्या मेजवान्यांमध्ये केवळ चायनीज किंवा इटालियन खाद्यपदार्थांवर लक्ष केंद्रित न करता, आता रेस्टॉरंट्स आणि होम शेफ दक्षिण अमेरिकेतील पेरूचे सेविच, व्हेनेझुएलाचे ऐरेपा आणि पूर्व आशियातील कोरियन फ्राइड चिकन, मलेशियन लक्सा यासारख्या पदार्थांचा आस्वाद खवय्ये घेतील. पार्टी मेनूमध्ये मिनी-बाओ, कोरियन कॉर्न डॉग किंवा स्पायसी एडमामे या नव्या पदार्थांचा समावेश नवा अनुभव देईल. या वेळेची नववर्ष पुर्वसंध्या ही खाद्यपदार्थांम धील नवीन प्रयोगांची असेल. पारंपारिक भारतीय मसाल्यांव्यतिरिक्त आता हरिसा, गोचुजंग (कोरियन तिखट पेस्ट) आणि कॅलाब्रियन चिलीसारख्या आंतरराष्ट्रीय मसाल्यांचा उपयोग तंदुरी, टिक्का आणि कबाबमध्ये 'फ्यूजन' चव देण्यासाठी केला जाईल.





२०२६ मध्ये डेझर्ट्स हे केवळ गोड राहणार नसून खव्वयांच्या जिभेला काय अनुभव देतो याकडे शेफचे लक्ष असेल. एकाच डेझर्टमध्ये अनेक टेक्स्चर्स (उदा. कुरकुरीत, मऊ, क्रीमी आणि चवींचे थर असणे) हा नवा ट्रेंड आहे. उदा. क्रम्बल, मूस आणि जेलीचे थर असलेले पेस्ट्री. यंदा व्हायरल झालेले दुबई चॉकलेट आणि कोरियन क्रॉफल्स यासारखे पदार्थ नववर्षाच्या मेनूमध्ये डिमांडमध्ये असतील तर क्रीमची जागा फोम किंवा चीज क्रीमआधारित टॉपिंग्ज घेतील. वर म्हटल्याप्रमाणे आगामी वर्ष आरोग्याचे असेल. त्यामुळे 'गट हेल्थ'साठी फायदेशीर ठरणारी ड्रायफ्रुट्स, सीड्स आणि नैसर्गिक गोडवा वापरून बनवलेले पण तरीही अत्यंत चविष्ट असणारी डेझर्ट्स उदा. डेट आणि अंजीर सिरप वापरलेले केक लोकप्रिय होतील. मद्यपान आणि पेयांमध्येही नव्या संकल्पना रुंजी घालत आहेत. २०२६ मध्ये मद्यपान करताना मानसिक संतुलनावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे संतुलन, संवेदना आणि उद्देश्यपूर्णता या तीन संकल्पना दुरगामी ठरतील. सध्या 'झेब्रा स्ट्रिपिंग' ही संकल्पना लोकप्रिय होत आहे. या संकल्पनेत लोक अल्कोहोलिक आणि नॉन-अल्कोहोलिक पेयांचे सेवन आलटून-पालटून करतात. यामुळे पार्टीमध्येही नियंत्रण आणि संतुलन राखता येते. दारूचे प्रमाण कमी असलेले स्प्रीट्झर, हलकी बिअर आणि वाईन अधिक पसंत केली जाईल. तसेच अशा प्रकारची कॉकटेल्स जास्त प्रमाणात घेता येतात आणि त्यांचा प्रभावही कमी असतो.

नॉन-अल्कोहोलिक पेयांमध्ये आता फंक्शनल घटक उदा. ॲडाप्टोजेन्स किंवा बोटॅनिकल्स वापरले जातात. ही पेये तणाव कमी करणे किंवा ऊर्जा वाढवण्यासारखे विशिष्ट फायदे देतात. यावेळी पार्ट्यांमध्ये चहालाही मागणी असेल. पारंपारिक चहा आता बबल टी, मॅच, आणि विदेशी फ्लेवर्सच्या कोल्ड ब्रू स्वरूपात मॉकटेलचा भाग बनत आहेत. चीज फोम टॉपिंग असलेले टी ड्रिंक्स लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. व्हिस्की, जिन किंवा रमच्या चवीचे, पण अल्कोहोल नसलेले झिरो अल्कोहोल स्पिरिट्स यापुढे पार्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसतील; ज्यामुळे मद्य सेवन न करणाऱ्यांनाही कॉकटेल्सचा अनुभव घेता येईल. २०२६ मध्ये कॉकटेलमध्ये जुनी फ्लेवर्स सोबत घेऊन नवीन फ्लेवर्सचा मेळ घातला जाईल. लिंबू, युझू आणि द्राक्षासारख्या फळांसोबत वॅनिला आणि चॉकलेटसारख्या समृद्ध चवींचा वापर (उदा. बर्बन, स्टॉउट) कॉकटेल्समध्ये अधिक केला जाईल. यंदाच्या पार्ट्यांमध्ये ९० च्या दशकातील लेमन ड्रॉप मार्टिनी आणि आइरिश क्रीम कॉकटेलचे पुनरागमन होईल. साध्या जिन किंवा व्होडकामध्ये आता चाय, इलायची, किंवा केसरसारखे भारतीय मसाले आणि चिली इन्फ्युज करून नवीन चवीचे स्पिरिट्स तयार केले जात आहेत. हे स्वदेशी स्पिरिट्स आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय होत आहेत. कॉफीआधारित कॉकटेल उदा. एक्स्प्रेसो मार्टिनी आणि ड्रिंक्समध्ये व्हिप्ड फोमचा वापर वाढला आहे. विविध फ्लेवर्सचे फोम (उदा. सॉल्टेड कारमेल, लॅव्हेंडर) ड्रिंक्सना नवीन संकल्पनेतील संवेदनात्मक अनुभव देऊ शकतात.

यापुढील काळामध्ये पार्ट्यांचे आयोजन-नियोजनही बदललेले असेल. मोठ्या गर्दीऐवजी आता जवळच्या मित्र-मैत्रिणींच्या आणि कुटुंबातील सदस्यांच्या छोट्या पार्टी आयोजित करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. पार्टीमध्ये स्वतःचे कॉकटेल/मॉकटेल बनवण्याचे स्टेशन्स किंवा स्नॅक बार (उदा. गार्निश, फ्लेवर्स आणि टॉपिंग्ज) ठेवणे हा एक मोठा ट्रेंड आहे. यामुळे पाहुण्यांना आपल्या आवडीनुसार पेये किंवा स्नॅक्स तयार करण्याचा अनुभव मिळतो. २०२६ चे नववर्ष स्वागत केवळ उत्साह आणि जल्लोषाचा क्षण नसून, सकारात्मक आरोग्य, जागतिक चवींचा अनुभव आणि आनंद घेतानाही बाळगली जाणारी सजगता यांचा संगम असणार आहे. पार्टीसाठी पदार्थांची निवड करताना, केवळ काय खावे यापेक्षा ते कसे खावे आणि त्याचा शरीरावर काय परिणाम होईल, याकडे अधिक लक्ष दिले जाणार आहे. वस्तुत: ही काळाची गरज आहे. आज विशेष काळजी घेऊन आरोग्यवर्धक किंवा आरोग्याला पूरक खाणे पहायला मिळत नाही. लोक आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा संकल्प जरुर सोडतात, पण ती कायम राखत नाहीत. नवलाईचे चार दिवस संपले की पुन्हा सारे मूळ जागी येते. यामुळे बाजारात, समाजात असे पर्याय निर्माण होणे ही काळाची गरज आहेच, परंतु त्याबाबत समाजमन अधिक सजग होणे आणि अशा पर्यायांची ग्राहकवर्गानेही सतत मागणी करणे आवश्यक आहे. **

## निवडक

### रोहित बाद होताच स्टेडियम झाले रिकामे

**नवी दिल्ली :** जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियममध्ये विजय हजारे ट्रॉफीच्या सामन्यासाठी जमलेला क्रिकेटप्रेमींचा उत्साह एका क्षणात मावळला. मुंबईकडून खेळत असलेला रोहित शर्मा शून्यावर बाद होताच स्टेडियममध्ये सन्नाटा पसरला आणि काही



वेळातच प्रेक्षकांच्या रांगा बाहेरच्या दिशेने वळल्या. उत्तराखंडविरुद्धच्या या लढतीत रोहितला २५ वर्षीय वेगवान गोलंदाज देवेंद्र सिंग बोराने पहिल्याच चेंडूवर माघारी पाठवले. शॉर्ट बॉलवर पुल शॉट खेळण्याच्या प्रयत्नात रोहितचा चेंडू डीप स्क्वेअर लेगला झेलला गेला. आठ वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफीत रोहितच्या पुनरागमनामुळे जयपूरमध्ये मोठा उत्साह होता. सकाळी सहा वाजल्यापासूनच थंडी असूनही शेकडो चाहते स्टेडियमबाहेर जमा झाले होते. मुंबई पहिल्यांदा फलंदाजी करणार असल्याचे कळताच स्टॅण्ड भरू लागले, मात्र, रोहित बाद होताच वातावरण बदलले. अनेक प्रेक्षकांनी नो बॉलची पंचांकडे दाद मागितली, तर मोठ्या संख्येने चाहते सामना अर्धवट सोडून बाहेर पडले.



### वैभवच्या शिरपेचात मानाचा तुरा

**नवी दिल्ली :** भारताचा तरुण क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी हा दिवसेंदिवस नवीन टप्पे गाठत आहे. केवळ १४ वर्षांचा असताना वैभवने क्रिकेट जगतात धुमाकूळ घातला आहे आणि अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. मैदानावरील त्याच्या उल्लेखनीय यशामुळे त्याला भारत सरकारने मान्यता दिली आहे. वैभव सूर्यवंशी यांना देशातील सर्वोच्च बाल पुरस्कार, पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एका विशेष समारंभात बिहारच्या या आशादायक फलंदाजाला वैयक्तिकरित्या हा पुरस्कार प्रदान केला. शुक्रवार (दि.२६) डिसेंबर रोजी, जेव्हा बिहार संघ विजय हजारे ट्रॉफीमधील दुसऱ्या सामन्यासाठी मैदानावर होता, तेव्हा संघाचा सुपरस्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात उपस्थित होता. निमित्त होते पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराचे. दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही देशभरातील अनेक तरुणांना आणि मुलांना त्यांच्या कामगिरीबद्दल, काहींना त्यांच्या शौर्याबद्दल, तर काहींना क्रीडा, संगीत किंवा विज्ञानातील योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. बिहारमधील समस्तीपूर येथील रहिवासी असलेल्या वैभवला क्रिकेट जगतात त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. राष्ट्रपती मुर्मू यांनी वैभवला त्याच्या कामगिरीबद्दल हा पुरस्कार प्रदान केला, ज्यामध्ये आयपीएलमधील सर्वात तरुण खेळाडू आणि सर्वात जलद शतक करणारा भारतीय फलंदाज होण्याचा समावेश होता.

### स्वराची केदारकांठा शिखरावर चढाई

**निरार :** वसईतील १२ वर्षांच्या स्वरा पाटीलने उत्तरकाशीतील केदारकांठा शिखर यशस्वी वसईमध्ये राहणाऱ्या स्वरा दिगंबर पाटील



(वय १२) या बाल गिर्यारोहकाने हिमालयातील उत्तरकाशी येथील केदारकांठा (सुमारे १२,५०० फूट) हे शिखर यशस्वीरीत्या (दि.२४) डिसेंबर रोजी पहाटे ६ वाजता सर केले आहे. या मोहिमेत स्वराने कठिन हिमालयी हवामान, कमी तापमान आणि दीर्घ चालण्याच्या अडचणींवर मात करून हे शिखर गाठले, ज्यामुळे तिच्या कुटुंबीयांसह स्थानिक नागरिकांचाही गौरव वाढला आहे. स्वरा पुढेही मोठ्या ध्येयांकडे पाहते आणि अधिक पर्वतारोहण मोहिमांसाठी सज्ज आहे. स्वराने आधीच काही मोठ्या शिखरावर चढाया केल्या आहेत. नऊ वर्षांच्या वयात तिने माउंट एव्हरेस्ट बेस कॅम्प ट्रेक पूर्ण केला होता, जिथे तिने १४ दिवसांचा कठीण ट्रेक पार केला होता व हिमालयाच्या कठीण मार्गावरही मार्गक्रमण केले होते. तिच्या प्रारंभिक पर्वतारोहण प्रवासात महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसुबाई शिखर आणि हिमालयातील सार पास सारख्या प्रख्यात शिखरांवर चढाईयाही यशस्वीपणे पूर्ण केल्या आहेत, ज्यामुळे ती लवकरच भारतीय गिर्यारोहण समुदायात एक प्रेरणादायी नाव म्हणून ओळखली जाईल असे बोलले जात आहे. स्वरा सध्या शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित व्यायाम करीत आहे आणि भविष्यात माउंट एव्हरेस्टचे शिखर सर करण्याचा धाडसी ध्येय पूर्ण करण्याची इच्छाशक्ती ठेऊन त्यासाठी प्रयत्न करत आहे.

### कोतवडे हायस्कूलचा क्रीडा महोत्सव

**रत्नागिरी :** विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये नैपुण्य प्राप्त करावे, तरच उद्याचा भविष्यकाळ चांगला आहे. खेळाडूंनी समोरच्या खेळाडूला कोणत्याही प्रकारची इजा होऊ नये अशा प्रकारच्या भावनेने मैत्रीपूर्ण खेळ खेळावा, असे प्रतिपादन कोतवडे ग्रामस्थ मंडळाचे (मुंबई) उपाध्यक्ष संजय मयेकर यांनी अध्यक्षस्थानावरून केले. मंडळ संचालित कोतवडे येथील विजयसिंहराजे पटवर्धन इंग्लिश स्कूलच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन केल्यावर ते बोलत होते.या वेळी विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांना शिस्तबद्ध संचलन करून मानवंदना दिली. खेळाडू वृत्तीची शपथ घेऊन क्रीडा ज्योत प्रज्वलित करून चैतन्य निर्माण केले. या कार्यक्रमाला नरेश कांबळे, सुधीर कांबळे, प्रकाश ठोंबरे, सरपंच संतोष बारगोडे, स्वप्नील पड्याळ, प्रेमदास पवार, गुरुदास खुळे, संजय गांधी, स्वप्नील मयेकर, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यादव, विजय बेहेरे उपस्थित होते.

# भारताने श्रीलंकेला लोळवलं

## || शेफालीची फटकेबाजी अन् दीप्तीची फिरकी || शानदार कामगिरी करत मालिका केली नावावर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

**भारतीय महिला क्रिकेट संघ आणि श्रीलंकेच्या महिला क्रिकेट संघात पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळवली जात आहे. ज्यातील तिसरा सामना २६ डिसेंबर रोजी खेळवण्यात आला. या सामन्यात भारतीय संघाने शानदार कामगिरी करत सामना जिंकला आणि मालिकाही जिंकली. भारताकडून रेणुका सिंगने चार आणि दीप्ती शर्माने तीन विकेट घेतल्या. शिवाय, दीप्ती शर्मानेही या सामन्यात इतिहास रचला. भारताने आठ विकेटने विजय मिळवला.**



प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २० षटकांत ७ बाद ११२ धावा केल्या. सलामीवीर हसिनी परेराने १८ चेंडूत १५ धावा केल्या. चामारी अथापथ्थूनेही १२ चेंडूत तीन धावा केल्या. हर्षिता समरविक्रमानेही चार चेंडूत दोन धावा केल्या. त्यानंतर, इमेशा दुलानीने ३२ चेंडूत २७ धावा केल्या, तर कविशा दिलहारीने १३ चेंडूत २० धावा केल्या. श्रीलंकेला मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

### हरमनप्रीत ठरली यशस्वी कर्णधार

**शेफाली वर्माने २५ चेंडूंत ७५ धावांचा डोंगर रचून श्रीलंकेच्या खेळाडुंची दमछाक केली. त्यामुळे भारताला श्रीलंकेवर आठ गडी राखून सहज विजय मिळवणं शक्य झाले. या विजयानंतर हरमनप्रीत कौर ही महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वात यशस्वी कर्णधार ठरली आहे. तिने भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार म्हणून १३० सामन्यांमध्ये ७७ विजय मिळविले आहेत. आजच्या विजयानंतर तिनं ऑस्ट्रेलियाची माजी कर्णधार मेग लॅनिंगचा १०० सामन्यांमधील ७६ विजयांचा विक्रम मोडला आहे.**

दीप्ती शर्माने भारतासाठी इतिहास रचला. टी-२० मध्ये १५० विकेट्स घेणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली. पुरुष किंवा महिला क्रिकेटमध्ये भारतासाठी हा पराक्रम आतापर्यंत कोणत्याही खेळाडूने केलेला नाही. लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर स्मृती मानधना ६ चेंडूत १ धाव करून बाद झाली. तथापि, शफाली वर्माने शानदार अर्धशतकी खेळी केली. तिने ४२ चेंडूत ७९ धावा केल्या, तिच्या खेळीदरम्यान ११ चौकार आणि ३ षटकार मारले. हरमनप्रीत कौरने १८ चेंडूत नाबाद २१ धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्जलाही या सामन्यात कामगिरी करता आली नाही, तिने १५ चेंडूत ९ धावा केल्या. भारताने फक्त १३.२ षटकात ११५/२ धावा करून सामना जिंकला.

### भारत दौऱ्यासाठी न्यूझीलंडचे संघ

**वेलिंग्टन :** नवीन वर्षात भारत दौऱ्यावर येणाऱ्या न्यूझीलंडने आगामी एकदिवसीय व टी-२० मालिकेसाठी बुधवारी संघ जाहीर केले. अनुभवी फलंदाज केन विल्यम्सनने एकदिवसीय मालिकेतून माघार घेतली असून मिचेल सँटनर फक्त टी-२० मालिकेसाठीच संघाचा भाग आहे. त्यामुळे मिचेल ब्रेसवेलकडे न्यूझीलंडच्या एकदिवसीय संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे.

एकदिवसीय मालिका : मिचेल ब्रेसवेल (कर्णधार), आदित्य अशोक, क्रिस्टियन क्लार्क, जोश क्लार्कसन, डेवॉन कॉन्वे, झॅक फोल्क्स, मिच हे, कायले जेमिसन, निक केली, जेडन लीनॉक्स, डॅरेल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स, मिचेल रे, विल यंग.

टी-२० मालिका : मिचेल सँटनर (कर्णधार), मिचेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेवॉन कॉन्वे, जेकब डफी, झॅक फोल्क्स, मॅट हेन्री, कायले जेमिसन, बेवॉन जेकब्स, डॅरेल मिचेल, जेम्स नीशाम, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, टिम रॉबिन्सन, इश सोधी.

## भारताचा तिरंगा दुबईत फडकला

| अहिल्यानगर | प्रतिनिधी |

भारतीय पुरुष संघाने ७ व्या रोल बॉल विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. दुबई येथे पार पडलेल्या या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगावचा आणि मुंबई प्राप्तिकर विभागातील साहाय्यक हर्षल सोमनाथ घुगे याने आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर भारताला विश्वविजेतेपद मिळवून दिले. अंतिम सामन्यात हर्षलने केलेल्या तीन महत्त्वपूर्ण गोल्सच्या जोरावर भारताने केनियाचा ११-१० अशा फरकाने निसटता पराभव केला.

सुरुवातीपासूनच भारताचा दबदबाया स्पर्धेत भारतीय संघ सुरुवातीपासूनच अजिंक्य राहिला. साखळी फेरीत भारताने सौदी अरेबियाचा १६-१ आणि ब्राझीलचा ११-२ असा धुव्वा उडवला. या दोन्ही सामन्यांत हर्षलने आपली छाप सोडली.



सौदी अरेबियाविरुद्ध त्याने ४, तर ब्राझीलविरुद्ध ३ गोल नोंदवले. या कामगिरीमुळे भारताने दिमाखात बाद फेरीत प्रवेश केला.

हर्षल पर्वबाद फेरीतील चुरशीच्या लढतीत भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा १७-५ असा धुव्वा उडवला. या सामन्यातही हर्षलने २ गोल करत विजयात मोलाचा वाटा उचलला. त्यानंतर उपांत्य फेरीत इजिप्तवर ६-२ अशी मात करत भारताने अंतिम फेरीत धडक मारली.

थरारक अंतिम सामनाअंतिम सामन्यात भारत आणि केनिया यांच्यात काट्याची टक्कर पाहायला मिळाली. शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्यात हर्षलने आपल्या अनुभवाचे प्रदर्शन करत ३ महत्त्वाचे गोल केले.

हर्षलच्या या कामगिरीमुळे भारताला ११-१० असा विजय मिळवता आला आणि विश्वचषकावर भारताचे नाव कोरले गेले. २००८ पासून रोल बॉल खेळणाऱ्या हर्षलने १० पेक्षा जास्त वेळा वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याच्या याच खेळाची दखल घेत जुलै २०२४ मध्ये त्याची मुंबई प्राप्तिकर विभागात स्पोर्ट्स कोटा अंतर्गत साहाय्यक पदी नियुक्ती झाली. एका छोट्या गावातून येत जागतिक स्तरावर झेंडा फडकवणाऱ्या हर्षलच्या या यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे नाव जगात उंचावले आहे.

## बॉक्सिंग डे कसोटीत गोलंदाजांचा हाहाकार

| मेलबर्न | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या 'शेस'मालिकेतील 'बॉक्सिंग डे' कसोटी सामन्याचा निकाल अवघ्या दोन दिवसांत लागला आहे. मेलबर्न क्रिकेट मैदानावर खेळल्या गेलेल्या या चौथ्या सामन्यात गोलदाजांनी केलेल्या भेदक माऱ्यामुळे फलंदाजांची भंबेरी उडाली. दोन दिवसांमध्ये संपलेल्या सामना इंग्लंडने ४ गडी राखून विजय मिळवत मालिकेत कमबॅक केले आहे. बॉक्सिंग डे कसोटीत नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा इंग्लंडच्या संघाने घेतला. वेगवान गोलंदाजांनी हा निर्णय सार्थ ठरवत ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १५२ धावांवर गुंडाळला. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोश याने पहिल्या डावात पाच बळी घेत कांगारूंचे कंबरडे मोडले आणि विजयाचा पाया रचला. मात्र, प्रत्युत्तरात



ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी अधिक घातक मारा केला. मायकेल आणि बोलँड यांच्या भेदक माऱ्यासमोर इंग्लंडची दाणादाण उडाली.

पहिला डाव केवळ ११० धावांत आटोपला. इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव १३२ धावावर संपुष्टात आणला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावातील ४२ धावांच्या आघाडीसह इंग्लंडसमोर १७५ धावांचे लक्ष्य ठेवले. हे आव्हान इंग्लंडने ६ गडी गमावून पूर्ण करत मालिकेत आपला पहिला विजय नोंदवला.

शेसच्या इतिहासात १०० वर्षांनंतर सलग दुसऱ्यांदा कसोटी सामना दोन दिवसांत संपण्याची ही दुर्मिळ घटना घडली आहे. विशेष म्हणजे, २०२५-२६ च्या याच मालिकेतील पर्थ येथील पहिली कसोटी देखील दोनच दिवसांत संपली होती. त्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने विजय मिळवला होता.

## वरिष्ठांच्या कामगिरीत सातत्याचा अभाव

### युवा खेळाडूंकडून मात्र उज्ज्वल भविष्याची आशा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय कुस्तीसाठी आव्हानात्मक ठरलेल्या २०२५ या वर्षात वरिष्ठ स्तरावर पदकांची संख्या समाधानकारक नसली, तरी कनिष्ठ (ज्युनिअर) स्तरावरील खेळाडूंनी केलेल्या चमकदार कामगिरीमुळे उज्ज्वल भविष्याची आशा कायम राहिली आहे. अंतिम पंघालचे सातत्यमॅटवर अंतिम पंघाल ही भारताची सर्वात सातत्यपूर्ण वरिष्ठ खेळाडू म्हणून समोर आली. महिलांच्या ५३ किलो वजनी गटात खेळताना या हरियाणाच्या मल्लाने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावून भारताचे अस्तित्व राखले. अंतिमने कांस्यपदकाच्या लढतीत दाखवलेला दबदबा आणि दडपण हाताळण्याची तिची शैली, यामुळे ती जागतिक स्तरावरील



अव्वल खेळाडू असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. तिने आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतही तिसरे स्थान पटकावले आणि वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून वर्षाचा समारोप केला..दुसरीकडे, वरिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील भारताची एकूण कामगिरी निराशाजनक राहिली. अंतिमचे कांस्यपदक हे या स्पर्धेतील भारताचे एकमेव पदक ठरले. अनेक मल्लांना सुरुवातीच्या फेरीतच निसटता पराभव पत्करावा लागला. आशियाई स्तरावर मात्र मनीषा भानवाला (६२ किलो) हिने सुवर्णपदक जिंकून आपली छाप पाडली.

### राज्यस्तरीय धनुर्विद्येत धरला अचुक नेम

## महिला धनुर्धारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

| नालासोपारा | प्रतिनिधी |

१५ वी राज्यस्तरीय फिल्ड इनडोअर अर्चरी स्पर्धेला पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथील खुला रंगमंच येथे शनिवार (दि. २७) प्रारंभ झाला. पहिला दिवस सात वर्षाखालील मुलींपासून वरिष्ठ गट महिला आणि ज्येष्ठ महिला गटातील महिला नेमबाजांचा लागलेला कस पाहायला मिळाला. महिला धनुर्धारांनी आपल्या धनुर्विद्येच्या कलेने आलेल्या पाहुण्यांना आणि प्रेक्षकाचे लक्ष वेधून घेतले.

राज्यस्तरीय फिल्ड इनडोअर अर्चरी स्पर्धेचा उदघाटन सोहळा राज्यस्तरीय फिल्ड इनडोअर अर्चरी असोसिएशनचे सचिव सुभाषचंद्र नायर, राज्यस्तरीय फिल्ड इनडोअर अर्चरी असोसिएशनच्या उपाध्यक्ष रितिका नायर, फिल्ड इनडोअर



अर्चरी असोसिएशन पालघरचे खजिनदार हनुमंत भोसले, राज्यस्तरीय फिल्ड इनडोअर अर्चरी असोसिएशनचे सहसचिव संतोष जाधव, फिल्ड इनडोअर अर्चरी असोसिएशन पालघरचे सचिव जयंत सातघरे, मिलिंद पांचाळ, अजिंक्य अडकर, वैभव सागवेकर, मयूर पांचाळ, विनायक नायर, लाभेश तेली, कार्तिकेय कांबळे, आरती कोकाटे, सागर हरिजन आदी उपस्थित होते.

शनिवारी घेण्यात आलेल्या धनुर्विद्या स्पर्धेमध्ये महिला नेमबाजांचे सात गट खेळवण्यात आले. यामध्ये सात वर्षांखालील, दहा वर्षांखालील, १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, वरिष्ठ गट, वरिष्ठ अनुभवी गटातील खेळाडूंचा समावेश होता. पहिल्या दिवशी महिला धनुर्धारांनी साजेसा खेळ करीत अलिबाग येथे होणाऱ्या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये आपली एन्ट्री फिक्स केली. या स्पर्धेमध्ये बांबूवूडन, फ्री स्टाईल रिकव्ह, फ्री स्टाईल अनलिमिटेड कंपाऊंड, बेअर बो बांबू वुडन, बेअर बो रिकव्ह, बेअर बो कंपाऊंड, नोविस बो, ट्रॅडिशनल बो हे धनुष्याचे प्रकार खेळणारे खेळाडू आले होते.

### १५० स्पर्धकांचा सहभाग

#### राज्यस्तरीय स्पर्धेसाठी १७ धनुर्धरांची निवड

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील १७ धनुर्धारांची निवड करण्यात आली होती. चिंतामणराव केळकर विद्यालय अलिबाग येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेमध्ये विजय संपादन केला होता. या खेळाडूंमध्ये महिला गटासाठी रुधिरा जाधव, क्षितिका महाले, स्वाहा कदम सिया कदम, ओवी पाटील, सई पिलणकर, वैष्णवी भोई, हरता गोरेगावकर तर पुरुष गटासाठी अवनिष गोगावले, अद्विक गोगावले, चैतन्य जाधव, आशय आंग्रे, अर्जुन म्हात्रे, आरव हूलवान, अथर्व पाटील, अंश पराडकर आणि लाभेश तेलीयांचा समावेश आहे.

प्रत्येक गटातील सुवर्णपदक आणि रौप्यपदक विजेत्या महिला खेळाडूंना महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

### उपउपांत्य फेरीचे चित्र स्पष्ट | वडाळ्याच्या मैदानावर चुरशीचा महोत्सव

# अजिंक्यपद खो -खो स्पर्धा उत्साहात

| मुंबई | प्रतिनिधी |

वडाळ्यातील शारीरिक शिक्षण मंडळाच्या मैदानावर सुरू असलेल्या ३९ व्या किशोर-किशोरी (सब ज्युनिअर) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेने दुसऱ्या दिवशी अक्षरशः रंगत पकडली. प्रत्येक सामन्यात वेग, चपळता, रणनीती आणि जिद्दीचा संगम दिसून आला. किशोर व किशोरी गटात धाराशिव, मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली आणि सातारा संघांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत उपउपांत्य (बाद) फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेची धग अधिकच वाढवली.





यजमान मुंबईने परभणीविरुद्ध झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात २६-२५ (मध्यंतर १४-११) असा अवघ्या एका गुणाने विजय मिळवला. मध्यंतराला मिळालेली तीन गुणांची आघाडी मुंबईसाठी निर्णायक ठरली. मुंबईकडून यश जाधव, अधिराज गुरव, रुद्रसिंग चव्हाण, आरुष तांबे यांनी सलग ओळीत चमकदार कामगिरी करत संघाला विजय मिळवून दिला. परभणीकडून सोहम पांचाळ, अभंग देशमुख, गोविंद शर्मा यांनी दिलेली झुंज अखेर अपुरी ठरली.

मुंबई उपनगरने हिंगोलीवर ३२-०५ (मध्यंतर २७-०) असा दणदणीत विजय मिळवत एक डाव राखून २७ गुणांनी सामना जिंकला.

### किशोर गट संक्षिप्त निकाल

रायगडने लातूरचा ३१-१९ असा १२ गुणांनी पराभव केला; नंदुरबारने सिंधुदुर्गवर ४१-०८ असा एक डाव राखून ३३ गुणांनी विजय मिळवला; रत्नागिरीने धुळ्याचा २६-१७ (मध्यंतर १०-१०) असा ९ गुणांनी पराभव केला; अहिल्यानगरने नांदेडवर २९-१३ असा एक डाव राखून १६ गुणांनी विजय नोंदवला.

मुंबई उपनगरकडून हर्षद शिर्के,प्रज्योत गुजर यांनी उत्कृष्ट खेळ करत सामना पूर्णपणे आपल्या बाजूने झुकवला. हिंगोलीकडून अर्जुन कोरडे याचे प्रयत्न अपयशी ठरले.

किशोरी गटात लातूर विरुद्ध छत्रपती संभाजीनगर हा सामना उत्कंठावर्धक ठरला. लातूरने २६-२४ असा २ गुणांनी विजय मिळवला. मध्यंतराला १२-१३ अशी पिछाडी असतानाही दुसऱ्या डावात लातूरने खेळ उंचावला. जालना विरुद्ध नांदेड सामन्यात जालनाने ३१-२४ असा ७ गुणांनी विजय मिळवला. मध्यंतराला मिळालेली एक गुणाची आघाडी जालनाने कायम राखली. जालनाकडून समिक्षा, क्रांती मदन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नांदेडकडून संगीता मटके, प्राची डिकळे यांनी झुंज दिली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)